# शाळेपासून मुक्ती - वर्षापुरती

राहूल अलवारिस
२२ ऑगस्ट २००३

१६ वर्षाच्या मुलान पुस्तक लिहिल्याच फारच क्वचित. या वयातील मुलांनी, मोठ्यांनी लिहिलेल्या पुस्तकांचा फक्त अभ्यास करायचा असतो नाही का! आपल्याला वाटतं की मुलांजवळ सांगण्यासारख मनोरंजक अस काय असणार आहे? नसणारच! आपल्या शिक्षणपद्धतीची अशी पक्की खात्रीच आहे. परिक्षेच्या वेळी ठरलेल्या प्रश्नांना, पोपटपंची करून ठरलेली उत्तरे देणाऱ्यालाच बक्षिसं मिळतात. कल्पनाशक्तीचा वापर करून वेगळ्या पद्धतीन उत्तरे देणाऱ्यांचे गुण कमी होतात असा आपला अनुभव.

पुस्तक लिहायच असं ठरवून काही त्यानं हे लिहीलं नाही. शाळेच्या चौकटीबाहेर राहून अनेक गोष्टी शिकायच्या असं त्यानं ठरवल ते आई वडिलांच्या उत्तेजनामुळे. त्याचाच परिणाम म्हणजे 'शाळेपासून मुक्ती' ते त्याला शोधत आलं म्हणाना दहावी पास झाल्यानंतर इतर मुलांप्रमाणे शाळेत न जाता मन मानेल त्या गोष्टी करायच त्यानं ठरवलं. साप आवडतात म्हणून पुण्याच्या सर्पोद्यानात तो त्यांच्या मागे गेला. ममलापूरच्या मगरींच्या बँकेत गेला. या दरम्यान तो कोळ्यांच्या, गांडूळांच्या, कासवांच्या मागेही फिरला. 'इरुला' अदिवासींबरोबर त्याने सापही पकडले. तापट सरीसृपही त्याला चावले. पण या सगळ्यांपासून धडा घेऊन तो हसत मुखान बाहेर आला. शाळेपासून मुक्ती ही त्याच्या शाळेबाहेर व्यतीत केलेल्या एका वर्षाची गोष्ट आहे. समवयीन मुलामुलींना शाळा, कॉलेजमधल्या निर्जिव शिक्षणापासून दूर जाता याव, आयुष्याची आणि शिक्षणाची दुसरी जिवंत बाजू अनुभवायची संधी मिळावी म्हणून त्यानं हे पुस्तक लिहिलय. यात त्यानं गमावल काहीच नाही उलट कमावलयच पुष्कळ. त्याची गोष्ट वाचून तुमच्याही पदरात काहीतरी पडेल असा विश्वास आहे.

## अनुक्रम


| | |
|---|---|
| प्रकरण १ | म्हापश्यातील माशांच दुकान |
| प्रकरण २ | शेतीचा धडा |
| प्रकरण ३ | वनस्पतींचा उत्सव |
| प्रकरण ४ | आळंबी कशी वाढवायची |
| प्रकरण ५ | केरळची सहल |
| प्रकरण ६ | जीवंत सापांच्या दुनियेत |
| प्रकरण ७ | सुट्टीतील सुट्टी |
| प्रकरण ८ | गांडुळांच्या जगात |
| प्रकरण ९ | कोळी (स्पायडर) |
| प्रकरण १० | क्रोकोडाईल केक |
| प्रकरण ११ | शिकवायसाठी शिकताना |
| प्रकरण १२ | तुम्हाला दृष्टी आहे माझ्याकडे नजर आहे |
| प्रकरण १३ | एका जंगलाचं सर्वेक्षण |
| प्रकरण १४ | बेळगाव कार्यक्रमात मुख्य पाहुणा |




### प्रकरण १

# म्हापश्यातील माशांच दुकान

शाळेतून बाहेर पडलो तेव्हा मी किती कच्च मडकं होतो याची तुम्हाला कल्पनाच येणार नाही. मी कधी एकट्यान प्रवासही केला नव्हता. आगगाडीच तिकिट कसं घ्यायचं मला माहित नव्हत. माझ्या वयाच्या इतर मुलांसारखाच मी माझ्या आईवडिलांबरोबर किंवा नातेवाईकांबरोबरच फक्त प्रवास केला होता. ठरवणं, निर्णय घेणे हे तेच करित आपल्या जवळ पैसे ठवण्याचा मला अनुभव नव्हता. अधुनमधुन खर्चाला मिळणारे ५० पैसे फार तर रुपया एवढाच माझा पैसे खर्च करण्याचा अनुभव.

जेव्हा मी दूर दूरच्या प्रवासाची स्वप्न पाहू लागलो तेव्हा माझ्या आईवडिलांनी विचार केला, की आपला आपण व्यवहार कसा करायचा हे आधी गोव्यातल्या गोव्यात राहूनच स्वानुभवानं मी शिकाव. त्या सुमारास पावसाळाही सुरु झाला होता. त्यामुळे दूर दूर प्रवास करणही अवघड होईल असं त्याना वाटत होतं.

म्हापश्याच्या एका मत्स्यालयाच्या दुकानांत मदतीला म्हणून जायला मी सुरुवात केली. माझ्या खेड्यापासून हे गाव जवळच होत. अशोक डिक्रूझ हे दुकानाचे मालक माझ्या वडिलांचे कॉलेजमधील मित्र. इथे अशोक काकांबद्दल सांगायला हवच. ते सामान्य दुकानदार नव्हते. मासे पाळण्याचा त्याना शौक होता. मासे विकून पैसे मिळविण्यापेक्षा माशांविषयी बोलायला त्याना फार आवडायच. कोठल्याच गिऱ्हाईकावर आपल्या दुकानातले मासे घ्यायची सक्ती त्यानी कधीच केली नाही.

खरतर खूप पूर्वीच म्हणजे मी फक्त नऊ वर्षांचा असताना आणि पाचवीत असताना त्यांनी मला या माशांच्या अदभुत जगाची ओळख करून दिली होती. दुकानात मदतीला गेल्यावर गप्पी मासे, प्लॅटी, मॉली यांना वाढविण्याचे मी बरेच प्रयोग केले. या प्रजातींचे उत्पादन तसं साधं सरळं होतं. पण त्या वेळी मिळालेल्या यशामुळे मी अगदी फुशारलो होतो. अशोक काका उदारपणान मी जोपासलेली माशांची पिल्ले विकत घ्यायचे ते मला उत्तेजन देण्यासाठी. नंतर नंतर जोपासायला अवघड असलेल्या माशांच्या जाती वाढविण्याइतका माझा आत्मविश्वास वाढला. सयामी लढाऊ मासा,

निळा गुरामी हे मासे वाढवायचे धडे मी काकांच्या हाता खाली गिरवले.

अशोक काकांच्या दुकानी मी रोज सकाळी नऊला जात असे. वेळेत पोहचण्यासाठी मी वेगाने सायकल दामटायचो. दुपारच्या जेवणाच्या वेळेपर्यंत मी तिथे थांबायचो आणि सांगितलेलं सगळ काम पार पाडायचो.

काकांच दुकान काही फार मोठं नव्हतं. 'गोम्स् कटाओ कॉम्प्लेक्स' च्या तळमजल्यावरच्या दोन खोल्या म्हणजे त्याचं दुकान. पुढे दर्शनी बाजू आणि साठवणीची खोली मागच्या अंगाला. पुढच्या दर्शनीय भागामध्ये माशांचे वीस काचेचे हौद ठेवलेले होते. त्याच्या मध्ये मुख्यता मुंबईहून आणलेले विविध प्रकारचे मासे होते. प्रत्येक पात्रामध्ये एकेका जातीचे मासे असायचे. मुख्य बाजारपेठेपासून अशोक काकांच दुकान लांब होत. त्यामुळे सहज जाता जाता डोकावणाऱ्या ग्राहकांची संख्या कमी होती. पण काकांची नियमित गिऱ्हाईक होती आणि साधारण २० ते ३० रोजची गिऱ्हाईक असायची.

पहिले काही दिवस दुकानातल माझ काम म्हणजे माशांच्या काचेच्या हौदांवर लक्ष ठेवायचं. अस्वच्छ झाले असतील तर धुवायचे, मेलेले मासे काढून टाकायचे आणि अशीच काही किरकोळ कामे. माशांना मी खाऊपण घालायचो आणि काही वेळेस जखमी, आजारी माशांवर उपचार करायचो. मी गिऱ्हाईकांबरोबर बोलायचोही. काही काळानंतर अशोक काकांबरोबर त्यांच्या नियमित भेटींना मी ही जाऊ लागलो.

मोयरा येथील एका गृहस्थांना घरी मत्स्यालय बनवायच होत. त्यांच्याकडे काचेचा हौद होत. ते कस दिसायला हवं या विषयी त्यांच्या काही निश्चित कल्पना होत्या. ते नेमक कसं करायच यासाठी त्यांनी अशोक काकांना बोलावलं. त्यांनी आमच्यासाठी मोटार धाडली होती. त्यांच्यी घरी गेल्यावर टँक कुठ ठेवायचा, प्रकाश योजना कशी करायची, पाण्याची गाळणी कुठ ठेवायची, कुठल्या प्रकारचे मासे आणि किती असावेत आणि त्यांची जोपासना कशी करायची या सगळ्या विषयी आम्ही चर्चा केली. सगळ्या गोष्टी व्यवस्थित ठरवल्या गेल्यात या विषयी आमच समाधान झालं. त्यांच्या गरजांची आम्ही नोंद करून घेतली आणि आम्ही म्हापश्याला परतलो. नंतर आम्ही त्यांच्या साठी जमा करून ठेवलेलं साहित्य घेऊन ते गेले.

एका खेपेला अशोक काकांच्या एका गिऱ्हाईकाच्या ऑफिसमध्ये बुटके, गुरामी मासे काचेच्या हौदात ठेवण्यासाठी आणि त्यांत पार्श्वभूमीला एक निसर्गदृश्य ठेवण्यासाठी काकांबरोबर मी गेलो. अशा भेटींमध्ये काका काय करतात ते मी



लक्षपूर्वक पहात असे. काही काळानं काकांच्या काही गिऱ्हाईकांकडे छोट्या कामांसाठी आणि लहान अडचणी दूर करण्यासाठी मला एकट्याला धाडायला काकांनी सुरुवात केली.

गिऱ्हाईकांकडे जातांना मत्स्यालयाचं सर्व साहित्य म्हणजे पाण्याचा पंप, गाळणी, हौदात ठेवायची खेळणी, माशांना झालेले रोग किंवा मासे पटापट मरायला लागणं किंवा गिऱ्हाईकांना त्यांच्या माशाची संख्या वाढवायची आहे तर अशा सर्व गोष्टींसाठी मी जायला लागलो. काही वेळेस थकलेले पैसे गोळा करायला किंवा मत्स्यालय व्यवस्थित चालू आहे ना हे पाह्यला मला धाडल जायच, तर काही वेळेस मी आपणहूनच अशा गिऱ्हाईकांना भेटी द्यायचो त्यांच्या मत्स्यालयाच्या नवीन घरी आनंदानं बागडणाऱ्या माशांना बघायचो.

माझ्या मालकानी एक दिवस गुप्तपणे मला माशांच्या आणि माशांच्या खाद्याच्या बाजारातील किंमतींची माहिती मिळविण्याच्या कामगिरीवर पाठवलं. सहज डोकावणाऱ्या गिऱ्हाईकाचा मी आव आणला आणि एका मोठ्या दुकानामध्ये मासे, माशांचे खाद्य यांच्या किंमतींची चौकशी केली. पाहिजे असलेली माहिती मिळाल्यानंतर मी त्याच्या दुकानातून स्वस्तातल्या ब्लॅक मॉलीस माशांची एक जोडी खरेदी केली. केवळ मी गिऱ्हाईक आहे याबद्दल त्यांची खात्री पटावी म्हणून! या माहितीवरून आमच्या लक्षात आलं की, अशोक काकांच्या किंमती ह्या दुसऱ्या दुकानदारांपेक्षा खूपच कमी होत्या.

या काळामध्ये मत्स्यालयातील माशांच्या संगोपनाविषयी मी खूप माहिती मिळविली. त्याच कारण अस होत, की मी दीर्घ काळ अशोक काकांच्या दुकानांत माशांच निरिक्षण करत होतो आणि आम्ही भेट देत असलेल्या ठिकाणी मला कामाचा प्रत्यक्ष अनुभवही मिळत होता. दुसर म्हणजे दहावीच्या परिक्षेत विशेष प्राविण्य मिळविल्याबद्दल माझ्या वडिलांनी बक्षिस म्हणून दिलेली माशांवरची पुस्तकं मी वाचून काढली होती. पुस्तकं खर्चीक होती पण ती किंमत वाजवीच होती. पुस्तकी माहितीबरोबरच मला प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळाल्यामुळ मत्स्यालया विषयी माझा आत्मविश्वास खूपच वाढला.

माझ्या अनुभवातील महत्वाची बाब म्हणजे मत्स्यालय कस बनवायचं ते मी शिकलो. अशोक काका मला म्हटले की, सध्या मंदी असल्यामुळे मस्त्यालय घरं कसं बनवायच ते मी तुला शिकवतो. मला अगदी मुळापासून सुरुवात करावी लागली

उदा. मत्स्यालासाठी काचेची खरेदी, योग्य आकारामध्ये काचा कापणे आणि हे सगळं साहित्य ओरखडा येऊ न देता दुकानात घेऊन जाणे.

या पूर्वी अशोक काकांबरोबर अनेक प्रसंगी मी काच दुकानदाराकडे गेलो होतो आणि हव्या असलेल्या आकाराची काच करून घेणं, काचेचं माप चुकल असेल तर पुन्हा ती कापून घेणं हे मी पहात होतो. लहान लहान खरेदीसाठी मला कित्येकदा काचेच्या दुकानात धाडलं जायचं त्यामुळे काचेचा दुकानदार आणि तिथल्या कामाची पद्धत याचा मला परिचय झाला होता. हव्या असलेल्या आकाराच्या काचेची किंमत कशी काढायची हे ही काकांनी मला शिकवलं होत. तरी सुद्धा एका खेपेला काकांनी मला काही पैसे दिले आणि काय करायच ते सांगितल तेव्हा हे सगळं एकट्यानी करण्याचा नविनच अनुभव मला मिळाला.

मी काच खरेदी केली आणि हव्या त्या आकारात ती कापूनही घेतली. आतापर्यंत ठीक निभावलं. आता मात्र एक कठिण समस्या आली. काचेचे तुकडे दुकानापर्यंत कसे घेऊन जायचे. मला वाटल आपण रिक्षा करावी पण खात्री वाटेना कारण किती खर्च येईल याचा मी अंदाज केला नव्हता. जेव्हा बांधलेल्या काचा उचलून त्यांचा अंदाज घेतला तेव्हा त्या दुकानदारानं मला सांगितल की, हातामधून ह्या काचांच बंडल तू तुझ्या दुकानापर्यंत सहज नेशिल. शेवटी मी तसंच करायचं ठरवलं.

मी काचा घेऊन निघालो. सुरुवातील ठिक वाटल पण पुढे पुढे ते ओझं जड वाटायला लागलं. कारण वाटे मध्ये रिक्षा, टॅक्सी, मोटरसायकल गोंगाट करत जात होत्या. दुकानांत पोहचेपर्यंत कुठून आपण या फंदात पडलो अस मला वाटायला लागलं. मी अगदीच दमून गेलो, माझ्या हाताला रग लागली. फुटायच्या भीतीनं मी काचांचं ओझ खालीही ठेवलं नाही. एकदाचा मी दुकानात पोहचलो आणि कांचा व्यवस्थित आल्याबद्दल सुटकेचा नि:श्वास टाकला. पण अशोक काकांना धक्काच बसला आणि ते स्वाभाविकही होत त्यांनी मल समजावून सांगितल की वाटेत जर अपघात झाला असता तर त्याचे परिणाम किती भयंकर झाले असते आणि शेवटी माझी जबाबदारी त्यांच्यावर होती ना! खरच त्या दिवशी मी एक धडा शिकलो.

कांचेचं मत्स्यालय बनवायला शिकणं मोठ रंजक होतं. पहिल्यांदा मत्स्यालयाचा आकार नक्की करायचा त्याची लांबी ठरवायची मग उंची आणि रुंदी त्याप्रमाणात घ्यायची. काचेच्या कडा सिलिकॉननी जोडलेल्या असतात. सिलिकॉन म्हणजे एक प्रकारचा डिंकच आणि तो घट्ट झाला की रबरासारखा दिसतो. सिलिकॉन पाण्यात



विरघळत नाही. त्यातला महत्त्वाचा भाग म्हणजे काचांच्या फक्त कडांनाच सिलिकॉन लागल पाहिजे तुमची चिकट बोटं काचेच्या इतर भागाला लागता कामा नयेत नाहीतर काच खराब दिसते. कारण सिलिकॉनच्या खुणा काचेवर कायम राहतात. नंतर काचघराच्या कडा आंतल्या बाजुला सुध्दा सिलिकॉननं चिटकवाव्या लागतात त्यामुळे दुहेरी संरक्षण मिळतं. मग एक दोन दिवस ते सुकत ठेवव लागतं. दुसऱ्या दिवशी त्यात पाणी भरून त्याची चाचणी करायची. सगळं व्यवस्थित असेल तर हा हौद विक्रीला किंवा गिऱ्हाईकाला द्यायला तयार झालां. पहिल हौद कसा बनवायचा हे शिकल्यानंतर बाकीचे हौद बनवायला मी मदत केली. एकदा एक काच मी उलटीच चिकटवली. काका म्हणाले ‘काही तरी गडबड आहे बुवा! चूक लक्षात आल्यावर त्यांनी मला उचलून त्या हौदांत ठेवल नाही एवढंच!

एका ठिकाणी मत्स्यालयातील मासे का मरतात हे शोधायची संधी मला मिळाली तेव्हा माझ्या कौशल्याची परिक्षा झाली. गिऱ्हाईकांची ही नेहमीचीच तक्रार असे. ते झालं असं की कलंगुट किनाऱ्यावरच्या हॉटेल ओसबोर्नच्या मालकानं काकांना सांगितल की, तुम्हा या आणि सांगा आमचे मासे का मरतात ते. हॉटेलचा मालक अशोक काकांच चांगल गिऱ्हाईक होतं. त्यामुळ या प्रश्नात लवकर लक्ष घालण गरजेचं होत. पण त्या दिवशी काकांना जाणं शक्य नव्हत आणि काम तर करायच होतं म्हणून त्यांनी मला धाडायच ठरवल. त्या मालकाचं व्हिजिटिंग कार्ड देऊन, आणि हॉटेलेपर्यंत कस जायच हे सांगून त्यांनी माशांची काही औषध, हौदांतील जुना पंप बदलून नविन ठेवण्यासाठी माझ्याजवळ दिला आणि मला पाठवलं. अशोक काकांनी माझ्यावर एवढा विश्वास टाकला आणि महत्त्वाच काम माझ्यावर सोपवलं याचा मला अभिमान वाटला आणि आनंदही. मी संध्याकाळी हॉटेलकडे निघालो. सापडायला काही अडचण नाही आली. सुंदर हिरवळ, आणि पोहायचा तलाव असलेलं ते मोठ हॉटेल होतं. ताठ मानेनं आणि पूर्ण विश्वासानं मी हॉटेलमध्ये गेलो आणि आव असा आणला की मी खुप अनुभवी माशांचा डॉक्टर आहे. मी मॅनेजरला भेटलो. कोणते मासे मेले ते त्यांनी मला सांगितल. रोगांची लक्षण मी पाहत होतो पण कोणतच लक्षण मला आढळल नाही. मग माझ्या लक्षात आल की समस्या सोपी होती, नेहमीचीच होती, जास्त खाऊ घालण्याचा तो परिणाम होता. माशांना त्यांना त्यांच्या आकाराच्या प्रमाणात खाद्य लागतं. पण बरेचदा गरजेपेक्षा जास्त खाद्य त्यांना दिलं जात या जास्तीच्या खाद्यामुळं पाणी गढूळ होतं, प्रदूषितं होत आणि

त्यामुळे मासे मरतात.

मी मत्स्यालय स्वच्छ केले. पंप नविन घातला, गाळणी तपासली आणि हॉटेलच्या कर्मचाऱ्यांना माशांना कस खाद्य द्यायचं ते समजावलं. माशांची औषधं त्यांना विकून, विक्रीचं कामही मी केलं. ती औषधे गरज पडली तर वापरा असं मी त्यांना सांगितलं. काकांनी दिलेल्या बिल बुक मध्ये मी त्यांना बिलही करून दिलं. माझ्या कामाबद्दल ते समाधानी दिसले आणि मला त्यांनी चहा देऊ केला. मी तो प्यायलो नाही कारण मी चहा पीतच नाही. काम संपल्यावर माझा अनुभव काकांना सांगायला मी लगेचच निघालो.

या काळामध्ये पणजीतल्या माशांच्या दुकानांनाही मी भेटी दिल्या. त्याबद्दल ऐकलं होत पण पाहयल नव्हतं. माझी तीन गिअरची सायकल नादुरुस्त झाली आणि स्पेअर पार्टस् आणायला मला पणजीला जाणं भाग होतं. माझी आई नेहमी पणजीला जाते. या कामासाठी पणजीला जायला तिचं मन वळवायचा मी प्रयत्न केला. पण तिनं साफ नकार दिला आणि म्हणाली आता तुझ्या तू या गोष्टी शिकायला हव्यात. अन् मग एक दिवस पणजीला जायचं, त्याच वेळी माशांच्या दुकानाला भेटी द्यायच्या आणि अशोक काकांसाठी आवश्यक त्या गोष्टी न्यायच्या असं मी ठरवलं.

दुसऱ्या दिवशी आई बरोबर मी पणजीला गेलो. तिनं मला काही महत्त्वाची ठिकाणं दाखविली आणि मग ती तिच्या कामाला निघून गेली. मी थोडा घाबरलो होतो पण वेळ मारुन न्यायच ठरवलं. भूक लागली होती म्हणून पहिल्यांदा कामत रेस्टॉरंट मध्ये गेलो. बापरे! घरा बाहेर खायच म्हणजे केवढे पैसे लागतात! त्यानंतर अशोक काकांसाठी सिलिकॉन घ्यायचं दुकान मी शोधून काढल. पुष्कळ ठिकाणी चौकशी केल्यावर मला ती जागा सापडली. मग सायकलच दुकान शोधलं, ते पटकन सापडलं. पण मला पाहिजे असलेल्या गोष्टी संपल्या होत्या आणि पुढच्या आठवड्यात मिळणार होत्या. आता माशांच्या दुकानाना भेट द्यायला मी मोकळा झालो. त्यांची नावे होती 'बिसलीन' आणि 'समथिंग फिशी'. 'बिसलीन' मध्ये पुष्कळ प्रकारचे देशी विदेशी मासे होते पण किंमती फार होत्या. दुकानातल्या लोकांशी मी गप्पा मारल्या तो त्यांच्या कुटुंबाचा व्यवसाय होता. त्यांच्या दुकानात पक्षीपण विकायला होते. थोडावेळ मासे पाहून मी दुसऱ्या दुकानात गेलो. तिथे मासे कमी होते त्यामुळे माझी निराशा झाली. दुकानातल्या मदतनीसानं सांगितल पुढच्या आठवड्यात त्यांचे मासे येणार आहेत. पण जे मासे मी तिथे पाहिले त्यानं मी आश्चर्यचकीत झालो. आयुष्यात प्रथमच



नरभक्षी 'पिरान्हा' मी तिथे पाहिले. हे पिरान्हा मासे घाबरट आणि लाजाळू वाटले. जेव्हा त्यांना खूप भुक लागते तेव्हाच ते आक्रमक होऊन मांस खातात.या दुकानात एक विदेशी मासा होता. 'ब्लॅक घोस्ट' नावाचा. त्याच्या एका जोडीची किंमत होती रुपये तीन हजार रुपये!

अशोक काकांकडे माशांविषयी मी बऱ्याच गोष्टी शिकलो. पण इतर काही मौल्यवान अनुभवही मला इथे मिळाले.

या पूर्वी कधी मी बँकेतील कामे केली नव्हती. अशोक काकांनी सहजच विचारले की, बँकेतून काही पैसे काढून आणशील का ? ते कसे काढायचे हे मला माहित नाही हे त्यांना सांगायची मला लाज वाटली. बँकेत कसं जायचं हे त्यांना विचारलं आणि मी निघालो. हे काम मी पूर्ण केलं. त्यानंतर बँकेत पैसे ठेवायला आणि काढायला त्यांनी बरेचदा मला धाडलं.

माझ्या हाताशी चिक्कार वेळ होता हे खरं, पण वेळेचं नियोजन करणं मात्र अवघड होतं. उठायला उशीर झाला की दुकानाची वेळ गाठायसाठी मी सायकल दामटायचो किंवा माझी कामं वेळेत पूर्ण न झाल्यानं जेवणाची वेळ मला पुढे ढकलायला लागायची. वेळेच नियोजन करण्याचा हा अनुभव मी घेतला आणि हे केल्यानंतर मी स्वत:वरच खूष झालो. आयुष्यात प्रथमच माझे छंद, माझ्या आवडी निवडी यांच्याकडे डोळसपणे पहायची दृष्टी मला मिळाली. माझ्या लक्षात आलं की, आपल्याला पुस्तकं वाचायची फार आवड आहे. अशोक काकांच्या दुकानी जाताना मी ग्रंथालयात जायचो आणि मोकळ्या वेळात वाचण्यासाठी काहीतरी आणायचो. माझी आवडती पुस्तकं म्हणजे 'हार्डी बॉईज्'. आणि दुकानात काम करताना ती संपूर्ण मालिका मी संपविली. टीन्टीन् आणि फॅन्टम् ही कॉमिक्सही मला आवडतात.

अशोक काकांच्या दुकानाची वेळ संपल्यानंतर संध्याकाळच्या वेळी मी एफ. एम. रेडीओचे गाण्याचे कार्यक्रम ऐकायचो. इतर मुलांप्रमाणेच मला जलद आणि ढँऽव ढँऽव गाणी आवडायची. सुदैवानं कॅनडाहून भेटीला आलेल्या ॲलीसन आत्यानं मला एक वॉकमन भेट म्हणून दिला होता. त्यामुळे इतरांना त्रास न होता, माझा मी गाणी ऐकू शकत होतो. गिटार शिकावी असं माझ्या मनात होतं. पण आई वडीलांनी मला सांगितलं, आताच घाई करू नको, कारण येणाऱ्या काही महिन्यांमध्ये तुला गोव्याचा प्रवास करायचा आहे. पत्र लिहीण्याची काही मला आवड नाही. पण मला आलेल्या पत्रांना उत्तरं द्यायलाच लागायची. पत्रातून माझ्या दहावीतल्या

निकालाविषयी माझं अभिनंदन करून मला पैसे बक्षिस देणारी त्यांची पत्र होती. दहावीच्या परीक्षेनंतर १ वर्ष सुट्टी घ्यायच्या माझ्या निर्णयाबद्दल माझ्या कितीतरी नातेवाईकांनी आणि मित्रांनी माझी पाठ थोपटली होती. याचा मला खूपच आनंद झाला. दुसरं म्हणजे तुम्ही जर इतरांना पत्र लिहीली तर तुम्हालाही पत्र येतात हे माझ्या लक्षात आलं. ते काही असलं तरी पत्र लिहीणं काही मला आवडत नाही.

रविवारी हातखर्चासाठी मी काही वेगवेगळी काम करायचो. म्हणजे, मोटार धुवून वडीलांकडून पाच रूपये मिळवं, घरचे निरोप पोहचव आणि विजेची बिलं भर, घरातल धान्य आण आणि अशी कितीतरी... थोडक्यात काय अशोक काकांकडचं काम ही एक फार चांगली सुरवात ठरली.

## केलेल्या कामाची टिपणे

### ज्युलीकडे आता माशांशाठी काचघर आलं

ज्युलिएट आणि पिटर डिसुझा माझ्या आईवडीलांचे कॉलेजमधील मित्र. कलंगुटला ते रहातात. पिटर काका गुन्ह्याशी संबंधित वकील आहेत आणि ज्युलिएट आत्या शाळेत शिकवते. बरेच वेळा आम्ही सर्व मिळून हिडायला जायचो. अशाच एका सहलीमध्ये दहावीत असतातना ज्युलिएट आत्याला माझा मासे पाळण्याचा छंद लक्षात आला होता आणि तिच्या घरी मत्स्यालय करण्यासाठी माझी मदत तिनं मागितली होती.

झालं असं की त्यांच्याकडे पूर्वी मासे पाळले होते. पण तळातल्या काचेला तडा गेल्यामुळे काकूनं ते माशांचं काचघर अशोक काकांकडे दुरूस्तीला दिलं होतं. ते तिथेच पडून होत. आत्यानं मला कितीतरी वेळा या काचघराच्या दुरूस्तीविषयी सांगितलं होतं. अशोक काकांना निरोप देण्याखेरीज मी काहीच करू शकलो नव्हतो. काकांकडे काम करायला लागल्यावर आत्याला दिलेल्या वचनपूर्तीच्या मागे मी लागलो. सुरुवात केली ती आत्याचं जुनं काचघर शोधण्यापासून... सामानाच्या खोलीमध्ये मी त्याचा शोध घेतला आणि इतर मोठ मोठ्या काचघरांच्या तळाशी मला ते सापडलं. ते मुळच्या स्थितीतच असल्याचे पाहून मला बरे वाटले. काकांनी आणि मी मिळून तडा गेलेली तळातली काच काढली. माप घेतलं आणि नविन काच विकत आणली. काचघराला ती बसवूनही टाकली. आणि मग पीटर काकांच्या ऑफीसमध्ये जाऊन सांगितलं की तुमच्या सोईने तुम्ही ते घरी घेऊन जा.



पीटर काका येऊन दुसऱ्या दिवशी ते काचघर घेऊन गेले. काही दिवसांनी ते मत्स्यालय सुरू करायला मी त्यांच्या घरी गेलो. तिथं गेल्यावर समजलं की ते सुरू करण्याचं कोणतच साहित्य आत्याजवळ नव्हतं. होती ती फक्त थोडी वाळू. ती ही पुरेशी नव्हती. गरजेच्या हव्या त्या गोष्टी आणायला मी आत्याला सांगितले. तर ती मला म्हणाली, हे सगळं तूच विकत घेऊन ये आणि मत्स्यालय सजवायचं सामानही तूच आण. माझ्या पुढच्या भेटीमध्ये मी काही किलो दगड गोटे, पंप, प्लास्टिकची झाडं, माशांचं औषध, खड्यांखाली तळात घालायची जाळी, लहान पाईप लाईनचा तुकडा, रेग्युलेटर्स, टी आकाराचे जोड आणि माशांच जाळं हे सर्व साहित्य घेऊन मी त्यांच्या घरी गेलो. शिवाय मत्स्यालयात ठेवायला काही खेळणी आणि निवड करायला दोन शिंपले घेऊन गेलो. सुरवातीला दगडगोटे, खडे स्वच्छ धुतले, काचघरात तळाशी जाळी घातली, मग त्याच्यावर दगड ओतले, त्यावर शंख शिंपले आणि खेळणी ठेवून ते सजविले. मग नळ, गाळणी हे हवेच्या पंपाला जोडून घेतले. मी काय करतोय ते एन्जेल आणि मिरीयम बारकाईने बघत होत्या. या आत्याच्या दोन लहान मुली. त्या मला अधून मधून सल्लाही देत होत्या आणि किरकोळ मदत ही करत होत्या. दोन तासांनी सगळी तयारी पूर्ण झाली. आता फक्त मासे आणि पाण्यातल्या वनस्पती आत सोडायच्या राहील्या. मासे निवडायचे काम काही माझ्यावर सोपवलं नव्हतं. कंडोलीमच्या माशांच्या दुकानातून आत्या मासे निवडून आणणार होती. कंडोलीमला जिवंत वनस्पती मिळतील की नाही या बद्दल तिला शंका होती. पीटर काकांबरोबर वनस्पती धाडायला तिनं मलाच सांगितलं. पुढच्या दोन दिवसातच मी हे काम पूर्ण केलं. आठवड्यानंतर पीटर काकांकडे वडीलांनी दिलेले पत्र घेऊन मला जावं लागलं. आत्या मासे आणणार होती. आपल्या नव्या घरात त्यांना पहायला मी उत्सुक होतो. त्यांना भेट देण्यासाठी आमच्या बागेतल्या मत्स्यालयातून गप्पी माशांच्या पाच जोड्या मी बरोबर घेतल्या होत्या. तिथं गेल्यावर मला धक्काच बसला. मत्स्यालय मी जिथ तयार करून ठेवलं होतं ते तिथचं आणि तसचं होतं. या सुंदर घरात अजून एकही मासा रहात नव्हता. मी मत्स्यालयात सोडण्यासाठी बरोबर मासे आणले होते हे किती बरं झालं. मी त्यामध्ये दिवे आणि रेग्युलेटरही बसवले आणि वनस्पतीही त्यात सोडल्या. मत्स्यालय आता कसे दिसतय हे कुतूहलाने मी पहात असताना आत्याच्या मुलीही माझ्या भोवती उभ्या राहील्या. मासे आपल्या नव्या घरात आनंदात पोहू लागले. मत्स्यालयात कोपऱ्यातल्या गाळण्यातून हवेचे बुडबुडे येत होते. त्यांच्या

सोबत जिवंत वनस्पतीही होत्या. आत्यानं पण हे मत्स्यालय पाहीलं, मला शाबासकी दिली आणि आश्चर्य म्हणजे मला ५० रूपये देऊ केले. मी तीला म्हटलं, याची काही गरज नव्हती. खरं तर हे करण्यामधे मला खूप आनंद मिळाला होता. पण तिनं आग्रहच केला. ही माझी पहिली मिळकत होती!

अशाच पद्धतीने इतर काही आमच्या ओळखीच्या कुटुंबामधूनही मी मत्स्यालय बसवून दिली. त्यात मला आनंदही वाटला आणि अनुभवही मिळाला. हातखर्चाला पैसेही मिळाले. म्हापश्याच्या अवधूत आणि रेखा मुंज यांच्याकडे सुंदर अस मोठं मत्स्यालय त्यांच्या मुलीसाठी सुरू करायला मी मदत केली. 'पऱ्याचे' अल्विटो आणि सेलिंन सँटिॲगो यांच्याकडेही एक रिकामे मत्स्यालय होतं. त्यांना त्यात मासे सोडायचे होते. मी त्यांना त्यात मदत केली.

आमच्या शाळेच्या प्रिन्सिपॉलच्या आफीसमध्येही एक मोठ्ठं मत्स्यालय होतं. मी शाळेत असताना त्याची देखभाल करीत असे. माझा छोटा भाऊ मिलिंद यालाही माशांची आवड आहे. त्याच्या करवी मी या मत्स्यालयावरही लक्ष ठेवले होतंच.



### प्रकरण २

# शेतीचा धडा

घराच्या ईशान्य दिशेला दूरवर असलेल्या वॉलपोई जवळच थानेम हे खेडं आहे. पावसाळ्यामध्ये तिथल्या रस्टिक फार्मवर जायचा असा माझा एक बेत होता. तिथल्या शेतावर मला अनुभव घ्यायचा होता. रस्टिक फार्म विषयी मला आकर्षण असण्याचे कारण म्हणजे माझा जन्म त्याच फार्मवरचा. त्यावेळी माझे आईवडील तिथेच रहात होते. मी तीन वर्षाचा होईपर्यंत आम्ही तिथेच होतो. खरं तर मला त्या जागेविषयी फारश्या आठवणी नव्हत्या. परंतु माझ्या लहानपणचे त्या जागेतले कितीतरी फोटो आमच्या संग्रही होते. आणि तिथल्या कितीतरी गोष्टी माझे आईवडील मला सांगायचे. अजूनही प्रत्येक वर्षी त्या जागेला भेट देऊन तिथल्या शेतावर काम करणाऱ्या खेडूतांशी आमचा संपर्क आहे. गेली सोळा वर्षे आमच्याकडे काम करणारा येसू हा तिथलाच. १९८५ साली रस्टिक फार्म शाम आणि उज्ज्वला आचरेकर यांनी विकत घेतलं. त्यांच्या बरोबर एक महिना राहून शेतीविषयी मला प्रत्यक्ष माहिती मिळवायची होती. दुर्दैवाने त्यांच्या काही कौटुंबिक अडचणींमुळे मला त्यांना बोलावता आले नाही. माझ्या एक वर्षाच्या सुट्टीमध्ये ह्या एका गोष्टीचं मला फार वाईट वाटतं. पुढं मग आमच्या स्वत:च्याच खेड्यात म्हणजे 'पऱ्याला' शेतीविषयक मूलभूत गोष्टी मला समजल्या. आमच्या शेजारी कांडोळकर हे शेतकरी कुटुंब रहातं. पावसाळ्यात आपली शेती ते स्वत:च करतात. दुसऱ्यांची शेतं नांगरून द्यायचं कामही ते करतात. त्यांचा सर्वात मोठा मुलगा 'गुरू'. शेतकामासाठी त्याच्याकडे सुंदर बैलांची जोडी होती. एकदा आमच्या घरातलं थोडं गवंडी काम करायला गुरू आला होता. त्याच्याशी बोलताना माझ्या सुट्टीविषयी मी त्याला सांगितलं. त्यांन सहजच विचारलं की, त्याच्या शेतावर नांगरणीसाठी येशील का म्हणून... मी आनंदानं उडीच मारली. माझ्या या उत्साहाचं त्याला नवलचं वाटलं. सकाळी लवकर उठून आमच्या घराजवळच असलेल्या त्यांच्या शेतावर मी गेलो. नांगर चालवणं वाटतं सोपं पण तसं नाही बर का! त्यालाही कौशल्य आणि ताकद लागते. त्याचंही एक तंत्र आहे. नांगर दोन बैलांच्या मधून चालला पाहीजे आणि जनावरांच्या पायाला तो लागता कामा नये. नांगर चालवताना आवश्यक तेवढाच जोर त्यावर टाकायला लागतो. फाळ जमिनीत

जास्ती खोल रूतूनही चालत नाही किंवा फार उथळही चालून उपयोग नाही. शिवाय नांगर चालविताना एकीकडे बैलांवरही लक्ष ठेवायला लागतं, त्यांना पाहिजे त्या दिशेला वळवायला लागतं आणि बांधाजवळ नांगर उचलूनही घ्यावा लागतो. शेवटची महत्त्वाची गोष्ट म्हणजे बैलांना तुम्ही परके वाटून उपयोग नाही. नाहीतर तुमचं सांगण ते ऐकणारच नाहीत. गुरूला त्याचे बैल चांगले ओळखत होते. पण मी परका होतो. गुरूनं मला हिऽर हिऽर असं ओरडत रहायला सांगितलं. या इशाऱ्यावरच बैल चालतात. तसा आवाज केल्यामुळे बैलांची अन् माझी ओळख व्हावी असा उद्देश होता. गुरूबरोबर कित्येक दिवस नांगरणी करूनही त्यानं माझ्या एकट्यावर नांगरणी कधीच सोपविली नाही. कारण अजूनही मला त्यातलं कौशल्य साधल नव्हतं. आणि माझ्या अननुभवामुळे जर एखादा बैल जखमी झाला असता तर त्याला पंधरा दिवस विश्रांती द्यायला लागली असती आणि त्यात पैशाचं नुकसान झालं असतं. नांगरणी झाल्यावर बी पेरण्यासाठी जमिन सारखी करावी लागते. हे काम बैल करतात. एक आडवा रूंद लाकडी ओंडका बैल ओढतात त्यामुळे जमिन समतल होते. हे एकट्याने करायला मला परवानगी मिळाली. मला हे काम खूपच आवडलं. त्या लाकडी ओंडक्यावर उभं राहून बैलांकरवी वर खाली खेचलं जाण्यामध्ये मोठी मजा वाटते. बी पेरण्यात आणि त्यानंतर शेतामध्ये खतं टाकायला सुद्धा मी मदत केली. नांगरणीच्या मधल्या वेळात मी शेतातील तणही काढली. आम्ही नांगरणी करत असताना काही दिवस जोरदार पाऊस पडला. आणि बाकीच्या शेतकऱ्यांबरोबर पावसात काम करायला मला मजा वाटली. नांगरणी झाल्यावर शेतमालक आम्हाला गरम चहा, चपाती किंवा पावभाजीही द्यायचा.

आम्ही शेतात नांगरणी करत असताना आणि इतर मजुरांबरोबर आमच्या हातापायांना चिखल लागलेला पाहून शेतमालकाना मोठं आश्चर्य वाटायचं. कारण मला ते सगळे ओळखत होते. त्याच गावचा होतो नं मी! एका बाईला तर वाटलं की, मी शाळेला बुट्टी मारून आलो आहे. तिन मला दम भरला, बघं हं रविवारी सकाळी तू इथे होतास हे तुझ्या आईला सांगेन. चर्चमध्ये मी मासला उपस्थित रहावं अशी तिची अपेक्षा होती. शेतात काम करण्याची मला फार आवड होती आणि तो अनुभव मी आवडीने घेतला. गुरूबरोबर पाच सहा शेतं नांगरायचा अनुभव मी घेतला. आणि जेव्हां जेव्हा पावसाळा जवळ येतो तेव्हा मी पुन्हा या अनुभवातली ऊब आणि आनंद घेतो.

□



## प्रकरण ३

# वनस्पतींचा उत्सव

सर्व सामान्य गोवेकराला वनस्पतींविषयी फार प्रेम आहे. आणि त्याची हौस आणि उदंड उत्साह या उत्सवातील, वनस्पतींच्या प्रदर्शनामधून दिसून येतो. इथं माझ्या दोन अनुभवांविषयी मी सांगणार आहे. एक साळगाव आणि दुसरं सिओलिम या माझ्या घराजवळील दोन खेड्यांमधील हा अनुभव आहे. एके ठिकाणी मी फक्त प्रेक्षक होतो आणि दुसऱ्या ठिकाणी मात्र मी त्यात सक्रीय सहभाग घेतला होता.

**साळगांव**

१ जुलै रविवारचा हा दिवस एरवी निरूत्साही, ओलसर आणि पावसाळ्यातील ढगांनी भरलेला असा असतो. पण या वेळी मात्र स्वच्छ आणि प्रसन्न वातावरण होतं. साळगाव मध्ये वनस्पतींचे प्रदर्शन मला पहायला जायचे होते. हवा कोरडी व प्रसन्न असल्यामुळे मोठ्या आनंदात मी लॉर्डस् कॉनव्हेंट शाळेच्या इमारतीपर्यंत सायकलवरून २० मिनिटांत पोहचलो. प्रदर्शन इथेच भरलं होतं. मी साडे दहाला पोहचलो. प्रदर्शनाचं उद्‌घाटन नुक्तचं झालं होते. आणि मुख्य हॉलमध्ये जाण्यासाठी लोकांची झुंबड उडाली होती. मी ही त्यात घुसलो. प्रदर्शनाचा मुख्य हॉल खूपच मोठा होता. आणि कुंड्यांमधली झुडपं ही हॉलच्या मध्यभागी मांडली होती. पुष्कळश्या वनस्पती विक्रीला ठेवल्या होत्या. पुष्कळ लोकांनी वेगवेगळ्या वनस्पतींच्या कुंड्या तिथं ठेवल्या होत्या. त्या त्या लोकांची नाव त्याच्यावर होती. एका बाजूच्या टेबलावर विविध प्रकारचे कॅक्टस ठेवले होते. आणि बक्षीस मिळालेल्या फुलांच्या रचना दुसऱ्या बाजूला ठेवल्या होत्या. रंगविलेल्या स्कूटरच्या टायरमध्ये केलेल्या पुष्परचनेला पहिलं बक्षीस मिळालं होतं. किती छान कल्पना होती. दोन अत्यंत आकर्षक आणि वेगळ्याच प्रकारची कॅक्टस प्रदर्शनात होती. एकाचं खोड हिरवं होतं आणि अग्रभागी भडक लाल रंग होता तर दुसरं कापडी पफ सारखं होतं. हॉलमध्ये ठेवलेल्या झाडाझुडपांशिवाय काही वर्गांमधूनही झुडपं विकायला ठेवली होती. कोथिंबीर किंवा नारळाची रोपे तेथे होती. मनीप्लांटस्, वेली, घराच्या सावलीत वाढणारी शोभिवंत झाडं होती. शिवाय बागकामाची सगळी अवजारं म्हणजे फवारणीची साधनं, कटर्स, कुंड्या, बियाणांची

पाकिटे, सेंद्रिय खते हे ही सर्व तिथे ठेवले होते.

ठीक ११ वाजता फ्रान्सिस बोर्गेस भाषण करतील अशी घोषणा झाली. त्यांचा विषय होता सेंद्रिय शेती. फ्रान्सिस बोर्गेस खरं तर कॉलेजमध्ये प्राध्यापक होते. पण त्यांची प्रसिद्धी त्यांच्या झाडांविषयी असलेल्या माहिती आणि अनुभवाविषयी होती. सेंद्रिय शेती ते स्वत: करतात आणि अपूर्वाई नावाची त्यांची रोपवाटिका आहे. विकएंडर या गोव्यातल्या वर्तमान पत्रात ते साप्ताहिक सदरही चालवितात. माझ्या वडीलांनी मला त्यांच्या विषयी सांगून ठेवलं होतं. त्यामुळे त्यांचं भाषण ऐकायला मी अगदी उत्सुक होतो.

आपल्या भाषणात त्यांनी रसायनांच्या (खतं, कीडनाशकं आणि रोगनाशकं) परिणामांविषयी विस्ताराने सांगितले. रसायनांचा वापर अलीकडे केला जात आहे पण ते योग्य नव्हे, आपल्याला सेंद्रिय शेतीकडे वळायला पाहीजे कारण शेती करण्याचा तोच मार्ग हितकारक आहे, यावर त्यांनी जोर दिला. गांडुळांचा शेतीमध्ये मोठा वाटा आहे आणि ती शेतकऱ्यांचा मित्र आहे हे ही त्यांनी सांगितलं.

लोकांनी त्यांना खूप प्रश्न विचारले. घरच्या बगिच्यात काम करताना येणाऱ्या अडचणींविषयी लोकांचे प्रश्न होते. बोर्गेस सरांनी उत्तरादाखल स्वत: आचरणात आणलेले काही यशस्वी उपाय सांगितले. एकाने विचारलं, फुलं आल्यानंतर पपईचं झाड का मरतं? त्यांनी उत्तर दिलं, झाडाभोवती आळं केल्यामुळे झाडाला घातलेलं पाणी तिथं साठत आणि पपईचं खोड त्यामुळे कुजतं. या संदर्भात बोलताना त्यांनी आणि त्यांच्या मित्रांनी शोधून काढलेल्या वनस्पतीच्या रोगांवरच्या काही औषधांचीही माहिती सांगितली. पपया क्युअर या नावाने हे औषध बाजारात मिळते. भाषणानंतर मी घरी गेलो.

**सिओलीम**

पुढच्या वनस्पती उत्सवाला जेव्हा मी गेलो तेव्हा तिथं काय असणार हे आता मला कळलं होतं. या प्रदर्शनात मी सक्रीय सहभाग घेतला. आलेक्झी काकांनी मला या प्रदर्शनाचं आमंत्रण दिलं होतं. गोव्यातले ते सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार आहेत. सिओलिमच्या वनस्पती उत्सवाचे ते मुख्य होते. प्रदर्शनाचं नाव होतं 'ग्रीन हेरिटेज' (वनस्पतींचा वारसा) ग्रीन हेरिटेजचा उपक्रम अलेक्झी काका आणि त्यांचे मित्र यांनी काही वर्षापूर्वी सुरू केला. हा उपक्रम एवढा यशस्वी झाला की लोक दरवर्षी उत्सुकतेनं याच्या प्रतिक्षेत राहू लागले. ९५ सालचा ११ ऑगस्टचा दिवस. मी लवकरच उठलो आणि सायकलवरून सिओलीमला गेलो. पऱ्याच्या पलीकडे एका टेकडीवर हे निसर्गसुंदर खेडं वसलेलं आहे. अपेक्षे पेक्षा खूपच आधी मी अलेक्झी काकांच्या घरी पोहोचलो. आणि वाट पहात थांबून राहीलो. काका आणि त्यांची पत्नी टेकला हे जेवणाच्या वेळी घरी आले. जेवल्यावर अलेक्झी काकांच्या कायनेटिक होंडावर मी मागे बसलो. आणि प्रदर्शनात भाग घेणाऱ्या लोकांना भेटायला बाहेर पडलो. त्यांना भेटून आम्ही सांगितलं की, दुसऱ्या दिवशी सकाळी प्रदर्शनात ठेवायचं साहित्य तयार ठेवा.



दुसऱ्या दिवशी सकाळी अलेक्झीच्या आवाजानं मला जाग आली. 'चला पठ्ठे, जायला हवं.' त्यांनी आवाज दिला. काकांचं बोलणं म्हणजे शब्दांपेक्षा जास्त ध्वनीच! एखाद्या वाद्याच्या आवाजासारखे. माझ्या वडीलांच्या कॉलेजमधले ते मित्र! स्वभावाने गमत्ये. त्यांच्या बरोबर असणं म्हणजे हास्याची मेजवानीच.

त्या दिवशी सकाळी आम्हाला यादीतल्या लोकांच्या घरी जाऊन प्रदर्शनाचे साहित्य गोळा करायचे होते. टेंपो साडेनऊ वाजता आला. तिच्या तळाशी आम्ही थोडी झुडुंप पसरली, म्हणजे त्यावर कुंड्या ठेवणं सोईचं झालं असतं. कितीतरी घरी आम्हाला जायचं होतं. प्रत्येक वेळी आम्ही साहित्य घेतल की त्याला चिठ्ठी लावून नंबर द्यायचो. प्रदर्शनानंतर त्या त्या व्यक्तीना आपापली वस्तू परत मिळावी म्हणून हे करणं गरजेचं होतं. काही घरांमधून डॉबरमनसारखी कुत्री होती. त्यांच्या तावडीतून ती रोप आम्हाला अत्यंत सावधगिरीनं आणायला लागली. टेंपो भरली की आम्ही प्रदर्शनाच्या जागी यायचो, सगळं सामान, कुंड्या तिथं उतरवून आम्ही पुढील घरी जायचो. प्रत्येक खेप म्हणजे नविन लोक, घरं आणि बागा. एका खेपेला सुप्रसिद्ध पॉप सिंगर रेमोच्या घरी आम्ही गेलो होतो. त्याची आई प्रदर्शनात भाग घेणार होती. यादीतली घरं पुरी करायला आम्हाला संबंध दिवस लागला आणि एकूण आमच्या तीन खेपा झाल्या. मग शाळेतल्या बाकांवर आम्ही त्या कुंड्या ठेवल्या. मिगुल ब्रिगांझा (सरकारी खातात्यातील शेतकी अधिकारी) इंडीयन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च इन गोवा इथं सध्या त्यांची नेमणूक झाली होती. आणि फ्रांसिस बोर्गेस हेही तिथं उपस्थित होते. आणि खेड्यातली कितीतरी मुलं मुली अनेक तऱ्हेनं प्रदर्शन मांडायला मदत करत होते. आम्ही काम संपवलं तेव्हा मध्यरात्रीचा १ वाजून गेला होता. आणि सकाळी ९ वाजता प्रदर्शनाची सुरवात होणार होती तेव्हा आम्हाला वेळेत हजर राहून उरलेली लहान मोठी काम पुरी करायची होती.

ग्रीन हेरिटेज वनस्पती उत्सव तीन दिवस होता. शेतकी खात्याचे संचालक श्रीयुत पी. के. देसाई यांनी ११ वाजता प्रदर्शनाच उद्घाटन केले.(रिबीनीच्या ऐवजी एक वेल बांधलेली होती.) त्यांनी 'ग्रीन एड थ्री - संपूर्ण बागकाम.' ग्रीन हेरिटेज संस्थेनं काढलेल्या पुस्तकाचं विमोचनही त्यांनी केलं. पुस्तकाच्या भोवती कागदाच्या ऐवजी मनीप्लँटच मोठं पान गुंडाळलं होतं. अगदी अभिनव आणि साजेशी कल्पना वाटली मला ती. उद्घाटन आणि पुस्तक प्रकाशनानंतर त्या अधिकाऱ्यांनी भाषण केल आणि मग आलेक्झीचं विनोदाची पखरण असलेले भाषण झालं.

ग्रीन हेरिटेज कार्यक्रमाचे तीन भाग होते. १) प्रदर्शन, २)विविध विषयावरील भाषणं आणि ३) वनस्पती जगाशी संबंधीत अशा वेगवेळ्या प्रकारच्या स्पर्धा.

मुख्य प्रदर्शनाचा हॉल खूप मोठा होता. तऱ्हे तऱ्हेच्या वनस्पतींनी तो भरून गेला होता. आणि त्यांची मांडणी अशी केली होती की, लोकं त्याच्या मधून हिंडून त्या पाहू शकत होते. अदमासे २०० कुंड्या तिथे होत्या. भाज्यांचीही रोपे होती, म्हणजे मिरची, वांगी अशा, फुलझाड होती. कॉक्टस होते, वेली होत्या, फर्न होती, वड आणि पिंपळ यांची बोनसायही होती. संत्री, मोसंबी, चिकू अशी फळझाडंही कुंडी मध्ये होती. हॉलमधल्या स्टेजवर भाज्यांवरचं कोरीव काम आणि तऱ्हेतऱ्हेच्या पुष्परचना ठेवलेल्या होत्या. वेगवेगळ्या शाळेतल्या विद्यार्थ्यांच्या या रचना होत्या. हॉलच्या बाहेर दोन व्हरांडे होते. एका मध्ये शासकीय रोपवाटीका होती. तिच्या मध्ये कडुलिंब, आंबा, नारळ, चिकू, चिंच, काजू अशी झाडं विक्रीला होती. दुसऱ्या व्हरांड्यात इतर विविध वस्तू विक्रीला मांडल्या होत्या. एका लहान टेबलवर पुस्तकं ठेवली होती. बागकामा विषयी सर्वकाही हे आणि त्याच्या आधीचे दोन भाग जे आधीच्या प्रदर्शनात प्रकाशित झाले होते तेही उपलब्ध होते. एका टेबलावर नारळापासून केलेल्या विविध कलाकुसरीच्या वस्तू ठेवल्या होत्या. त्यात हत्तीच डोकं होतं, टेबल लँप होता, कवटी होती आणि हे सगळ नारळापासून केलेल होतं. याच्या शेजारीच 'द आदर इंडिया बुक स्टोअर' या स्टॉलवर पर्यावरण विषयक विविध पुस्तकं होती. आणि खालच्या अंगाला 'गार्डन ग्लोरी' हा स्टॉल होता. आणि इथे बागकामाची विविध आयुध ठेवलेली होती. त्यामध्ये गवत कापणीची यंत्रं होती, सिंचनांची आणि इतर काही साधनं होती. अपूर्वाईच्या स्टॉलवर सेंद्रिय खते ठेवलेली होती. त्यामध्ये शोभिवंत झाडं, पामचे आणि वेलींचे विविध प्रकार होते. आणि पानापासूनच खत, करंजीच्या झाडापासून बनवलेलं खत असं विकायला होत. लोणची, फळांचे अर्क,



पपईवरील औषधं हेही विक्रीला होते.

एका टोकाला कँटिन होत. तहान किंवा भूक लागली की, आम्ही तिथं जाऊन गार पाणी पिऊन किंवा काहीतरी खाऊन येत होतो.बिलाची मला चिंता नव्हती कारण ग्रीन हेरिटेज ग्रुप ते भरणार होतं. कँटिनच्या पुढे एक छोटं टेबल ठेवलं होतं. त्याच्यावर फळा, खडू आणि काही बाकं मांडली होती. ह्या ठिकाणी भाषणांचे कार्यक्रम व्हायचे होते. ह्या कार्यक्रमादरम्यान एकूण चार भाषणे झाली. ती अशी 'भाज्यांवरील कोरीव काम', जॅम आणि फळांचे रस बनवणं, 'वाईन बनवणं' आणि 'कॅक्टस.'

एका गृहस्थानं आपल्या घरामध्ये कॅक्ट्स वाढवले होते. ते अनुभव ऐकायचं मी ठरवलं. खूप मनोरंजक भाषण झालं त्यांचं. त्यात व्यावहारिक माहिती आणि कॅक्ट्स वाढविण्या विषयी उपयुक्त सूचना होत्या. आतापर्यंत मी कधीही कॅक्ट्स लावले नव्हते. पण तरी मी त्याची बारकाईन टिपणं घेतली. आणि ती माहिती आईला दिली. मला वाटलच होत, की तिला खूप आनंद होईल. कारण ती स्वतः कॅक्ट्सची बाग करत होती. त्यांत तीला मार्गदर्शन झाल. माझ्या माहितीतही भर पडली.

प्रदर्शनाच्या या तीन दिवसांमध्ये माझ्यावर साधी साधी काम सोपविली होती. म्हणजे मुख्य हॉलमधील रोपांवर, झाडांवर लक्ष ठेवणं, त्यांना पाणी घालणं, कुंड्या आणि इतर सामान पाहिजे त्या ठिकाणी ठेवणं, ग्रीन हेरिटेजच्या माहितीपत्रकांची विक्री संभाळणं इत्यादी. ॲलेक्झी बरोबर वावरत असल्यामुळे प्रत्येक कामात खूप मजा आली. शेवटच्या दिवशी बक्षिस सभारंभ झाला. ग्रीन हेरिटेज उत्सवामध्ये मदत केल्याबद्दल मला खास प्रमाणपत्र देण्यात आलं. त्याचा मला खूप अभिमान वाटला, उत्सव संपल्यानंतर याही वर्षीचा उत्सव यशस्वी पार पडल्याचा आनंद संयोजकांना वाटला. मी त्याचा एक भाग असल्याचा मला आनंद झाला. पण गंमतीचा भाग अजून पुढेच होता. त्या संध्याकाळी अम्ही सगळ्यांनी बारबेक्यू डिनर अरेंज केलं. आणि दुसऱ्या दिवशी पहाटेपर्यंत ते चाललं. त्यामुळे आम्ही फार झोपू शकलो नाही. शिवाय अजून लोकांच्या कुंड्या परत करायच काम शिल्लक होतं, सकाळीच आम्ही त्या कामाला सुरुवात केली.

ग्रीन हेरिटेज मधील माझं काम आणि ॲलेक्झीबरोबर राहणं मला आवडल. हे सगळं संपलं तेव्हा मला खूप वाईट वाटलं. ॲलेक्झीच्या घरी एक दिवस थांबून दुसऱ्या दिवशी मी घरी पोहचलो.

## कार्यानुभवाची टिपणे:

**घरी कॅक्ट्स वाढवताना**

कॅक्ट्स ही वाळवंटात वाढणारी वनस्पती. आपल्या बागेमध्ये शोभिवंत कॅक्ट्स जोपासताना ही गोष्ट विसरून चालत नाही. कारण त्या वनस्पतीचं जीवन त्यावर अवलंबून आहे. कॅक्ट्सला वरून कधीच पाणी द्यायचं नाही कारण ते कुजायला लागतं. कॅक्टसला एक मेणचट आवरण नेहमीच असतं आणि यामुळेच बाष्पीभवनातून होणारी पाण्याची वाफ याच्यातून होत नाही. कॅक्ट्सला वरून पाणी घातल तर ते मेणाचं आवरण धुऊन जातं आणि मग झाड कुजायला लागत. कॅकट्सला किती पाणी द्यायच हे हवामानावर आणि ऋतूवर अवलंबून आहे. उन्हाळ्यामध्ये कॅक्ट्सला दर चार तासांनी पाणी द्यायला लागतं. याउलट पावसाळ्याच्या दिवसांत पंधरा दिवसांनी पाणी दिलं तरी पुरेस होतं.

कॅक्ट्सला कमीत कमी दोन ते अडीच तासाचा सूर्यप्रकाश लागतो. पण सूर्यप्रकाशात त्यांना ठेऊ नये. कारण तीव्र सूर्यप्रकाशामुळे त्यांच्यावर सुरकुत्या पडतात. कॅक्ट्स दिवसा कार्बनडाय ऑक्साईड निर्माण करतात आणि रात्रीच्या वेळी ऑक्सीजन. म्हणूनच आपल्या निजायच्या खोलीमध्ये कॅक्ट्स ठेवले तर ते हवा शुद्ध करतात.

कॅकटस् रोप जर चांगल वाढायला हव असेल तर मग ज्या कुंडीत ठेवायचं तिचा आकार विचारपूर्वक ठेवायला हवा. झाडापेक्षा त्यांची कुंडी ही नेहमी लहान ठेवावी. त्याच कारण असं की, जीवनासाठी जर त्यांना संर्घष करावा लागला तर ती चांगली वाढतात. त्याची कुंडी जर खूप मोठी घेतली तर त्या रोपाला जगण्यासाठी संघर्ष करावा लागत नाही अशानं ते मरुन जाते. कॅक्ट्स ही माणसासारखीच असतात. प्रतिकुल परिस्थितीत ती चांगली वाढतात, तसंच कॅक्टस् वाढत नसेल तर पाणी देणं बंद करा. त्याचं वाढायच चिन्ह दिसलं तरच त्याला पाणी द्या. कॅक्टस्च्या कुंडीतला खालचा थर हा विटांचे तुकडे, कोळसा यांनी भरावा. त्यावर जाडसर वाळू आणि लहान लहान दगडगोटे पसरावे. झाडाची गळून पडलेली पानं हे त्याचं सर्वोत्तम खत.

कॅक्ट्सच कलम करणं फार सोप आहे. ज्या झाडावर कलम करायचे त्याच्यावर कॅक्ट्सचा एक अगदी छोटा तुकडा सेलोटेपनी चिकटवावा. जितका तुकडा लहान तितकं कलम करणं सोप. कॅक्ट्स पुन्हा लावायचा असेल तर कॅकटसचा एक छोटा तुकडा कापायचा काही दिवस तो सुकवायचा आणि मग कॅक्टसवर पसरून द्यायचा. त्याला आपली आपण मुळे फुटतील. कॅक्ट्स आणि कॅक्ट्स सारखी दिसणारी झाडे



यांच्यातील फरक ओळखणं फार सोप आहे. सगळ्या प्रकाराच्या कॅक्ट्सला त्याच्या प्रत्येक काट्याच्या बुडाशी मऊसर केस असतात. यांना आपण काटे म्हणतो पण खरंतर ती त्याची सुधारित पानंच असतात. आणि ती पाण्याचं बाष्पीभवन होऊ देत नाहीत. एखाद्याला जर कॅकटसचे काटे टोचले तर एक सोपा उपाय करायचा एक सेलोटेपचा तुकडा घ्यायचा, काटे टोचलेल्या जागेवर तो लावायचा आणि मग तो तुकडा ओढून काढायचा. सगळे काटे सेलोटेपला चिटकून निघून येतील.

▯

## प्रकरण ४

# अळंबी कशी वाढवायची-

ग्रीन हेरिटेज वनस्पती महोत्सवात भाग घेतल्याचा आणखी एक फायदा झाला. श्रीयुत मिगुल ब्रागांझा यांच्याशी माझी ओळख झाली. गोवा शासनात ते शेतकी अधिकारी होते. त्यांच्यामुळे अळंबी वाढवायच्या दोन दिवसांच्या अभ्यासवर्गाविषयी मला माहिती मिळाली. जुन्या गोव्यामध्ये इला फॉर्मवर इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चर रिसर्च यांच्या तर्फे ऑगस्टच्या शेवटच्या महिन्यात व्हायचा होता तो. स्वावलंबनाचा अनुभव घ्यायची माझी या प्रशिक्षण वर्गामुळे सुरुवात झाली. जरी गोव्यामध्ये कोर्स व्हायचा होता. तरी इला फॉर्मवर मी कधी गेलो नव्हतो. किंवा या कार्यक्रमातले कोणीही मला माहित नव्हते. श्रीयुत ब्रागांझा यांनी मला सांगितलं होत की , शिक्षण घ्यायला आलेल्या मुलांची कॅम्पसवर विनामूल्य राहण्याची सोय आहे. तिथं राहण काही सक्तीचं नव्हतं. पण मला वाटलं की गोव्यामध्ये संध्याकाळ नंतर सार्वजनिक वाहनांची चांगली सोय नसल्यामुळ पुष्कळ लोकं तिथच राहतील. मला स्वतःला बाहेरचे मुक्काम खुप आवडतात. म्हणून मी वडिलांना विचारल की मी कॅम्पसवर रात्री राहीन त्यांनी संमति दिली. तयार झाले ते. मात्र माझा तर्क चुकीचा निघाला. कॅम्पसवर राहणारा मी एकटाच होतो. २४ ऑगस्टला सकाळी वडिलांकडून रस्ता समजावून मी निघालो. आमच्या घरापासून हे कॅम्पस २२ किलो मीटर अंतरावर होतं. काही अडचण न येता मी तिथं पोहचलो. दारावर मला गेटपास घ्यायला लागला. उजवीकडच्या वाटेवर शेवटी आई. सी. ए. आरचं ऑफिस होतं. रस्त्याच्या दोन्ही बाजूला नारळ, पेरू आणि चिकूच्या बागा होत्या. ऑफिस पेक्षा ते एखाद्या प्रयोग शाळेसारखं दिसत होतं. तऱ्हे तऱ्हे च्या अळंब्यांचे प्रकार तेथे ठेवले होते. तिथे बसलेल्या माणसाजवळ मी चौकशी केल्यानंतर त्यानं मला शेतकी प्रशिक्षण केंद्राचा रस्ता सांगितला. प्रशिक्षण वर्ग चालवणारे श्रीयुत मिगुल ब्रागांझा आणि श्रीयुत ऑस्कर हे दोघेही तिथे होतेच. माझ्यासारखे प्रशिक्षणार्थी होते. पहिल्यांदा प्रशिक्षण वर्गासाठी आम्हाला नोंदणी वहीमध्ये आमची नावे नोंदवायला लागली. हे प्रशिक्षण पूर्ण केल्यावर ५०० रुपये भत्ता मिळेल असं त्यांनी सांगितलं. आम्हाला खूपच आश्चर्य वाटले.



जणू काही प्रशिक्षणार्थींना हा बोनस किंवा इन्सेंटिव्ह मिळणार होता. त्यात वाहतूक खर्च आणि जेवण खर्च धरला असावा. शिकायला आलेले एकूण ३३ जण होते. सगळेच माझ्यापेक्षा मोठे होते. बहुतेक सगळे शेतकरी होते. त्यामुळे माहिति सांगणाऱ्यांनी थोड इंग्रजीमधून, थोडी कोकणीमधून माहिती सांगितली. शिकवायला आलेले जर फक्त इंग्रजीतूनच बोलले तर श्रीयुत ऑस्कर ते कोकणी मध्ये भाषांतर करून सांगत.

प्रशिक्षणामध्ये भाषणं आणि प्रात्यक्षिकं यांचा समावेश होता. उंच सडसडीत, आणि लांब केस राखलेल्या नंदकुमार कामत यांनी आपल्या भाषणानं वर्गाची सुरुवात केली. त्यांनी पहिलाच प्रश्न विचारला अळंबी तुम्ही कशासाठी लावता आहात? घरातल्या बागेसाठी? लहान प्रमाणात उत्पादन करण्यासाठी? की मोठ्या प्रमाणात बाहेर पाठविण्यासाठी? तुमचं जे उद्दिष्ट आहे त्याप्रमाणे कोणती अळंबी वाढवायची आणि किती प्रमाणात हे ठरवायला हवं. पाठ घेताना त्यांनी विषारी, बिनविषारी अशा अळंबीच्या विविध जातींच्या पारदर्शिकाही दाखविल्या. त्यांचा पाठ लांबला खरा, पण मनोरंजक वाटला. त्यांचा पाठ संपला तेव्हा जेवणाची वेळ झालीच होती. त्यामुळ तो संपल्या संपल्या मी थेट कँटीनवर गेलो आणि जेवणावर ताव मारला. माशाच्या कालवणाला फक्त सहा रुपये लागले. दुसरं सत्र दुपारी तीनला सुरु झालं. यामध्ये दोन कार्यक्रम होते. पहिल्यामध्ये 'आय.सी.ए.आर.' चे एक शास्त्रज्ञ अळंबीवर हल्ला करणाऱ्या किडी आणि रोगांविषयी बोलले. विविध समस्यांविषयी बोलताना त्यांनी किडे, बुरशी, बॅक्टेरिया आणि अयोग्य नियोजन या समस्यांचा उल्लेख केला. पण त्यांनी जे उपाय सुचविले ते कीड आणि रोगप्रतिकारक अशा लिंडेन, मालथिऑन, डिक्लोरोज, कॉपर सल्फेट आणि सीट्रोनेला ऑईल एवढ्याच पुरते मर्यादित होते. त्यांनी सुयोग्य नियोजन आणि स्वच्छता याच्यावर भर दिला. कारण रोगांची सुरुवात ह्याच्या अभावानेच होते ना! आमच्यापैकी कुणीच आतापर्यंत अळंबीचं उत्पन्न घेतलेलं नव्हतं. त्यामुळे त्यांच्या भाषणांच्या शेवटी फारसे प्रश्न किंवा शंका कुणी विचारल्या नाहीत.

त्यानंतर एका बाईंच भाषणं झालं. त्यांनी अळंबीच्या पोषण मूल्यांविषयी माहिती सांगितली. अर्ध्यातासाच्या भाषणात त्यांनी सांगितल की, अळंबीमध्ये चरबीचं आणि शर्करेचं प्रमाण कमी असत. अळंबीमुळे हाडांची सांधे दुखी कमी होते, दातांना बळकटी येते आणि दाढातून रक्त येणं कमी होतं. ते ऐकूण मला असं वाटल की

आपण कायमच आहारात अळंबी खावी. या दिवशीचा कार्यक्रम संध्याकाळी सहाला संपला. त्याच वेळी मला कळलं की प्रत्येकजण घरी जाणार आहे. तिथं राहणारा मी एकटाच होतो. पण तरी मी तिथं रहायचं ठरवलं कारण आयोजकांनी सांगितलं की, प्रशिक्षणार्थींच्या राहण्याची व्यवस्था केली आहे, ज्यांनी पाहिजे त्यांनी राहावे.

ती संध्याकाळ आणि दुसऱ्यादिवशीची सकाळ मी कॅम्पसवर हिंडून काढली. आय. सी. ए. आर. ची तिथे एक लहान रोपवाटिका, फुलबाग, माशांचा तलाव, छोट्या प्राण्यांसाठी पिंजरे त्यामध्ये ससे, कोंबड्या होत्या, जनावरांसाठी गोठे आणि विस्तृत भात शेती होती. तिथं एक मोठी फळबागही होती. त्यामध्ये आंबा, चिकू, नारळ इत्यादी विविध प्रकारची फळझाडे होती.

या सगळ्या हिरव्यागार वातवरणामध्ये राहण्यासाठी इमारती आणि तिथलं कँटिन मध्यभागी होतं. चार मजली इमारतीच्या पहिल्या मजल्यावर माझी छोटी खोली होती त्यात दोन पलंग, कपाटं, टेबल आणि आरसा होता. बाकी कुणी तिथं थांबणार नसल्यामुळे माझ्या सोबतीला चौकीदार थांबला. कँटिनमध्ये स्वस्त आणि चांगल जेवण मिळालं. दुपारी इतरांबरोबर मी जेवलोच होतो. रात्री कुकनं माझ्यासाठी माशाची आमटी आणि भात बनवला होता. दुसऱ्या दिवसी सकाळी मी ब्रेड आणि भाज्यांची न्याहरी फक्त तीन रुपयात केली. त्या पहिल्या रात्री फारसं काही करायला नसल्यामुळ चौकीदार आणि मी कॅम्पसच्या मागील टेकडीवर जायच ठरवलं त्या टेकडीवर एक मंदिर होतं. दुसऱ्या दिवशीचा बव्हंशी भाग 'ऑस्कर'नीच घेतला. ऑस्करनं प्रत्यक्ष प्रयोगांवर भर दिला. अळंबीची वाढ कशी करायची या विषयीची उपयुक्त माहिती त्यांनी दिली. आणि मधून मधून पारदर्शिका आणि प्रात्यक्षिकं यांचा समावेश केला. त्यांनी आम्हाला प्रयोगशाळाही दाखविली. टिश्यूकल्चर (उतीसंवर्धन) करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञाना विषयी त्यांनी सांगितलं. आणि एक अल्ट्राव्हॉलेट ट्यूब दाखविली त्यामध्ये मातृबीज तयार केल जातं. प्रयोग शाळेत वर खाली करून आणि भाषणाच्या हॉलमध्ये ये जा करून गवतकाडी उकळायची कशी, अळंबीच्या पिशव्या भरायच्या कशा हे सगळ त्यांनी स्वतः करून दाखवलं. आम्हालाही ह्या पिशव्या भरण वगरे गोष्टीत स्वतः भाग घेता आला. सगळ्यांनाच ऑस्करच शिकवणं आवडलं. ते अजून लांबल असतं तरी चाललं असतं. विकण्याच्या उद्देशानं अळंबी उत्पन्न घ्यायचा अनुभव कुणालाच नव्हता. म्हणून ऑस्करनं दोन अनुभवी लोकांना बोलावलं होतं. ते स्थानिक बाजारामध्ये त्यांचा अळंबीचा माल पाठवतात, आणि निर्यातही करतात.



तेच आमच्याशी बोलायला येणार होते. गेले वर्षभर ते अळंबीचं उत्पादन घेत आहेत. ताजा माल ते विकतात. आणि काही माल मागणीप्रमाणे सुकवूनही विकतात. स्वानुभावर आधारित पुष्कळ व्यावहारिक गोष्टी त्यांनी आम्हाला सांगितल्या. ते म्हणाले रोज मी गवताच्या २०० पिशव्या भरतो. त्यांनी शेतातल्या कीड तसच 'रोग' या विषयी आणि सुरवातीला अळंबी विकताना आलेल्या अडचणींविषयी सांगितलं. कार्यक्रमाच्या शेवटी फार्मर्स ट्रेनिंग सेंटरचे संचालक यांच भाषणं झालं. त्यांनी शेतकरी प्रशिक्षण केंद्रा विषयी आणि आय.सी.ए.आर. विषयी माहिती सांगितली. काही विद्यार्थ्यांनी बाटलीत बीज भरुन घेतलं. मी नाही घेतलं. कारण घरी गेल्यानंतर अळंबी उत्पादनाला सुरुवात करणं मला शक्य नव्हतं. गोव्या बाहेर पुढील काही महिन्यात जायची माझी योजना ठरली होती. थोडक्यात काय, मी अळंबीच्या उत्पादनाच्या मागे लागलो नाही. मुख्य गोष्ट म्हणजे मी बरच काही शिकलो आणि पुष्कळ मित्रही मिळवले.

## प्रत्यक्ष कामाविषयी टिपण :

### अळंबीच उत्पन्न कस घ्याल

खाद्य अळंबीच्या पुष्कळ जाती आहेत. त्यातील ऑईस्टर आणि बटन मशरूम या दोन जाती अळंबी पिकवणाऱ्या आणि खाणाऱ्यांमध्ये सर्वात जास्त प्रिय आहे. अळंब्या मुळांसकट कुणीही खाव्यात कारण त्या लवकर पचतात आणि दोन तीन तासामध्ये रक्तामध्ये शोषल्या जातात. त्यांच्यामध्ये लोह, प्रथिन, कॅलशिअम आणि जीवनसत्त्वं यांचा समावेश असतो. गर्भवती स्त्रियांसाठी, मधुमेह असणाऱ्या लोकांसाठी आणि रक्तदाब असणाऱ्या लोकांनी अळंबी खाणे चांगले. त्याच्यामध्ये औषधी गुणधर्म असतात. त्याच्यामुळे हृदय, यकृत, रक्तातील कोलॅस्ट्रॉल आणि पोटाचा कर्करोग यांचे प्रमाण कमी होतं.

थोड्या गुंतवणूकीत फायदेशीर रित्या अळंबीच उत्पादन घेता येतं. अर्थातच अळंबी उत्पादनाचं तंत्रज्ञान, त्याची कार्यपद्धती आणि त्याच्या गरजा या सगळ्याचं पालन होण आवश्यक आहे. अळंबीच उत्पादन घेण्यासाठी जमीन लागत नाही. आपल्या घरातही अळंबीची लागवड आपण करू शकतो. मशरूमच्या वाढीसाठी हवामान २०° ते ३०° सेल्सिअस आणि ३० ते ९० अंश आर्द्रता यांची गरज असते. हवा पुरेशी खेळती राहणं, मंद उजेड या गोष्टी आवश्यक आहेत. जास्त उजेडामुळे

अळंबी काळ्या पडतात. खोलीतलं तपमान ३२ अंश सेल्सिअस पेक्षा वाढलं तर ओली पोती खोलीमध्ये लावून तपमान नियंत्रित करणं गरजेचं आहे. मात्र ही पोती सॅव्हलॉन, फॉरमॅलिन किंवा डेटॉलमध्ये निर्जंतुक करुन घेणे आवश्यक आहे. नाहीतर बुरशी किंवा बॅक्टेरिया यांचा हल्ला होऊ शकतो. खोलीच तापमान २० अंश सेल्सिअसपेक्षा खाली गेल तर लहान खोलीसाठी २०० वॅटचा बल्ब, तपमान विशिष्ट राखण्यासाठी अवश्य लावावा.

**बिज -**

अळंबीच उत्पादन बिजांपासून (स्पॉनपासून) होतं. चांगल्या बिजाचा रंग हा दुधी पांढरा असतो. त्याला गोडसर वास असतो, किंवा काहीवेळस नसतोही. ती बीजं घट्ट असावीत सर्व बाजूनी पांढऱ्या रंगाची आणि धाग्या धाग्याची असावीत. त्याचा रंग पिवळा असेल तर त्याचा अर्थ बीज जुनाट आहे. बिजावर दुसऱ्या रंगाचे पट्टे आले तर त्याचा अर्थ त्यावर बुरशीच आक्रमण झालं. बीज १८ ते २० दिवस एवढ्याच वयाचं असावं.

मातृबिज तयार करण्यासाठी चांगल्या दर्जाची बाजरी, गहू किंवा हरभरा यांची गरज आहे. यांचे दाणे सारख्या आकाराचे असावेत आणि निरोगी असावेत, रोगमुक्त आणि कोरडे असावेत. हे दाणे धुऊन घ्यावेत. पोकळ दाणे काढून टाकावेत. बाकीचे दाणे एक तासभर उकळून घ्यावेत, अर्धे कच्चे शिजवून घ्यावेत. उकळत असताना त्यात फॅरमॅलिन किंवा सॅव्हलॅन घालावे म्हणजे निर्जंतुक होतील. नंतर दाणे निर्जंतुक केलेल्या मऊसर मुसलिन कापडावर पसरावेत.आणि कॅलशिअम कार्बोनेटमध्ये मिसळावेत. त्यानंतर बाटलीमध्ये भरुन घट्ट झाकण लावून ठेवावेत. या बाटल्या बऱ्याचदा प्रेशर कुकरमध्ये ठेवतात.

लसीकरण, किंवा टिश्युकल्चरची- ऊतीसंवर्धनाची खोलीही आम्ही पाहिली. ह्या खोलीची उंची २.२ मीटर आणि लांबी २.५ मीटर एवढी असावी. दोन ट्युबज म्हणजे एक अल्ट्राव्होलेट ट्युब आणि एक नेहमीची ट्युब लाईट यात लावावी. स्पीरिटचा दिवा सुद्धा वापरतात. मातृबिजाच्या एका बाटलीपासून आपल्याला टिश्यूकल्चच्या मदतीनं सहा पिढ्यांपर्यंत उत्पादन घेता येतं. सहा पिढ्यानंतर बिजाची ताकद कमी होते. आणि अळंबीच उत्पादनही कमी होतं.

**खालचा थर**

भाताचं काड अळंबीच्या उत्पादनासाठी खालचा थर म्हणून पसरले जाते. इतर



अनेक प्रकारचा खालचा थर असू शकतो. म्हणजे लाकडाचा भुस्सा, पोती, केळीची पानं, आंब्याची सुकी पानं,नारळाची पानं, उसाची पातेरी, जंगली गवत किंवा भाताची तूस इत्यादी.

भाताची काडं काळजीपूर्वक निवडून घ्यावीत. ती चटकन तुटणारी पिवळी किंवा सोनेरी तपकिरी रंगाची असावी आणि सहामहिन्यापेक्षा जास्त जुनी नसावीत. ही काडं सूर्यप्रकाशात कित्येक दिवस वाळवलेली आसावीत. ती हवा बंद डब्यात साठवावीत आणि दोन महिन्यात त्यांचा वापर करावा. भाताची काडं आणि अळंबीच बिज याचं प्रमाण असावं एक कि. ग्रॅम वर सांगितलेल्या पद्धतीने बनवून घेतलेली काडं आणि चार टक्के बिजं.

**कृती**

पहिल्यांदा काडं तयार करून घेणे ती तीन ते पाच सेंटिमिटर कापून घेणे. नंतर कापडी पिशवीत घालून त्या पाण्यात भिजवाव्याते. (१ किलो ग्रॅम काडं १० लिटर पाण्यात भिजवावेत) १० तास त्यांचा भिजण्याचा अवधी असावा. काडं पाण्यात पूर्ण भिजतील याची काळजी घ्यावी.

पुढची पायरी म्हणजे गरम पाण्यात निर्जंतुक करून घेणे. ८० ते ८५ अंश सेल्सिअस इतक्या उष्णतेला पाणी उकळून घ्यावे. बुडबुडे यायला लागले. की कापडी पिशवीत पाण्यात भिजेलेली काडं पाण्यामध्ये पूर्णपणे बुडली आहेतना हे बघावं. आता बुडबुडे नाहीसे होतील, आणि पुन्हा येतील. बुडबुडे पुन्हा येऊ लागल्यावर अर्ध्यातासानंतर काडं पाण्यातून काढावीत. त्यातील पाणी पूर्ण कोरड करावं, आणि खोलीच्या तपमानाएवढे त्याचं तपमान राखाव, आणि स्वच्छ पृष्ठभागावर दोन तास वाळवावीत.

काडांच्या आर्द्रतेचे प्रमाण ६० टक्क्यांपेक्षा जास्त नसावं. या आर्द्रतेचा अंदाज घेण्यासाठी काही काडं आपल्या बोटांमध्ये पकडावीत आणि घट्ट पिळावीत एखादा थेंबच पाणी आलं तर आर्द्रतेच प्रमाण बरोबर आहे.

आता ही काडं भरण्यासाठी पॉलिथिनच्या किंवा पॉलिप्रापिलिन पिशव्यांची गरज आहे. या पिशव्यांचा आकार साधारण २५ बाय ३५ मिटर असा असवा आणि १५० ग्रॅम पेक्षा जास्त एका पिशवीचं वजन नसावं. वापरण्यापूर्वी सॅव्हलॉन, डेटॉल किंवा फॉर्मोलीनमध्ये त्या धुऊन घ्याव्यात. पिशवीच्या तळाशी एका कडेला चार धागे बांधावेत. या चार धाग्यांचे सुट्टे शेवट पिशविच्या बाहेर असावेत. आता ही पिशवी भरावी. पहिल्यांदा पाच सेंटिमीटरचा काडांचा थर भरावा. तो तळाशी घट्ट

दाबावा. मग त्यावर अळंबीची बिजं पसरावीत. पुन्हा १० सेंटीमीटरचा काड्यांचा एक थर दाबून बसवावा. त्याच्यावर पुन्हा बिज पसरावीत. असं करत पूर्ण बॅग भरावी. शेवटी वर ५ सेंटिमीटरचा काडांचा थर असावा. चार धाग्यांनी बॅग घट्ट बांधून टाकावी. या पिशव्या जमिनीवर ठेवाव्यात किंवा खोलीमध्ये टांगून ठेवाव्यात. टांगून ठेवल्यामुळे मशरूमच्या पिशवीच्या तळाशी आपण चटकन पोहचू शकतो. दुसऱ्या दिवशी निर्जंतुक केलेल्या सुईनं प्रत्येक पिशवीला ३० ते ३५ भोकं पाडावी. पिशवी अंधारात ठेवावी. पंधरा दिवसासाठी फारसं वारं लागू देऊ नये. त्यानंतर पिशव्या दुसऱ्या खोलीमध्ये ठेवाव्यात इथे त्यांना चार तास मंद लाईट मिळावा. आणि खोलीत समोरासमोरच्या वायुविजनाची सोय असावी. दिड दिवसांनंतर खालच्या तळावर दिवसांतून तीनदा शॉवरनं खालून वर असं त्यांच्यावर पाणी शिंपडावं. जणू काही पाऊस पडतोय असं पाणी मारावं. दुसऱ्या दिवशी टाचणीच्या डोक्या एवढी लहान लहान अळंबी दिसायला लागेल. आणखी दोन दिवसांनी पूर्ण वाढ झालेली अळंबी दिसू लागतील. या अळंबी ओढू नये नाहीतर त्याच्या बरोबर त्याचा खालचा थर ओढला जाईल त्या कापून घ्याव्यात किंवा तळापासून मुरगळून वेगळ्या कराव्यात. तळातला थर जर कोरडा वाटला तर पिशवी पाण्यात बुडवून लगेच वर काढावी. किंवा पाण्याचा फवारा पिशवीवर मारावा. अळंबीचं दुसरं पिक एक आठवड्यानी पुन्हा मिळेल. असं चार वेळेला उत्पादन घेता येईल. त्यानंतर पुन्हा नव्यानं सुरुवात करावी. याच कारण असं की चार वेळा पिक घेतल्यानंतर तळातला थर रोगग्रस्त होऊ शकतो, त्याला रोगसंसर्ग होऊ शकतो.

### किडी आणि रोग

अळंबीवर किडींचा आणि रोगाचा मारा फार लवकर होतो. म्हणूनच त्यांची अतिशय काळजी घ्यायला लागते. आणि त्यांचं व्यवस्थापन चांगल असावं लागतं. अळंबीच्या दोन प्रसिद्ध जातीपैकी बटन अळंबी रोगाला लवकर बळी पडते. तर ऑईस्टर अळंबी ही जास्त सशक्त आहे.

अळंबीवर हल्ला करणाऱ्या किंडीमध्ये स्किरीड माशी, फॉशीड माशी, स्प्रिंगटेल (नाकतोड्यांसारखे लहान किटक) आणि माईटस हे आहेत. अळंबीवर किंडीचा हल्ला होऊ नये म्हणून अळंबीच्या पिशव्या जमिनीपासून निदान एक फूट वर टांगाव्यात. गंधकांनी आधी खोल्या निर्जंतुक करून मग पिशव्या भराव्यात. सिट्रोनेला तेल पाण्यात मिसळून पिशव्यांवर त्याची फवारणी करायला हरकत नाही. आरोग्याची जास्तीत



जास्त काळजी घेऊन आणि सर्व उपाययोजना करून किटकांचा हल्ला होणार नाही असं बघावं. बॅक्टेरिया आणि निमॅटोड्स यांच्या पासून फार जपाव लागत. जास्त आर्द्रता असेल तर बॅक्टेरिया आढळतात. आणि ओलसर कुजलेले किंवा तपकिरी डाग असे दिसतात. हे टाळण्यासाठी आर्द्रतेचे प्रमाण सतत नियंत्रित करत राहणं ह्याची फार आवश्यकता आहे. निमॅटोड्स च्या हल्ल्यापासून बचाव करण्यासाठी खालचा थर सतत बदलत राहावा. सहा महिने ते एक वर्षा या पेक्षा तो जास्त जुना नसावा. भाताच्या काडाची निवडही काळजीपूर्वक करावी. आणि ते पूर्णपणे निर्जंतुक करून घ्यावे. रोग दिसला तर पोटॅशिअम परमॅगनेट १०० ग्रॅम किंवा २० मिलीलिटर फॉरमॉलिन पिशव्यांवर फवारावे.

## प्रकरण ५

# केरळची सहल

ऑगस्ट महिना संपत आला होता आणि पावसाळाही. माझ्या कार्यक्रम पत्रिकेतील बऱ्याच जागांना मला भेट द्यायची होती. गोव्यातून बाहेर पडायला मी उत्सुक होतो. गोव्यात एकट्यान मी अगदी सहजतेने वावरू शकत होतो. (कारण इथे भाषा एकच असल्यामुळे मी कुणाशी ही बोलू शकत होतो) मार्ग विचारणं, खायचे पदार्थ विकत घेणे, आणि लहान रक्कमा हाताळणं हे सगळं आता मी करू शकत होतो. आता गोव्या बाहेर जाण्यासाठी मी उताविळ झालो होतो. मी बाहेर प्रवासाला निघालो होतो त्याचं आणखी एक कारण होतं. दहावीनंतर मी कॉलेजमध्ये का नाही गेलो आणि मी करतोय तरी काय या, माझ्या मित्रांच्या आणि शेजारांच्या प्रश्नांनी मी अगदी भंडावून गेलो होतो. आवडत्या गोष्टी माझ्या मनाप्रमाणे शिकण्यात मला खूप आनंद होतो, गंमत येते या गोष्टीवर काही कुणाचा विश्वास बसत नव्हता. इथून आपण बाहेर पडलो तर या सगळ्या प्रश्नांपासून आपली सुटका होईल असं मला वाटलं.

त्याचं झालं असं की माझे बाबा सेंद्रिय शेतीवरील एका चर्चासत्राला उपस्थित राहण्यासाठी कोट्टायमला जायचे होते आणि त्याच वेळी ते अन्य काही ठिकाणी सेंद्रिय शेतीला भेट देणार होते. त्यांना वाटलं मी त्यांच्या बरोबर आलो तर बरच! भेटीमध्ये आम्ही केरळलाही जाणार होतो.

१९९५ सालच्या ३० ऑगस्टला बाबांनी आणि मी गोवा सोडला. पणजीहून सकाळी सहाला बस सुटली आणि संध्याकाळी ४ वाजता बेंगलोरला पोहचलो. वाटेत आम्हाला कारवार, अंकोला, कुंमठा, होनावर, कुंदापूर आणि उडुप्पी ही ठिकाणे लागली. बेंगलोर हे आमच्या पूर्वजांच घर. माझ्या बाबांचा जन्म मुंबईत झाला. तिथेच ते मोठे झाले. आणि लग्नानंतर ते गोव्यात राहत असले तरी मूळचे ते बेंगलोरचे. बेंगलोरला आता आमच घर नाहीये. पण आमचे पुष्कळ नातेवाईक तिथे आहेत. आम्ही आमच्या चुलत आजोबांच्या घरी राहिलो. बसस्टॅण्डला हे जवळ होतं. बेंगलोरशहराच्या मध्यभागी ही दोन मजली इमारत आहे. आणि माझी चुलत



आजी मोनिका आपल्या तिन मुलांसह तिथे राहते. रेगी, पेट्रीक, लँबर्ट ही तिच्या मुलांची नावे, आणि त्यांचे कुंटुंबिय एकत्र कुटुंबाप्रमाणे तिथे राहतात. जे. एस. अल्वारिस कोंकणी भाषेतील सुप्रसिद्ध लेखक होते. काही वर्षापूर्वी ते निवर्तले, ते माझे चुलत आजोबा. माझ्या काकाकाकूला आणि चुलत भावंडाना मी पहिल्यांदाच भेटणार होतो. त्यांच्या घरी आगत स्वागत झाल्यावर आम्ही चहा घेतला आणि खाल्लं आणि मग बाबांनी मला शहरात हिंडवलं. कोट्टायमचं चर्चासत्र संपल्यानंतर गोव्याला परताना मी एकटाच असणार होतो. त्यामुळे शहरातल्या प्रत्येक खाणाखुणा मी पाहून घेतल्या, लक्षात ठेवल्या. परतीच्या प्रवासात माझ्या वाटा चुकू नयेत म्हणून मी अगदी काळजी घेत होतो. रेल्वे स्टेशनची जागा, बेंगलोरचे मध्यवर्ती हंप्पन कट्टा, जुना बस स्टॅण्ड, आणि मोनिका काकूंच्या घराचा रस्ता मी नीट पाहून घेतला. आल्यावर आम्ही रात्री मस्त जेवलो आणि लवकर झोपून गेलो. पुढच्या प्रवासासाठी आम्हाला पहाटे तीनला उठायच होतं. आमच्या गाडीनं सव्वाचार वाजता बेंगलोर सोडलं. प्रवास करत हिरवीगार शेत पाहतं. कन्नूर, कालिकत, त्रिचूर, एर्नाकुलम ही स्टेशनं घेत आम्ही कोट्टायमला दुपारी पावणेचारला पोहोचलो. हॉटेल ‘ऐश्वर्या’मध्ये बुकिंग होतं. आंघोळ करून मी ताजा तवाना झालो आणि मग शहरात भटकायला बाहेर पडलो. पण पावसाला सुरुवात झाली आणि आम्हाला लवकर परताव लागलं.

हॉटेल ग्रीन पार्क इथं चर्चासत्र होतं. त्यासाठी सकाळीच आम्ही बाहेर पडलो. आमची नोंदणी आधीच झाली होती. आम्हाला कापडी पिशवी, पेन, नोटबुक चर्चासत्राच्या सुरुवातीला दिल गेलं.तिथं विकायला किती तरी वस्तू होत्या. अगदी सेंद्रिय चहा, लोणची इथं पासून ते पुस्तकं, पुस्तिका आणि मॅन्युअल्स् इथपर्यंत. भोवताली फारसं बघता आलं नाही कारण संयोजक उद्घाटनासाठी सर्वांना बसून घ्या असं सांगत होते. दिवसभर भाषणं, तीही बहुतेक वेळा शास्त्रज्ञांची होती. हे सत्र संध्याकाळ पर्यंत चाललं. फक्त मध्ये शाकाहारी भोजन झालं. सर्व भाषणांमध्ये माझं लक्ष वेधून घेतलं, ते डॉक्टर इस्माईल यांच्या गांडुळावरील भाषणाने. त्यांचा भाषणांचा गोषवारा द्यायचा मोह आत्ता टाळतो कारण त्यांच्या संर्पकात राहून त्यांच्या कामाविषयी घेतलेल्या माहितीविषयी स्वतंत्र प्रकरण या पुस्तकात नंतर आलेलं आहे.

दुसऱ्या दिवशी सकाळी असाच कार्यक्रम होता. मात्र त्या मध्ये शेतकऱ्यांचा सहभाग असलेलं एक सत्र होतं. त्याचे अध्यक्ष माझे वडिल होते. पुष्कळ शेतकरी सेंद्रिय शेतीच्या त्यांच्या अनुभवाविषयी बोलले. मला ते फारच रंजक वाटले. दुपारच्या

जेवणानंतर माझे वडिल आणि मी गुरु ऋषीप्रभाकर ('सिद्धसमाधी' कार्यक्रमाचे संस्थापक) आणि कार्तिकेयन (सेंद्रिय शेतीवरील पुस्तकातील काही प्रकरणाच्या संशोधनासाठी ते काम करत होते.) यांच्यासह सेंद्रिय शेती करणाऱ्या केटी थॉमस यांच्या शेतावर गेलो. त्यांनी त्यांचं कोळंबीचं तळं दाखवलं. रबराची लागवड, गाई, मासे पकडायचे तळं, फळबाग, मोठ्या बाबूंचा फिल्टर वापरुन तयार केलेल तळ इत्यादी गोष्टी पाहिल्या. त्यांच शेत खूपचं मोठ्ठ होतं आणि रात्री ते एखाद्या जंगलासारखं अंधारं आणि दमट असं होतं. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही कालिकतची गाडी पकडली. एर्नाकुलम आणि त्रिचुर वरुन आम्ही पुढे गेलो. शोरणपूरला आम्ही गाडी बदलली. स्टेशनवर उतरून सुलतानची बॅटरी ही बस आम्ही घेतली. इथे आम्ही हॉटेल रिझॉर्टवर एक रात्र काढली. नेहमीप्रमाणे शहरातून भटकतांना आमचा वेळ मजेत गेला.

वायनाडला आमचा पुढचा कार्यक्रम होता. सेंद्रिय शेतीमध्ये रस असणाऱ्या आणखी काही व्यक्तींची इथे बैठक होती. वायनाडच्या वन्यजीव विभागाच्या गेस्ट हाऊसला आम्ही थांबलो. या ठिकाणचा मेळावा फार मोठा नव्हता. आणि छोटीशी पण सखोल चर्चा त्यांनी केली. मला काही फारसा रस त्यामध्ये वाटला नाही म्हणून मी मन मानेल तसा भटकत राहिलो. पण त्या लोकांचा सहवास मला आवडला. कारण त्यांचा अनुभव मोठा होता, आणि ज्ञानाचा साठा त्यांच्याकडे होता, शिवाय ते कृतिशिल होते. त्यांच्यापैकी आरोव्हिलचे बर्नाड, अहमदाबाचे कोरा माथेन, त्यांची मुलगी अहमदाबादची निधी आणि ओंकार यांना या सुट्टीच्या अवधीत भेटायचं मी ठरवलं.

आम्ही सकाळ संध्याकाळ जंगलामध्ये लांब लांब पर्यंत चालत जायचो. पहिल्याच दिवशी आम्हाला निलगिरी लंगूर दिसले. त्याशिवाय छोटे छोटे पक्षी, बेडूक आणि वृक्षपण दिसले.

संध्याकाळच्या वेळी संयोजकांनी आम्हाला भवानी नदीमधील प्रदुषणाविषयी दोन फिल्मस दाखविल्या. त्यानंतर एक अगदी लोकप्रिय आणि सुंदरशी फिल्म 'ॲनिमलस आर ब्यूटिफूल पिपल' ही फिल्म आम्ही पाहिली.

वायनाडच्या दुसऱ्या दिवशीच्या फिरण्यामध्ये आम्ही कांचनमृगांचा कळप बघितला. आणि बार्किंग डिअर ही पाहिले. अनेक प्राण्यांच्या पायाचे ठसे आम्ही पाहिले. विशेषतः हरीण, आणि हत्तीच्या पावलांचे ठसेही. हा अनुभव थरारक वाटला



आणि त्यानंतर जो कोणी चालायला उत्सुक असे त्याच्या बरोबर मी चालायला जात असे. तिसऱ्या दिवशी श्री. शिवानंद यांनी पश्चिम घाटाविषयी भाषण दिलं. त्यांनी आम्हाला काही पारदर्शिकाही दाखविल्या त्यामध्ये पश्चिमघाटातील किटकभक्षी वनस्पती, पहाडी बकऱ्या, पाण्याची वाफ साठून झालेल्या नद्या आणि दर १० वर्षातल्या वनस्पती आणि फुलं आम्ही पाहिली. आतापर्यंत भूगोल आणि शास्त्र या विषयामध्ये शाळेमध्ये जे शिकलो होतो ते जिवंत झालं.

त्यादिवशी संध्याकाळी आम्ही दोन सिनेमे बघितले होते. एकाच नाव होत 'द व्हिसलिंग हंटर' ( जंगली कुत्र्यांविषयी) आणि दुसरीचं नाव होत 'द लॉर्ड ऑफ द जंगल' -(हत्तींविषयी) दोन्ही अगदी छान होत्या. दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही फिरायला गेलो तेव्हा फक्त पक्षी पाहिले. त्यादिवशी आम्ही चक्क १२ किलो मीटर चाललो. त्या दिवशी कार्यक्रमाचा समारोप होता. संध्याकाळच्या वेळी वनखात्यानं आमच्यासाठी जंगलातून एक फेरी आयोजित केली होती. आम्ही खूप चाललो, निरीक्षण मनोरा पाहिला, त्यानंतर हरणं आणि रानडुक्करं पाहिली. पण आम्हाला लवकरच परताव लागलं कारण आम्ही वाघाचे ठसे पाहिले. रात्री आम्ही आणखी दोन सिनेमे पाहिले एकाचं नाव 'अ व्हॅली रायझेस्' ही नर्मदेवर होती, आणि दुसरी होता 'द सायलेंट व्हॅली'.

बैठक संपल्यानंतर ठरल्याप्रमाणे माझे बाबा कामासाठी चेन्नईला जाणार होते. आणि मी एकटा गोव्याला परतणार होतो. बाबा माझ्याबरोबर बसनी कालीकतपर्यंत आले. रेल्वेस्टेशनवर त्यांनी बेंगलोरचं तिकिट काढलं आणि दोन वाजता त्यांनी मला स्टेशनवर सोडलं. माझी गाडी चार वाजता होती.

आयुष्यात पहिल्यांदाच मी एकट्यानं प्रवास करणार होतो. आणि मी थोडा घाबरलो होतो. गाडी यायला अजून दोन तास होते. पण मला काही झोप नाही लागली. माझ्याजवळ बॅटरीवर चालणारा एक व्हिडिओ गेम होता. आणि गाडी येईतोवर मी त्याच्यावर खेळत बसलो. गाडी आल्यावर सगळी गर्दी दारातून घुसायला लागली. मी एक दोघांना विचारलं की त्यांचे सिट नंबर काय आहेत. पण कुणीच माझ्याकडं लक्ष दिल नाही. म्हणून मी एक छान जागा पकडून बसलो. गाडीनं स्टेशन सोडलं. संपूर्ण प्रवासात मी अगदी सावध होतो. आणि माझ्या सामानावर माझं सतत लक्ष होतं. (माझ्याजवळ हॅवर सॅक आणि स्लिपिंग बॅग दोन्ही नवीन होतं.) पॉकेटमार आणि इतर चोरांविषयी मी ऐकल होतं आणि त्यामुळे मला दुप्पट काळजी वाटत

होती. स्टेशनवरसुद्धा मी उतरलो नाही. गाडी सुटेल ही भीती मला होती. बाबांनी दिलेली फळं तेवढी मी खाल्ली. बेंगलोर स्टेशनवर गाडी पोचली. चुलत आजीकडे जाण्यासाठी मी रिक्षा पकडली. ३० रुपये पडले. बापरे! केवढे पैसे, परंतु एकतर रात्र होती आणि रस्त्याची मला खात्री नव्हती. म्हणून रिक्षावाल्याशी मी वाद घातला नाही. माझी काकू आणि तिच्या कुटुंबियांना मला पाहून आनंद झाला. आणखी राहयचा त्यांनी आग्रह केला. पण आई माझी काळजी करत असणार आणि मी तिला बेजवाबदार वागतोय अस वाटू नये म्हणून ठरल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी घरी जायचं मी ठरवलं.

सकाळी माझा चुलत भाऊ 'रेगी'च्या स्कुटरवर बसून आम्ही बस स्टेशनवर गेलो. एक बस गोव्याला सुटतच होती. मी पटकन आत उडी मारली आणि शेवटची जागा पकडली. बस पणजीला संध्याकाळी पाचला पोहचली. तिथून मी म्हापशाला जाणारी दुसरी बस पकडली. जेव्हा म्हापशाच्या बसस्टॅण्डवर बस पोहचली तेव्हा मी परिचित वातावरणात आलो. रस्त्यावरील ओळखीची कुत्री, फिरस्त्यांचे स्टॉल पाहून मला घरी आल्या सारख वाटलं. एका मोटर सायकलला मी हात केला. घर तिथून ३ किलोमिटर अंतरावर होतं. मी घरी पोहचलो आणि माझ्या स्वागताला हसत समोर आलेल्या आईकडे थेट गेलो. माझ्या भावांनी मला गुद्दे मारले. माझा कुत्रा मला चाटायला लागला.

हत्तींच आणि वाघांच्या ठशाचं जग किती दूर राहिल होतं!

□



## प्रकरण ६

# जिवंत सापांच्या दुनियेत

पुण्याच्या सर्पोद्यानाचे संचालक आहेत, श्री. नीलिमकुमार खैरे. अनेक पत्रे आणि फोन केल्यानंतर बाबांचा त्यांच्याशी संपर्क झाला. शेवटी एकदाचा हिरवा दिवा मिळाला आणि मी तिकडे जायला तयार झालो. ही व्यवस्था काही पक्की नव्हती. त्यामुळे माझ्या बाबांनी माझ्याबरोबर पुण्याला यायच ठरवलं. ते चेन्नईहून आल्यानंतर ३ ऑक्टोंबरला आम्ही निघालो. गोव्याहून आम्ही बसमधून निघालो आणि दुसऱ्या दिवशी पुण्याला पोहचलो. पुण्याचे सुजित आणि विद्या पटवर्धन हे माझ्या आईवडिलांचे चांगले मित्र होते. आदल्याच वर्षी आम्ही सगळेच जण म्हणजे मी आई, बाबा, माझे दोन भाऊ आणि मी त्यांच्याकडे सुट्टीला राहिलो होतो. त्याच वेळी पुण्याचं सर्पोद्यान मी पाहिलं होतं आणि तेव्हाच शाळेनंतर १ वर्ष सुट्टी घ्यायचं बिज माझ्या मनात रुजलं. त्यांच्या मुलीशी 'बाणी'शी नंतर माझी चांगली मैत्री झाली होती. तिनं सांगितलं की, तिची बहिण लारा आणि तिची मैत्रिण काही वर्षापूर्वी शाळेतलं शिक्षण संपल्यावर सुट्टी घेऊन देशभर फिरल्या होत्या. त्यावेळी त्यांनी शिक्षणाच्या पर्यायी पद्धतींचा अभ्यास केला होता. हे ऐकून मी चांगलाचं आश्चर्यचकित झालो. गणेशखिंड रस्त्यावरील पटवर्धनांच्या घरी आम्ही आधी गेलो. थोडी विश्रांती घेऊन ताजं तवानं झाल्यावर आम्ही सर्पोद्यानात गेलो. संचालक श्रीयुत खैरे त्यावेळी नव्हते. पण उपसंचालक श्री राजन शिर्के यांना मी येणार असल्याचं माहित होतं. आणि त्यांनी माझ्या वडिलांना सांगितलं होतं की खैरे आल्यानंतर माझ्या राहण्याची आणि जेवण्याची सोय होईल. तो पर्यंत उद्यानामध्ये मी पूर्ण दिवस हिंडू शकेन पण रात्री मात्र सुजित काकांकडे जायला लागणार होतं. आता माझ्या वडिलांपुढे मला तिथेच सोडून जाण्याशिवाय पर्याय नव्हता. कारण खैरे तीन दिवसांनंतर येणार होते. बाबा मला उद्यानात सोडून मुंबईला गेले. त्यामुळे पहिले काही दिवस मी सुजित काकांच घर आणि उद्यान अशा फेऱ्या मारत राहिलो.

सुजित काकांच घर 'गणेशखिंड'ला तर सर्पोद्यान होतं 'कात्रज'ला. चांगलं वीस किलोमिटर अंतरावर पहिल्या दिवशी मी रस्ता चुकलो. बाबांनी सकाळी मला बसस्टॅण्ड

दाखवला होता. आणि बसचा नंबरही सांगितला होता. संध्याकाळी कर्मचाऱ्यांपैकी एकानं मला बसस्टॅण्डवर सोडलं तिथं मी खूप वेळ वाट पाहिली, पण बस आलीच नाही. आसपासच्या लोकांना मी विचारलं त्यांच उत्तर येईल. पण एखादेवेळी उशीर होतो.

एवढ्यात पाऊस सुरु झाला. त्या बस स्टॅण्डला निवारा नव्हता. त्यामुळे मी पावसात भिजत राहिलो. शक्यतोवर माझी वही डोक्यावर धरून मी पावसापासून बचाव करण्याच्या प्रत्यनात होतो. पण आश्चर्य म्हणजे कित्येक मुलं पावसाची पर्वा न करता निवांत पणे पावसातून जात होती. जणूकाही पाऊस पडत नव्हता. संध्याकाळी सात वाजले तेव्हा मी नखशिखांत भिजलो होतो. माझे पाय गारठले होते आणि अंधार पडायला लागला होता. सर्पोद्यानांतील माझ्या पहिल्या दिवसाचा हा अनुभव असा होता.

शेवटी मी रस्ता ओलांडून टेलिफोन बुथवर गेलो. सुजित काकांना फोन करत होतो तेवढ्यात विज गेली. काका मला दुसऱ्या रस्त्याने येण्याविषयी सांगत होते. माझ्या ओल्या वहीवर मी डेक्कनजिमखाना आणि सिमला ऑफिस लिहीलं. डेक्कनजिमखान्यावर जायला मला बस मिळाली. कारण तिकडे जाणाऱ्या बऱ्याच बस होत्या. सिमला ऑफिसपासून घरी जायला मी रिक्षा केली. बस आणि रिक्षावर अवलंबून राहण्यापेक्षा सायकल किती सोयीची! मला माझ्या सायकलीची खूपच आठवण झाली.

पार्कमध्ये पहिले दोन दिवस मी टिपणं खरडत होतो. आणि कामगारांचं निरिक्षण करत होतो. मी त्यांच्याशी दोस्ती केली. त्याचाच परिणाम म्हणून की काय मला त्यांनी एक 'ट्रिंकेट' साप हाताळायला दिला. तिसऱ्या दिवशी श्री. नीलिमकुमार खैरे आले आणि पार्कमध्ये राहण्याची सोय नसतानाही त्यांनी माझी तिथे सोय केली. कितीतरी विद्यार्थी तिथे येत होते, थोडावेळ काम करत होते. पण त्या सगळ्यांची घर पुण्यात होती त्यामुळे संध्याकाळ झाल्यावर ते घरी जायचे.

खैरे सगळ्या कामगारांमध्ये खूपच लोकप्रिय होते आणि त्यांच्या सकट सगळे त्यांना 'अण्णा' म्हणतं. ते नेहमी हातमोजे आणि लांब बाह्यांचा शर्ट घालत. खूप वर्षांपूर्वी घोणस हा विषारी साप चावल्यामुळे त्यांना डावा हात गमवावा लागला होता. असं असूनही सरीसृपांविषयीचं त्यांचं प्रेम आणि कुतुहल जरासुद्धा उणावलं नव्हतं. हे सर्पोद्यान खूप मोठ्ठ आहे आणि सर्पांसाठी तिथे बरेच हौद केले आहेत.



त्यांत विविध जातींचे सर्प राहातात. मध्यभागी प्रशासकीय बैठी इमारत आहे. त्या तिथे तळमजल्यावर लहानसं ऑफिस आहे. तिथं पाहुण्यांचही आगत स्वागत होतं, तिथंच किंगकोब्रा म्हणजे नागराज आणि अजगरांना ठेवलं आहे, एका अंगाला साठवणीची खोली आणि स्वच्छतागृह आहे. पहिल्या मजल्यावर एक मोठी खोली आणि तिच्यांत दोन पलंग होते. मी इथंच राहू लागलो. रात्री सोबतीला वॉचमन होताच. अण्णांनी तिथं छोटा टीव्ही बसवला आणि माझ्या या खोलीत टेलिफोनचं एक जोड कनेक्शनही दिलं. त्यांच्या घरी केव्हाही जाण्याची, खाण्याची, राहण्याची मुभा मला होती. मी मात्र उद्यानांतच राहण्याचं ठरविलं.

अण्णा आणि शिर्के यांच्या व्यतिरिक्त उद्यानांत ८-१० कर्मचारी नियुक्त होते. त्यांच्यापैकी काहीजणांशी- महेश, मिलिंद, भूषण आणि बाबा यांच्याशी माझी चांगलीच दोस्ती झाली. पुष्कळसे विद्यार्थी रात्रशाळेत शिकत होते आणि दिवसा इथं काम करत होते. रविवारी किंवा इतर सुट्टीच्या दिवशी बरेच वेळा नेहमी पेक्षां जास्त विद्यार्थी तिथं मदतीला यायचे. सगळे पुण्यांत राहणारे होते त्यामुळे रात्री ते घरी जायचे. पण बरेच वेळां त्यांच्यापैकी काहीजण रात्री माझ्याबरोबर थांबायचे. मग आम्ही टी.व्ही बघायचो किंवा ते मला गोष्टी सांगायचे मी रोज रात्री जेवल्यानंतर माझी दैनंदिनी नियमितपणे लिहायचो आणि काही वेळेस रात्री वाचत बसायचो.

उद्यानांतील माझे काम म्हणजे कामगारांना त्यांच्या कामांत मदत करायची. सापांबद्दल माहिती मिळवायचा तो एक चांगला उपाय होता. मी रोज चांदणीपाठींच्या - स्टारबॅक कासवांची, टर्कीची, कोंबड्यांची घरं, खळगे साफ करायचो. नंतर तर धामणीचे, चेकर्ड कील बॅकचे (विरूळा)आणि घोरपडीचे, हौद साफ करायचो. सापांना खाऊ घालायला मदत करायचो. हे काम बहुधा एका आठवड्यानं केलं जायचं. बहुतेक सापांचं अन्न म्हणजे प्रयोगशाळेतीले पांढरे उंदीर आणि बेडूक अजगराला मात्र खायला आठवड्यांतून एकदा कोंबडी मिळायची.

सापांना कसं हाताळायचं ते मी शिकलो. तिसऱ्याच दिवशी कवड्यासाप मला चावला. हा साप बिनविषारी असतो. लहानपणापासून आजीकडून आणि इतरांकडून सापांविषयी आपण अनेक हकीगती ऐकलेल्या असतात त्यामुळे त्यांच्याविषयी आपले फार गैरसमज असतात. मला साप चावण्याचा अनुभव देण्या मागे, माझी सापाविषयीची भीती जावी हे कारण होतं. मला झालेला सर्पदंश फारशा वेदना देणारा नव्हता आणि इतर जखमांवर जसा उपचार करतात तसाच उपचार मी घेतला.

माझ्या सर्पोद्यानातील मुक्कामात अनेक प्रसंगी विविध प्रकारच्या बिनविषारी पण तापट स्वभावाच्या सापांचे दंश मला झाले. आणि तीन आठवड्यांनी मी तिथून बाहेर पडलो. तेव्हा १५ - २० दंशाचे व्रण माझ्या हातावर होते. काही दंश खरोखरच खूप वेदना देणारे होते. एक दंश तर इतका वाईट होता की त्यामुळे माझं मनगट इतकं सुजलं की मला त्यावर घड्याळ बांधता येईना. पण या दुःखावर फुंकर मारणारी गोष्ट अशी की दंश करणाऱ्या सापांचं यांत जास्त नुकसान होते म्हणजे दंश करताना त्यांचे काही दातच पडून जातात अर्थात सगळे साप बिनविषारी असल्यानं प्रतिबंधक उपाय करण्याची गरज कधी पडली नाही आणि सर्पदंशापेक्षा सुद्धा मी त्याकडे साध्या जखमा म्हणूनच पाहिलं.

या उद्यानांत सापांशिवाय इतरही प्राणी होते. काहींची इथून सुटकाही करण्यांत आली होती. जखमी प्राण्यांना इथं आणून त्यांच्यावर उपाचर करण्यांत येत होते आणि इथं त्यांना विश्रांतीही मिळत होती. मी तिथे असतानाच्या काळांत उद्यानांत जंगली डुक्कर होतं, उदमांजर होतं(        ) एक शिक्रापक्षी, एक खोकड (          ), तीन मुंगुसं आणि कित्येक घुबडं, तसंच पंख फाटलेले गरुडही होते. वरुन उघड्या असलेल्या सर्वांत वरच्या पिंजऱ्यांत त्यांना ठेवलं होतं. बरं होऊन त्यांना उडायला यायला लागलं की उडून जायची त्यांना सोय होती. विविध प्रकारचे दुर्मिळ असे कोंबडे, गिनीपिग्ज, पांढरे उंदीर, ससे, माकडे आणि तुर्की कोंबडी हे प्राणीही तिथे होते. हो, आणखी तर गंगेमधली मऊ कवचाची कासवं, पाठीवर 'स्टार' असलेली कासवं आणि मेलेनॅक जातीचं कासवही होतं. यांना रोज खाऊ घालायला लागायचं आणि त्यांचे पिंजरे नियमितपणे साफही करायला लागायचे कुणाला साप दिसला की सर्पोद्यानांत फोन करून साप पकडायला बोलवायची सोय होती. फोन करणाऱ्याला पत्ता नीट विचारून, सर्पोद्यानांतून कोणी ना कोणी साप पकडायला जायचे. उगाचच लोकांनी साप मारु नयेत हा त्या मागचा उद्देश होता. अशा दोन प्रसंगी उद्यानांतील मुलांबरोबर मी साप पकडायला गेलो आणि हात हालवत परत आलो. सापाचं ठिकाण जर दूर असेल तर निरोप पोचून स्वयंसेवकांचा चमू तिथे जागेवर पोचेपर्यंत साप तिथे राहीलच याची काय खात्री?

उद्यानाला भेट देण्यासाठी रोज लोक येत असत आणि त्यांच्या प्रश्नांना उत्तर देऊ शकणाऱ्या जाणकाराच्या ते शोधांत असायचे मला लोकांच्या प्रश्नांना उत्तरं देण्यातं मोठ्ठा पराक्रम वाटायचा. 'हा कोणता साप?' हा काय खातो?' नर मादी कसं



ओळखायचं? असे त्यांचे अनेक प्रश्न असायचे. इतरवेळी मी कामावरील कर्मचाऱ्यांना जास्त गुंतागुंतीचे आणि सविस्तर अन सापांविषयी बारीक बारीक तपशील असलेले प्रश्न विचारून त्यांचा पिच्छा धरायचो तिथले कामगार म्हणजे माहितीची खाणच होते. आणि त्यांची माहिती ही प्रत्यक्ष अनुभवांतून त्यांना मिळाली होती. काही काही वेळा आम्ही रात्री बेडूक पकडायला जायचो. १० कि.मी लांब अंतरावरील नदीवर आम्ही जेवणानंतर स्कूटरवरुन जायचो. ही पद्धत सोपी आहे. एकाने पात्राच्या कडेला काठावर टॉर्चचा झोत टाकायचा बेडकांचे डोळे झोता मुळे दिपून ते जागच्याजागी थांबून राहतात आणि दुसऱ्यानं पाठीमागून पंजामध्ये त्याला पकडायचं. बेडूक जिवंतच पकडावे लागतात. नाहीतर साप खात नाहीत. बेडूक काही वेळ जागच्या जागी खिळून राहतात, त्यामुळे त्यांना पकडणं सोप असतं. पकडण्यापेक्षा, पकडल्यावर तो हातांतून निसटू द्यायचं नाही, हे अवघड असतं. कारण बेडूक ओलसर आणि बिळबिळीत असतात. २-३ तासांमध्ये २५ - ३० बेडूक पिशवीत घालून आम्ही परतायचो.

काही गरीब लोक सर्पोद्यानांतील कर्मचाऱ्यांचं जेवण एका झोपडीत बनवत मी तिथेच जेवण घ्यायचो. एक पदार्थ त्यांच्या खास आवडीचा होता. 'सँपल', भाज्या शिजवून वर तेलाचा थर, तिखट पावडरचा लाल तवंग त्यावर असे आणि चवीला लागे मस्त मसालेदार! काही दिवस चवदार सँपल खाऊन जिभेचे चोचले पुरविले खरे, पण लवकरच माझं पोट बिघडलं आणि त्यादिवशी मी सात वेळा संडासला पळालो आणि अखेरीस सँपल प्रकरण संपलं. दाल, चपाती आणि स्वस्तातले क्रीमरोल खाणं मी त्यानंतर पसंत केलं.

सर्पोद्यानांतील स्नानगृह फार घाण असे त्यामुळे मी तिथे आंघोळ करायचो नाही. माझे वाढलेले केसच फक्त ओले करून मी आंघोळ केल्याचं नाटक करायचो. उद्यानांतील कर्मचाऱ्यांच्या हे लक्षांत आल्यावर मला आंघोळ घालायचं त्यांनी ठरवलं. एके दिवशी मला पकडून त्यांनी माझे कपडे काढले. मोरीत मला ओढून नेलं, आणि साबण, थोडं हार्पिक माझ्यावर टाकून मोरीतल्या ब्रशनं मला घासून घासून धुतलं.

कसं कोणास ठावूक त्यांच्या हेही लक्षांत आलं की मला अंधाराची आणि रात्री येणाऱ्या विविध आवाजांचीही भीती वाटते. ते मला भुताच्या गोष्टी सांगायचे आणि भीती वाटली तरी मला त्या ऐकाव्या वाटत. शेवटच्या रात्री खऱ्या भुताची अन

माझी भेट झाली. ते असं झालं - आम्ही तिघेजण रखवालदाराबरोबर टी.व्ही पाहात होतो. आमच्यातला भूषण म्हणाला त्याला पाठीमागे जायचय. थोड्या वेळांतच दिवेही गेले. आणि मांजराचं मिऊऽऽ मिऊऽऽ ऐकू आलं. बाबा आणि रखवालदार यांना त्यामुळे काही फरक पडला नाही पण पोपी आणि मी जाम टरकलो. एका खिडकीत थोडा उजेड आला आणि दार आपटायला लागलं. एक गर्जना ऐकू आली - 'दार लाव'. चमत्कारिक गोष्टी एकामागोमाग एक घडायला लागल्या. कवटी असलेला सापळा हवेत तरंगत आला. आणि बाहेर कोण आहे पाहयला आम्ही सावधपणे गेलो तर काय, बाहेर कोणीच नव्हते! खोलीत परत येतोतर माझा बिछाना पलंगावरून फेकला होता माझे कपडे इकडे तिकडे पडले होते, सगळं अस्ताव्यस्त झालं होते, दाराची चौकट वाजत होती. खिडक्या आपटत होत्या मी घाबरून रखवालदाराचा हात घट्ट पकडून ठेवला. कुणीतरी सांगितलं होतं की आपण जर क्रॉस केला तर भुतं जातात, मी तेही केले पण काहीच उपयोग झाला नाही. या भुताला या खेळातले नियम ठावूक नसावेत. अन् एकाएकी टेलिफोन वाजला आणि भूषणनं फोनवर सांगितलं की तो परत येतो आहे. भूषण आला आणि भूत नाहीसं झालं भूताचा त्रास नंतर झाला नाही. दुसऱ्या दिवशी अण्णांना जेव्हा मी हे सांगितलं तेव्हां ते पोट धरधरून हंसायला लागले.

उद्यानातल्या दिवसांत बिनविषारी साप (अजगर) वगळून हाताळायला मी शिकलो होतो. घोरपड हाताळायचं मला माहित होतं. मी पाली पकडायचो आणि गांडूळही खायचो. गांडूळ हा काही माझ्या आहारातला पदार्थ नव्हता. एकदा एका मुलानं आव्हान दिल्यामुळे शिर्क्यांनी एक गांडूळ तोंडात टाकलेलं मी पाहिलं होतं. आपणही हा प्रयोग करायचा मी ठरवलं. पहिल्यांदा मला शिसारी आली पण दुसऱ्यांदा काही नाही झालं. गांडूळ बुळबुळीत ओलसर दिसतात खरी पण खाताना कच्च्या काकडीसारखी कुरकुरीत लागतात. उद्यानांतल्या शेवटच्या दिवशी मला नाग हाताळायला मिळाला. नागाच्या मानेवर काठी दाबून मी दुसऱ्या हातानं शेवटी पकडून त्याला उचलला. मी २-३ वेळा त्याला असा उचलला. त्यानंतर त्याला पेटीत ठेवलं गेलं. या अनुभवान मी चांगलाच उत्तेजित झालो होतो, आनंदित झालो होतो. सर्पोद्यानांतील माझ्या शिक्षणाचा शेवट किती छान झाला होता.

हे लिहीत असताना सापाचे इतत्र घेतलेले अनुभव मला आठवत आहेत. मी तान्हं बाळ असतानाची आठवण आई मला सांगायची. वालपोईल्या आमच्या घरात



मी पाळण्यांत झोपलो होतो. तिला काहीतरी खाली आदळल्याचा आवाज आला. आणि एक सडपातळ निळसर हिरवा साप आमच्या छतावरून पडून पाळण्याला वेटोळे घालून बसलेला पाहून भीतीनं तिची बोबडीचं वळली. खेडेगावांत साप दिसणं ही अपूर्वाई नाही. आणि रस्टिक फार्म वर तो दिसणं हेही आश्चर्य नव्हतं. घाबरली असली तरी आईनं काही आवाज केला नाही. मच्छरदाणीमध्ये मी शांत झोपलो होतो. आणि बाहेरच्या बाजूला साप पडला होता. जेमतेम मिनीटभरांत तो खुर्चीवर गेला आणि खुर्चीवरून खिडकीत जाऊन बाहेर पसारही झाला. आणि आईनं माझ्याकडे धाव घेऊन मी सुरक्षित असल्याची खात्री केली. तिच्या वर्णनावरून आता माझ्या लक्षांत येतय की तो हिरवा हरणटोळ साप होता, नाजूक आणि निरुपद्रवी असतो तो.

आणखी एका वेळी मी लहान असताना शेतावरच्या घरी रिकाम्या खोक्यांशी खेळत होतो, आणि त्यांतून साप बाहेर पडला. कोणीही मूल अशावेळी घाबरून रडलं असतं. तर मी जोरजोरात रांगत रांगत त्या सापाला पकडायला गेलो. आई सांगते की मी साप वाटेत नाही आला तरी आवर्जून त्याच्याशी दोस्ती करायला जायचो; त्याला पकडायचं असे मला. कुत्र्यांची मला भीती वाटायची कारण त्यांना सुळे होते. आणि ते चावतील अशी भीती होती. पण सापांचे तर दांत दिसायचे नाहीत. बहुधा म्हणूनच माझी त्यांच्याशी दोस्ती असावी.

**कामाच्या अनुभवांतून केलेली टिपणे साप**

जगांत सापांच्या २४०० जाती आहेत त्यांतले १५ टक्के विषारी आहेत सापांच्या विषारी जातींच प्रमाण आस्ट्रेलियांत जास्त आहे. तिथले ९० टक्के साप विषारी आहेत. भारतांत सापांच्या २३८ जाती आढळतात. त्यातले ७२ प्रकार विषारी आहेत. पण जीवावर बेतणाऱ्या सर्पांचे प्रमाण आणखी कमी आहे. चापडा जातीचा साप विषारी आहे पण त्यामुळे मृत्यू ओढवत नाही. विषारी साप मुख्यत्त्वे चार १) नाग (किंग कोब्रा) २) मण्यार (क्रेट) ३) घोणस - रसेल्स व्हायपर ४) फुरसे - सॉ स्केल्ड व्हायपर यांमध्ये सर्वांत विषारी म्हणजे मण्यार (क्रेट) नागापेक्षा चौपट विषारी असतो. समुद्री साप हे विषारी असतात. जगातल्या सर्वांत जहाल विषारी सर्पांच्या यादीत काही समुद्री साप आहेत. त्यांचं विष नागापेक्षा ५ पट विषारी असतं. पण समुद्रीसाप, जर त्यांना मुद्दाम डिवचलं तरच दंश करतात. पोहणाऱ्यांना त्यांनी कधीच त्रास दिलेला नाही.

साप हे थंड रक्ताचे असतात. त्यांची दृष्टि मंद असते. त्यांना पापण्या नसतात. ते बहिरे असतात. आणि त्यांना कंपन कळतात. त्यांच्या जीभेला फाटा असतो. म्हणजे त्यांना दोन जिभा असतात त्या जिभेनं ते चव, संवेदना आणि वासही घेतात. या त्यांच्या संवेदना चांगल्या विकसित झालेल्या असतात. त्यांच्यामुळेच प्राणी जीवंत आहे की मेलेला आहे, भक्ष्य आहे, की शत्रू आहे त्यांना कळते. काही विषारी साप भक्ष्यामध्ये विष सोडतात. विषानं त्याच काम केलं की ते मेलेलं भक्ष्य जीभेनं शोधून काढतात. विषामध्ये एंझाईम्स - वितंचके असतात. त्यामुळे सापान गिळलेल्या भक्ष्याचे पचन होते.

पूर्ण वाढ होईपर्यंत साप वेगाने वाढतात. आणि नंतर मृत्यूपर्यंत मात्र त्यांची वाढ संथ गतीने होते. ते वाढतात तशी त्यांची कात त्यांना आखूड होते. आंतून नवीन कात आल्यावर ते जुनी कात टाकतात. नाकाजवळ त्या कातीला छेद देऊन ते सरपटत त्यातून बाहेर येतात. कात टाकताना ते काही खात नाहीत पण नंतर आक्रमक होतात. विषारी साप चावला की चेतासंस्थेवर त्याचा परिणाम होतो. सर्पदंशावरचा उपाय म्हणजे सापाचेच प्रतिविष ( ) टोचावे लागते. सर्पविषाचा अगदी कमी डोस म्हणजे साधारण एक दशांश विषाची मात्रा घोड्याच्या शरीरांत सुरुवातीला टोचली जाते. नंतर क्रमाक्रमाने विषाचा डोस वाढवला जातो. त्यामुळे घोड्याच्या रक्तात विषाला प्रतिरोध करण्याची ताकद निर्माण होते. अशा घोड्याचे रक्त काढून ते गोठवले जाते, त्याच्यावर प्रक्रिया करून त्यातल्या ॲन्टीबॉडीज - रोगप्रतिकारक पेशी वेगळ्या केल्या जातात आणि पावडरच्या रुपांत त्या साठवल्या जातात. हेच ते सर्पदंशावरील प्रतिविष.

साप चावल्यावर करायचे प्रथमोपचार असे घाबरून न जाता साप चावलेल्या माणसाला पुरेशी उब द्यावी. आणि त्याला धीर द्यावा. चावलेला साप विषारी की बिनविषारी हे पाहण्यासाठी जखम तपासून पहावी. सुळ्यांच्या दोन स्पष्ट खुणा असतील तर तो विषारी साप असतो. बिन विषारी सापाच्या दातांच्या अनेक खुणा जखमेवर दिसतात. विषारी सर्पदंश असेल तर त्याला हालचाल करू देऊ नये. अल्कोहोल दारू, चहा, कॉफी अशी उत्तेजक पेये त्याला पाजू नयेत. वेदनाशामक गोळ्याही त्याला देऊ नयेत. जखम धुवू नये किंवा जखमेला छेद देवून विष काढायचा प्रयत्न करू नये. कारण यामुळे रोग संसर्ग आणि रक्तस्त्राव होवू शकतो. जखमेच्या वरच्या बाजूला एक पट्टी जरा घट्ट बांधावी, म्हणजे त्या पट्टीतून बोट घोलता येईल



अशी. आणि रुग्णाला लगेचच जवळच्या हॉस्पिटलमध्ये न्यावे. प्रतिविष देईप्रर्यंत बांधलेली पट्टी सोडू नये. प्रत्येक १॥ मिनिटांनी १० सेकंदापुरती सोडावी. आणि ६ तासांपेक्षा जास्त काळ पट्टी बांधू नये. हॉस्पिटलमध्ये प्रतिविषाचा डोस दिल्यावर सर्पविषाचा परिणाम होत नाही. सर्पदंश होऊ नये यासाठीही खबरदारी घेणं आवश्यक आहे. ती अशी - घराभोवती कचरानसावा, उंदरांची बिळ बुजवावीत. उंदराची वीण घरात, आसपास होणार नाही याची दक्षता घ्यावी. झाडाच्या आणि वेलींच्या फांद्या घरापर्यंत खिडकीत पोर्चमध्ये येणार नाहीत अशी काळजी घ्यावी. जंगलातून चालताना पायांत बूट असावेत. वाटेत येणाऱ्या अडथळ्यांवरून जाताना काळजीपूर्वक पायाखाली काय आहे ते पाहून पाय टाकावा. आणि रात्री अंधारात घराबाहेर जाताना विजेरीचा वापर करावा.

## प्रकरण ७

# सुट्टीतील सुट्टी

पुण्याच्या सर्पोद्यानांत माझा मुक्काम तीन आठवड्यांसाठी होता. पण मला तो अनुभव इतका आवडला की मी घरी जायला फारसा राजी नव्हतो. पण माझं नशीब असं चांगल की माझ्या घरच्यांनी दिवाळीची सुट्टी राजस्थानांत घालवायचं ठरवलं. राजस्थानला जाणारी गाडी मुंबईवरून पकडायची होती त्यामुळे मी आईवडिलांना सांगितलं की तुम्ही गोव्याहून मुंबईला या. मी तुम्हाला मुंबईला भेटतो. गिरगावांत आमच्या आजोबांच घर होत तिथं भेटायचं ठरलं. त्यामुळे मला सर्पोद्यानांत राहयला आणि पुढे मुंबईसारख्या मोठ्याशहरांत एकट्यानं हिंडून पाहण्यासाठी काही दिवस मिळणार होते.

सुजीत काकांनी मला मुंबईच बसचं तिकिट काढून दिलं आणि ते मला ते बसवर सोडायलाही आले. माझ्या वडिलांनी मला मुंबईतील गिरगावच्या घरच्या पत्त्यावर कसं जायचं ते सविस्तरपणे सांगितलं होतच आणि आईला काळजी होती की मी मुंबईत हरवलो तर! म्हणून तेव्हा काय करायचं हे तिनंही मला बजावून ठेवलं होते नंतर मला कळल की माझ्या काका-काकूंनाही सांगून ठेवलं होतं की मला काही अडचण आली तर मी त्यांना फोन करीन म्हणून! पण तशी वेळ आली नाही कारण मी ठरवलं होतं की आपला आपण पत्ता शोधून जायचं आणि त्याप्रमाणे मी गेलो.

पुण्याहून सकाळी १० ला निघालेली बस दुपारी २ च्या सुमारास मुंबईला पोचली. मी टॅक्सी केली, ड्रायव्हरला पत्ता सांगितला. अनोळखी रस्त्यांवरून टॅक्सी वेगानं निघाली आणि मी सावधपणानं बाहेर लक्ष ठेवून होतो. ड्रायव्हरनं मला ज्या जागी सोडलं ती मला अपरिचित होती. पण मी आसपास चौकशी केली २० मिनिटं इकडे तिकडे शोधल्यावर मी अचानक माझ्या ओळखीच्या पत्त्यावर, घरच्या दारांतच पोचलो. माझ्या आजोबांचे घर होते ते. माझे काका काकू आणि माझी आवडती भावंडं - लुकानो आणि रिकार्डो माझी वाटच पाहत होते. तासाभरांतच गोव्याहून माझ्या आई वडिलांचा फोन आला. मी पोचलो की नाही अशा काळजीत होते ते. तोपर्यंत कपडे बदलून मी माझ्या भावंडांबरोबर टी. व्ही. पाहात बसलो सुद्धा. पुढचे



काही आठवडे माझे काही वेळापत्रक ठरलेले नव्हते. मी आईवडिलांबरोबर सुट्टी साजरी करणार होतो. आता साप, बेडूक आणि मासे यांची दुनिया खूप दूर राहीली होती. सुट्टीत अहमदाबादला थोडाकाळ आम्ही 'कोरा' आणि 'सूमाथन' यांच्यासह व्यतीत करणार होतो. वायनाडला काही महिन्यांपूर्वी सेंद्रिय शेतीवाल्यांची बैठक झाली होती. त्यावेळी कोरा आणि त्यांची मुलगी मला तिथे भेटले होते. अहमदाबादलाही सर्पोद्यान असल्याचे कळले. मग तिथे भेट देणं तर अगदी अनिर्वायच होतं. मला त्याबद्दल कुतूहल होतं. या उद्यानांत अजगर, घोणस, मण्यार, डुकऱ्या घोणस, रॅटस्नेक - धामण आणि नागराज होते. ते सगळे काचेच्या पिंजऱ्यांत होते. तिथे स्टारबॅक कासव, घोरपड बदक आणि विविध प्रकारचे कदंब होते. माकड आणि इतर प्राणी होते. तिथं मत्स्यालयही होते. पण फार वाईट अवस्था होती त्याची. पुरेशा निधीचा किंवा पुरेशा काळजीचा तिथे अभाव जाणवत होता. त्यामुळे तिथली व्यवस्था काही ठीक वाटली नाही.

अहमदाबादहून आम्ही रेलगाडीनं जयपुरला गेलो. श्रीलता आणि महेंद्र चौधरी यांच्या घरी ८ दिवस आमचा मुक्काम होता. आमचा तळ जयपुरला होता पण जयपुरच्या बाहेरच्या खऱ्या खऱ्या किल्ल्यांना आम्ही भेट दिली. आणि दोन रात्री तिथं राह्यलो. किल्ल्याला ही माझी पहिलीच भेट होती. आणि किल्ल्यांवरील उंच भागांतील निवासी, थंड खोल्यांत राहण्याचा अपूर्व अनुभव आम्ही घेतला.

काही दालनं मोठी तर काही छोटी. काही व्हरांडे इतके अरूंद आणि बुटके की चालताना वाकूनच जावं लागे. आम्ही तिथं होतो तेव्हां सूर्यग्रहण होतं आणि सगळीकडे त्याचीच चर्चा होती. पण अगदी अल्पकाळ काळोख झाला लगेचच पुन्हा सूर्य तळपू लागला त्यामुळे माझी चांगलीच निराशा झाली. माझ्या मित्रानं नंतर मला सांगितलं की टी. व्ही. वर ग्रहण फार सुंदर दिसलं.

जयपुरला रोज आम्ही नवनवीन जागांना भेटी द्यायचो. किल्ले राजवाडे पाहिले. दुकानांना भेटी दिल्या मातीच्या भांड्यांत लस्सी प्यायली, कुल्फी खाल्ली, तोंडाला पाणी आणणारी चिकन तंदुरी खाल्ली. आम्ही मोटरनं उदयपुरला गेलो. तिथल्या तलावांत आणि राजवाडा तलावांत नौका विहार केला. राजवाडे पाहिले आणि घंटालीला श्रीलता आणि महेंद्र यांचं आणखी एक घर आहे, तिथं गेलो. घरामागच्या नदीत पोहलो. आणि खेड्यांतल्या मुलांसमवेत मासेही पकडले.

तीनतासांचा बस प्रवास करून आम्ही रतलामला आलो. आमची सुट्टी संपली

होती. इथून मी माझे भाऊ, आम्ही माझ्या आई बरोबर मुंबईला परतलो आणि माझे डॅडी दिल्लीला गेले. यावेळी मुंबईमध्ये माझ्या आजोळ घरी - माहिमला आम्ही गेलो. माझे ८६ वर्षांचे उत्साही आणि चटपटीत आजोबा आमच्या स्वागताला सज्ज होते. त्यादिवशी त्यांचा वाढदिवस होता आणि घराजवळच्या चायनीज रेस्टॉरंटमध्ये आम्हा सर्वांना जेवायला घेऊन जायचं त्यांनी ठरविलं. आम्ही सगळे कपडे घालून जायला तयार झालो आणि आईनं आजोबांना विचारलं की आपण कसं जाणार आहोत? तर ते म्हणले तू मुलांना घेऊन टॅक्सीनं ये. मी चालत येईन. मला ते आवडतं. मला इतकं काही आश्चर्य वाटलं. अर्थातच आम्ही सगळ्यांनीच रेस्टॉरंटपर्यंत चालत जायचं ठरवलं. आजोबा आमच्या पुढे राहून आम्हाला रस्ता दाखवत होते. आम्ही आजोबांच्या वाढदिवसाचं जेवण आनंदात जेवलो. माझी आई आणि माझे धाकटे दोघे भाऊ समीर आणि मिलिंद लवकरच गोव्याला परतले. पण मी मात्र आजोबांबरोबर काही दिवस मुंबईला राह्यलो. इथूनच मी चेन्नईला जाणार होतो आणि पुढचे २,२॥ महिने कोळी, गांडूळ आणि माझ्या आवडत्या मगरी आणि साप यांच्याबरोबर घालवणार होतो.

▯



## प्रकरण ८

# गांडुळांच्या जगांत

६ नोव्हेंबरला मी चेन्नई एक्स्प्रेसमध्ये बसलो. गाडी सातला दादरवरून सुटणार होती मला सोडायला माझे काका अलान आले होते. आयुष्यभर त्यांनी रेल्वेत नोकरी केली होती. आईनं त्यांना, मला गाडीवर बसवून द्यायची विनंती केली होती. कारण दादरच्या स्टेशनवर एवढी गर्दी असते की मी चुकेन की काय असं मला वाटत होतं. त्यापूर्वी आजोबा मला टॅक्सीतून घेवून स्टेशनवर आले होते आणि माझे तिकिट मी घेतले आहे नां याची दोनदोनदा विचारून त्यांनी खात्री करून घेतली होती. माझ्याजवळ पुरेसे पैसे, थोडफार खायचं, माझी पाण्याची बाटली हे सगळे मी घेतलं आहे याचीही त्यांनी खात्री केली होती.

गाडीत मला एकरात्र आणि दुसरा संपूर्ण दिवस काढायचा होता. गाडी त्यादिवशी रात्री ८॥ ला चैन्नईला पोचणार होती. गेल्या काही महिन्यांत माझा गाडीचा प्रवास बऱ्याच वेळा झाला होता. त्यामुळे मी आता या प्रवासाला रुळलो होतो पण तरीही मी गाफील नव्हतो माझ्या सामानावर माझं लक्ष होतं.

मुंबईपासूनच्या या प्रवासांत फारसं काही घडलं नाही. मला खिडकीजवळची जागा होती आणि रात्री मी खालच्या बाकावर झोपलो. माझ्या बरोबरचं कुटुंब परप्रांतांतील कामगारांच होतं आणि ते त्यांच्या व्यापांत होते. ते ना मराठी बोलत होते ना इंग्लिश. प्रवासांत मी कोणाशी बोललो नाही किंवा माझ्याशीही कोणी बोललं नाही. मी धावत्या गाडीबाहेरचा प्रदेश पाहात होतो आणि गाडी थांबली की स्टेशनवरची गर्दी गडबड पाहात होतो. आणि त्याचा कंटाळा आला की झोप काढत होतो. माझ्याकडे ५०० रुपये होते आणि ते मी माझ्या जीनच्या वेगवेगळ्या खिशांत ठेवले होते तर काही रक्कम माझ्या सॅकच्या वेगवेगळ्या कप्प्यांत ठेवली होती. झोपताना माझी सॅक मी उशीसारखी डोक्याखाली घेत होतो. माझ्या बरोबर पाण्याची बाटली, काही खाद्यपदार्थ आणि काही फळ होती. मी फक्त तेवढंच खाल्लं.

गाडी चांगली ३ तास लेट झाली आणि रात्री ११॥ वाजता चेन्नईच्या मध्यरेल स्टेशनवर पोचलो. स्टेशनवर मला वडीलांचे जुने मित्र मनोहरन् भेटणार होते. मनोकाका

आणि सागूकाकू यांनी आपणहून चेन्नईतील माझ्या राहण्याची जबबादारी घेतली होती. ते सुद्धा दोघांची तब्येत चांगली नसूनही काका माझ्यासाठी नेमके कुठे उभे राहणार होते हे नक्की नसल्यामुळे मी शोधकपणे ते कोठे दिसताहेत का हे पाहात दाराकडे जाऊ लागलो. पण त्यांना पाहूनही मी ओळखू शकलो नाही कारण मी त्यांना मागे पाहयलं होतं त्यापेक्षां त्यांचे केस जास्त पांढरे झाले होते. पण माझ्या उठावदार पिवळ्या रंगाच्या सॅकमुळे त्यांनी मला ओळखलं. त्यांनी मला रिक्षांत बसवून घरी नेले. तिथं थोडं जेवून मी लगेचच झोपलो. मनोकाका दुसऱ्यादिवशी म्हणाले 'तू आज आराम कर'. म्हणून मी टी.व्ही. पाहिला, फोटोअल्बम पाहिला आणि माझ्या आतापर्यंतच्या अनौपचारिक शिक्षणाविषयी गप्पा मारल्या आणि चेन्नईतील माझा कार्यक्रमही त्यांना सांगितला.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी काकांबरोबर डॉ. सुलतान इस्माईल यांच्या गांडूळसंस्थेकडे निघालो. यानंतरचे १५ दिवस मी याच संस्थेत राहून गांडूळ आणि गांडूळखत यांचा अभ्यास करणार होतो. खरतर माझ्याकडे या अभ्यासासाठी दोन पर्याय होते. एक म्हणजे पुण्याला डॉ. भवाळकरांच्या केंद्रामध्ये किंवा चेन्नईला डॉ. इस्माईल यांच्या संस्थेत मी चेन्नईला जायचे ठरवलं कारण सेंद्रिय शेतकऱ्यांच्या संमेलनांमध्ये, कोट्टायमला, डॉ. इस्माईल यांच भाषण मी ऐकलं येतं आणि मला त्यांचं बोलणं खूप आवडलं होतं. दुसरं महत्त्वाचं कारण म्हणजे ममलापुरम् येथील 'क्रोकोडाईल बँक' इथं जाण्यासाठी माझा जीव आसुसलेला होता. आणि चेन्नईपासून हे ठिकाण अगदी जवळ होतं. भवाळकर पुण्याला काम करतात. तिथून हे ठिकाण केवढंतरी दूर होतं.

मनोकाकांना हृदयरोग असल्यामुळे सहसा ते बसनं प्रवास करायचे नाहीत. पण मला 'न्यू कॉलेज'चा रस्ता कळावा म्हणून ते त्या दिवशी मुद्दाम, मला घेवून बसनं आले. वाटेतल्या अनेक महत्त्वाच्या खाणाखुणा त्यांनी मला दाखवल्या. माझा रस्ता मला ओळखता यावा म्हणून आणि शिवाय मला त्यांनी शहरात कसा प्रवास करावा त्याविषयीच्या सूचनाही दिल्या. मला झटपट शिकून त्या सर्व गोष्टी लक्षांत ठेवणं गरजेचं होत कारण या शहरांत मुख्य अडचण होती ती भाषेची, तमिळ मला अजिबात येत नव्हती.

कॉलेजमध्ये आम्हाला डॉ. ईस्माईल भेटले त्यांनी कॉलेजचा परिसर आम्हाला हिंडून दाखवला. तिथून ते आम्हाला घेऊन शेतावरही गेले. गांडूळ खताचे खड्डे



शेतावर केले होते. आम्ही तिथे गोबरगॅस प्लँटही पाहिला, कल्चर किंवा गांडूळ विरजणाच्या टोपल्या, खोकी पाहिली. सेंद्रिय खताचे ढीग तयार झाले होते तेही आम्ही पाहिले. काम सुरु करायला मी उत्सुक होतो. आणि सरांनी डॉ. इस्माईलना सगळीजण सर म्हणतात. त्यांनी सुचवलं की मी अगदी उद्यापासून सुद्धा कामाला सुरुवात करावी तेव्हा मला अगदी आनंदच झाला.

रविवार सोडून इतर दिवशी पुढील १५ दिवसांसाठी माझा आखलेला कार्यक्रम सुरु झाला. म्हणजे सकाळी ६ ला उठायचं गरम ताजा नाश्ता इडली सांबार, डोसा, वडा किंवा अन्य जे काही बनवलं असेल ते खायचं. जेवणाचा डबा सागूकाकू द्यायच्या तो घेऊन सकाळी ७ ची बस पकडायची अशोक स्तंभापासून पानाराल पर्यंत जायचं तिथं बस बदलून न्यूकॉलेजला जाणारी बस पकडायची. मी तिथे साधारण ८॥ पर्यन्त पोहचायचो. तिथे दुपारी ३॥ -४ पर्यंत काम करून पुन्हा आल्यामार्गानं बसचा प्रवास करून मानोकाकांच्या घरी पोहचायचो. या दोन्ही वेळा ऑफिसची गर्दी टाळून होत्या माझ्या वडीलांनी डॉ. इस्माईलना सांगितलं होत की याला प्रत्यक्ष कामाचा अनुभव द्या त्यामुळे पुस्तकं वाचून टिपणं काढायची. दुसऱ्यांच्या कामाच निरीक्षण करून त्यांना मदत करायची आणि स्वतः खत खड्डे बनवायचे असा दुहेरी कार्यक्रम होता. मी पहिल्या २ दिवसात गांडूळ विषयावर, गांडूळ आणि त्यांच जग यावर डॉ. ईस्माईलनी सुचविलेली शक्य तेवढी पुस्तक वाचली. नंतर मी गांडूळांच्या विविध प्रकारांचा, त्याच्या हालचाली, सवयी, रंग आणि त्यांची वैशिष्ट्यं यांचा निरीक्षणातून अभ्यास केला. तुलग्रेन फनेल च्या साह्यानं मातीचे नमुने कसे घ्यायचे ते मी शिकलो. डॉ. ईस्माईल यांच्या हाताखाली काम करणारे ८-१० विद्यार्थी तिथे वेगवेगळ्या विषयांवर संशोधन करत होते. आम्ही सर्वजण मिळून एका मोठ्या खोलीत बसून काम करायचो. पूर्वी इथं मुख्य लायब्ररी होती. प्रत्येकाचं कामाचं वेगळं टेबल होतं. मी तिथं आल्यावर मलाही वेगळं टेबल खुर्ची मिळाली या मोठ्या हॉलच्या एका अंगाला गांडूळांवरच्या पुस्तकांची छोटी लायब्ररीही होती. त्यामुळे मला लागणारी पुस्तकं तिथून मिळवणं फार सोप्पं पडायचं.

गांडूळ बेडस्, खतखड्डे वगैरे तळमजल्यावर होते. परंतु गांडूळ खताची काही खोकी स्टडीहॉल लगतच्या अरूंद बोळामध्ये ठेवली होती. आम्ही दुपारच्यावेळी इथ बसूनच आमचे डबे खायचो. माझ्यावर सोपवलेल्या कामाबद्दलचं मार्गदर्शन सुरुवातीला या विद्यार्थ्यांपैकी कोणीही एकजण मला द्यायचा मग माझा मी कामाला

लागायचो.

या माझ्या १५ दिवसांच्या शिक्षणांत गांडूळांविषयी, त्यांचा परिसर याविषयी, मातीची सच्छिद्रता, त्यांतील आर्द्रता, पोत याविषयी कितीतरी गोष्टी मी शिकलो. मातीमध्ये असलेल्या अनेक सजीवांचही मी निरिक्षण केलं आणि मायक्रोस्कोप मधून मायक्रोअर्थ्रोपॉडचे फोटोही घेतले. या प्रशिक्षणाच्या शेवटी मी गांडूळांचे बेड तयार केले आणि अनुभवाखातर काही गांडूळ आणि झुरळं खाऊनही बघितली.

चेन्नईच्या माझ्या मुक्कामांत काही साहसंही मी अनुभवली. मला आठवतं की दुसऱ्याच दिवशी मी बसमध्ये चढलो आणि रिकाम्या जागेकडे धाव घेतली. इथली पद्धत मला माहित नव्हती. गोव्याला कंडक्टर तुमच्यापर्यंत येऊन पैसे घेऊन तिकिट देतो. चेन्नईला मात्र बसच्या एकाटोकाला बसलेल्या कंडक्टरकडे जाऊन तिकीट घ्यावं लागतं. पण हे माहित नसल्यानं मी आपला वाट पहात बसलो की कंडक्टर येईल, तर दोन इन्स्पेक्टर माझ्याकडे आले आणि विनातिकिट प्रवासी म्हणून मला त्यांनी पकडलं. त्यांतील एकानं माझ्यावर जोरदार तमिळमध्ये सरबत्ती सुरु केली. बरेच हातवारे आणि अभिनय करून मी मला तमिळ येत नाही म्हणून सांगितलं. आणि पुढ असंही सांगितलं की मी गोव्याचा आहे आणि चेन्नईमध्ये पहिल्यांदाच बसमधून प्रवास करतो आहे. त्यानं मला २५ रुपये दंड केला. नशिब तेवढे पैसे माझ्याजवळ होते म्हणून. पण मी जेव्हा बसमधून उतरलो तेव्हा माझ्या लक्षांत आलं की आपलं रिकामं पाकीट ही मारलं गेलं आहे. दुसऱ्या वेळी मी बसच्या खालच्या पायरीवर उभा होतो त्यांत मला आपलं काही चुकलय असं वाटलं नाही कारण मी पुष्कळ लोकांना बसच्या दारांत लोंबकळून प्रवास करताना पाहिलं होतं. पण बसनं जसा वेग घेतला. तेव्हा माझ्या हातावर इतक्या लोकांच्या वजनाचा दाब पडला, माझ्या या ताणलेल्या हातावर दरवाजाबाहेर लोंबकळणाऱ्या कितीतरी लोकांचा असह्य भार हातावर पडला होता. तेव्हापासून मी कानाला खडा लावला आणि ठरवलं की पायरीवर उभं राहून पुन्हा म्हणून प्रवास करायचा नाही.

मी बरेचवेळा रस्ते चुकलोही. पण मार्गदर्शनासाठी मी कधी फोन केला नाही. मी लोकांना विचारायचो आणि ओळखीच्या खुणा भेटेपर्यंत उलट किंवा सुलट दिशेनं घर सापडेपर्यंत चालत राहायचो. बरेच वेळा काय व्हायचं की माझ्या घराच्या स्टॉपच्या अलिकडे किंवा पलिकडे मी चुकून उतरायचो. एकदा तो नंतरचा थांबा इतका लांब होता की, वाहतुक सिग्नल पाशी बस सावकाश झाली तेव्हा मी बसमधून उडी मारली



आणि माझ्या थांब्यापर्यंत मागे चालत जायला मला ३० मिनिटं लागली. पण काकाकाकू मात्र मोठ्या प्रेमानं माझं स्वागत करीत.

मागेवळून पाहतांना वाटतं की मी काकाकाकूंकडे होतो त्या काळांत माझ्या बेफिकीर स्वभावामुळे आणि अनियमित वागण्यानं मी त्यांना चांगलीच डोकेदुखी झालो असणार मी बरेच वेळा आंघोळीला दांडी मारायचो किंवा आंघोळीला मोरीत घुसलोच तर लवकर बाहेरच यायचो नाही. किंवा तेच तेच मळके कपडे न धुता मी घालायचो या सगळ्या गोष्टीविषयी काका माझ्यावर खूप ओरडायचे. सागूकाकू स्वयंपाक छान करायच्या पण रात्रीच्या जेवणांत चिकन, मासे असले की मी त्यावर तुटून पडायचो पण तेच जर शाकाहारी जेवण असेल तर मी नीट जेवायचो नाही काकाकाकू दोघांच्याही हे लक्षांत आल्यावर सात्विक आहाराविषयी मला नावड म्हणून काका मला रागवायचे मला भाषण द्यायचे. तसा मी आळशी असल्यानं कॉलेजमधून आलो की सोफ्यावर पसरायचो आणि टी. व्ही चॅनेल्स बदलत राहयचो. त्या दोघांनाही ही गोष्ट किती तापदायक वाटत असणार पण काही असो ते माझी खूप काळजी घ्यायचे केवळ खाऊ घालण्यापुरते नाही तर या सगळ्या ठिकाणी अभ्यासाची माझी चांगली सोय व्हावी म्हणून ही त्यांनी अमर्याद प्रयत्न केले. त्याबद्दल खरोखरच मी त्यांचा ऋणी आहे हे पुस्तक वाचल्यावर त्यांच्याबद्दलची माझी कृतज्ञता लक्षांत घेऊन ते मी त्यांना दिलेल्या त्रासाबद्दल मला क्षमा करतील अशी अशा आहे.

## दैनंदिनी मधील उतारे

**गांडूळ**

१० नोव्हें. सरांनी गांडूळावरचं पुस्तक वाचायला दिले. जगन मला शेतावर घेऊन गेला. गांडूळांखेरीज इतर कितीतरी सजीव मला तिथे आढळले. आम्ही तिथल्या एका जागेच्या मातीचा नमुना घेतला. आणि मग प्रयोगशाळेत गेलो. तिथे तो नमुना टुलग्रेन नसराळ्यांत घातला. नंतर मी व्हर्मीटेक खड्ड्यांतून आणखी तीन नमुने आणले आणि ३ वेगळ्या नसराळ्यांत घातले. तोवर जेवणाची वेळ झाली आणि आम्ही डबा खाल्ला. त्यानंतर मातीच्या नमुन्यांचं वजन घेतलं. आणि नसराळ्यांतून खाली पडलेल्या सजीवांच निरीक्षण केलं. दुपारी ३॥ वाजतां मी घरी जायला निघालो.

११ नोव्हें. सकाळी मला २ प्रकारची गांडूळ दिली होती. लँपिटो माऊरिती आणि पेरिओनिक्स एक्सकॅव्हॅटस्'. मला त्याचं निरीक्षण करायचं होतं सकाळभर

मी त्यांच निरीक्षणं केलं. डबा खाल्ल्यावर मी माझी निरीक्षणं नोंदवली संध्याकाळी आम्ही कॉलेजच्या मैदानावर आणि कॉलेज बोर्डिंग लगतच्या भागावर जाऊन निरीक्षण घेतली. मैदानावर आम्ही २५ ह्न २५ ह्न २५ चे दोन आणि बोर्डिंगजवळ एक असे खड्डे घेतले. आम्ही अनेक निरीक्षणं नोदवली त्यांतली काही, गांडूळांची संख्या, प्रकार, ते आहेत किंवा नाहीत अशी आहेत. माती, वातावरणिय तपमान, सापेक्ष आर्द्रता आणि मातीतील आर्द्रता घेण्यासाठी मातीचे नमुने घेतले.

**१२ नोव्हें.** – न्यूकॉलेजसाठी बाहेर पडलो. आज सर आले नव्हते. त्यांना विषाणुज्वर आला होता. काल एक संशोधन तज्ञ मरण पावले. आज त्यांची शोकसभा होती. त्यानंतर सुट्टीच मिळाली म्हणून सगळे निघून गेले. मी १०॥ ला घरी पोचलो. आंघोळ करून खाऊन घेतले. थोडावेळ टी. व्ही. पाहून दैनंदिनी लिहीली. रात्री काकाकाकूंकडे पाहुणे जेवायला येणार होते म्हणून काकूंनी चिकनकरी केली होती. मला खूप आवडली.

**१४ नोव्हेंबर** – आजही सर आले नाहीत. जगनच्या मदतीनं इन्फ्रारेड आर्द्रता मापक वापरून मी मातीच्या नमुन्यांतील आर्द्रतेचं प्रमाण नोंदवलं. शनिवारी हे मातीचे नमुने आम्हीच आणले होते. एक नमुना तपासल्यावर व्हॉल्टेज कमी जास्त होऊ लागले म्हणून आम्ही त्याऐवजी टुलग्रेन, फनेल वापरलं. जगननं मला शेतांतले आणि बोर्डिंग जवळच्या मातीचे नमुने आणायला सांगितले. आम्ही ते नमुने फनेलमध्ये घातले आणि त्यातले खाली पडलेले अर्थ्रोपॉड्स मायक्रोस्कोप खाली तपासले. मायक्रोआर्थ्रोपॉड चे काही जतन केलेले नमुनेही आम्ही तपासले.

**१५ नोव्हेंबर** – १०० ग्रॅम मातीचा नमुना घेऊन ती कुटली. मग प्रत्येक नमुना पाच गाळण्यातून गाळला. मग प्रत्येक गाळणीतून गाळलेल्या मातीचे वजन केले आणि नोंद केली.

**१६ नोव्हेंबर** – सकाळी माती गाळली. संध्याकाळी कीन्सक पानं मातीची पाणीधारण करण्याची क्षमता आणि सच्छिद्रता तपासली.

**१८ नोव्हेंबर** – आज सकाळी सर आले. ग्रंथालयात जाऊन काही पुस्तकं चाळली. पुन्हा मातीचे नमुने चाळले. मग माती बुन्सेन बर्नरवर जाळली. दुपारी एक विनोदी फिल्म जुनिअर शायलॉक पाहीली.

**१९ नोव्हेंबर** – माझा रफ रिपोर्ट लिहायला सुरुवात केली. संध्याकाळी बाबू बरोबर जाऊन माझ्या रिपोर्टसोबत जोडायला फोटो घेण्यासाठी फिल्मरोल घेऊन



आलो.

**२० नोव्हेंबर** – मातीच्या दुसरा नमुना भाजून घेतला. मग जगन सर आणि मी मिळून मायक्रोआर्थ्रोपाडसचे कंपाऊड मायक्रोस्कोपने फोटो घेतले. दुपारच्या जेवणानंतर एका विद्यार्थ्यानं आयोजित केलेला सेमिनार अटेंन्ड केला.

**२१ नोव्हेंबर** – पेरीऑनिक्स एक्सकॅव्हॅटस' गांडूळ खाल्ले. वेगवेगळ्या मातीची पाणीधारणक्षमता पाहण्यासाठी काही मातीच्या नमुन्यांची वजने घेतली. भाजलेल्या मातीचे वजन घेतले. मातीचा पोत कसा पाहयचा आणि कसा मोजायचा ते शिकण्यासाठी मातीचे निरनिराळे नमुने तपासले. माझा रिपोर्ट लिहीणंही चालू आहे.

**२२ नोव्हेंबर** – बसून रिपोर्टचा उर्वरित भाग लिहीला. तो चित्राजवळ तपासायला दिला. तिनं तो सुधारुन दिला. मग तो सरांना दिला. त्यांनीही त्यांत काही सुधारणा केल्या.

**२३ नोव्हेंबर** – मी आणलेल्या नव्या वहीत माझा रिपोर्ट लिहून काढला. जगननं आणि मी मिळून आम्ही आधी काढलेले फोटो त्यासोबत चिकटवले. मग सर म्हणाले की तुझा तू एक व्हर्मी बेड बनव. त्यांनी मला एक 'टब' दिला त्यांत मी व्हर्मी बेड बनवला. मी तो बरोबर बनवला आहे हे सरांनी तपासून बघितले.

**२४ नोव्हेंबर**– माझ्या वहीत काही डायग्रॅम्स बनवायचे राहिले होते. ते बनविले. मग ते सरांकडे अंतीम तपासणीसाठी आणि मान्यतेसाठी दिले. त्यांनी प्रत्येक फोटोविषयी काही ओळी माहिती लिही असं सांगितलं. त्याप्रमाणे लिहीली. ते म्हणाले आता तुझी वही आठवड्यानंतर घेऊन जा. मग मी सगळ्यांचा निरोप घेतला आणि ४॥ वाजता घरी जायला निघालो.

**१० दिवसांनंतर**

**५ डिसेंबर** – आज सुट्टी होती. म्हणून मी न्यू कॉलेजमध्ये सरांना तपासायला दिलेली वही आणण्यासाठी गेलो. तिथे सर्व मित्र भेटले. माझ्या रिपोर्टबुक मध्ये प्रत्येकानं आपले शेरे लिहिले मग त्यावर शिक्का मारला. सरांनी मला 'गांडूळ खत प्रशिक्षणवर्ग' पूर्ण केल्याचे संस्थेचे प्रमाणपत्र दिले. मग चित्रानं तिच्या फियाटकारमधून मला पानगल पार्क जवळ बसस्टॉपवर सोडले.

## गांडूळ खताविषयीच्या कमाची टिपणे.

(                    )

- **कचऱ्याचे रुपांतर सोन्यामध्ये**

गांडूळखत आणि गांडूळपाणी ही गांडूळांची दोन उत्पादनं अलिकडे खूपच प्रसिद्ध आहेत. नेहमीचा सेंद्रिय कचरा म्हणजे स्वयंपाकघरांतील उरले सुरले, भाजीपाल्यांची देठे वगैरे, पालापाचोळा इत्यादी सेंद्रिय टाकावू पदार्थ. गांडूळांच्या मदतीनं त्यांच रुपांतर खतांत करता येते.

- **गांडूळं**

तीन प्रकारची गांडूळ असतात एक म्हणजे एपिजील किंवा पृष्ठभागावरची गांडूळं (पेरिओनिक्स एक्सकॅव्हाटक) ही फक्त जमिनीच्या पृष्ठभागावरचा टाकावू सेंद्रिय पदार्थ खातात.

दुसरा प्रकार म्हणजे अनेसिक गांडूळ (लँपिटो माऊरीटी) जी मातीच्या वरच्या थरांत असतात आणि टाकावू पदार्थ आणि पानांचा कचरा खातात. तिसरा प्रकार म्हणजे मातीच्या आत खोल राहणारी एण्डोजीक गांडूळं गांडूळखतासाठी सर्वांत उपयुक्त गांडूळ म्हणजे इपिजेइक आणि अनेसिक गांडूळ. पेरिओनिक्स एक्सकॅव्हाटस रंगानं जांभळट लाल आणि खडबडीत असतात. आणि दोन्ही टोकांशी काळपट असतात. ते लहान आणि सडसडीत असते. (लांबी १० सें.मी. अंदाजे) आणि लॅम्पिटो मॉरिटीच्या तुलनेत चपळ असतात. त्यांचे प्रजननही खूप जलद होते. लॅम्पिटो मॉरिटी राखाडी पांढरट असतात आणि चकचकीत, लठ्ठ आणि लांबीलाही जास्त असतात. (लांबी १६ सें.मी) गांडूळांना थंड हवा मानवते, आर्द्र माती, दमटपणा आणि तुलनेनं कमी सूर्यप्रकाश आणि मध्यम प्रकारची वाळू लागते. व्हर्मीकल्चर करताना या त्यांना लागणाऱ्या अनुकुल गोष्टी लक्षांत ठेवणे गरजेचे आहे.

गांडूळ त्वचेतून श्वासोश्वास घेतात, त्यांची त्वचा कोरडी पडली किंवा त्यांच्यातला चिकटपणा नाहींसा झाला तर ती मरतात, त्यामुळे गांडूळ खताच्या भांड्यांत गांडूळं जिवंत ठेवायची तर गांडूळांचे बेड्स आर्द्र राहतील याची काळजी घेणे आवश्यक आहे. मात्र पाणी साठून राहिलेली माती त्यांना आवडत नाही. खरंतर गांडूळ दीर्घकाळ पाण्यात राहिलीतर त्यांच्या विष्ठेतून बाहेर पडणारा अमोनिया एकत्र साठून पाणी ‘टॉक्सीक’ किंवा विषारी होतं आणि त्यांत गांडूळं जगू शकत नाहीत. त्यांना लवण युक्त पाणी सोसत नाही. अगदी थोडं सुद्धा चालत नाही. गांडूळ उभयलिंगी असतात.



त्यांच्या प्रकारानुसार त्यांचं आयुष्य सहा महिन्यांपासून एक वर्षापुरतं असतं. पूर्ण वाढ झालेलं गांडूळ मीलनानंतर त्यांच क्लिटेलम म्हणजे कातडीचा जास्त वाढलेला एक लहानसर भाग टाकून देतात. आणि कोष निर्माण करतात. १४ दिवसांनी तो कोष उबून त्यातून पिल्लं बाहेर येतात. प्रत्येक कोषांतून जास्तीत जास्त ३ पिल्लं बाहेर येतात. पिल्लापासून पूर्ण वाढ होण्याची अवस्था म्हणजे पुनरुत्पादनासाठी सक्षम अवस्था प्राप्त होण्यासाठी १५ ते १८ दिवस लागतात. अशा रीतीनं गांडूळांची संख्या अनेकपट वाढत जाते आणि ही वाढलेली जास्त संख्येची गांडूळ अधिक मोठ्या प्रमाणांत कचऱ्याचा समाचार घेऊ शकतात.

**व्हर्मी कंपोस्ट -** खड्डा, लहान आकाराचे प्लॅस्टिक किंवा लाकडी खोकं किंवा बादली मध्ये सुद्धा सेंद्रिय पदार्थांपासून गांडूळ खत तयार करतां येत. एकाचवेळी दोन खोकीही यासाठी वापरतां येतील. एक ताज्या कचऱ्यासाठी आणि दुसरे खतासाठी.

प्रथम खोक्याला ६ ते ८ भोकं पाडावीत. प्रत्येक कोपऱ्यांत एक अशी चार आणि खोक्याच्या मध्ये चार. भांडं किंवा बादली असेल तर ३ ते ५ भोकं पुरे होतात. खोक्यांत किंवा खड्ड्यांत प्रथम, तळाशी दगडगोटे किंवा विटांच्या तुकड्यांचा १ इंचाचा थर ठेवायचा. त्यावर अर्धा ते एक इंचाचा वाळूचा थर पसरायचा. त्यावर ५ -६ इंचाचा मातीचा थर पसरायचा मग लॅम्पिटो आणि पॅरिओनिक्स या प्रकारची गांडूळ त्यांत सोडायची मग मातीला पाणी देऊन ती आर्द्र होईल असे बघावे. थोडं गाईचे शेण (नायट्रोजन साठी) आणि थोडं गवत (कार्बनसाठी) त्यावर पसरावे. आणि २० - ३० दिवस तो खड्डा हलवू नये यालाच व्हर्मीबेड म्हणतात.

गाईचं शेण आणि गवत यामुळे गांडूळांची वाढ झपाट्याने होते अशा रीतीने या गांडूळ खताचे खोके किंवा खड्डा सेंद्रिय टाकाऊ पदार्थांवर प्रक्रिया सुरु करण्यासाठी तयार झाला. व्हर्मीबेडवर हा सेंद्रिय टाकाऊ पदार्थ एक सारखा पसरायचा शक्यतोवर त्यामध्ये इतर कचराही थोडा थोडा घालत राहावा. एकाच वेळी सगळा कचरा टाकून मोकळे होऊ नये. गांडूळ कचऱ्याचा लगेचच फडशा पाडायला लागतात. खड्डा किंवा खोक्यांत अधुनमधुन पाणी शिंपडून व्हर्मीबेड ओलसर राहील असे पहावे सेंद्रिय टाकावू पदार्थांनी हा खोका किंवा खड्डा पूर्ण भरला की त्यावर मातीचा हलका थर पसरुन मग तो कुजण्यासाठी त्याला अवधी द्यावा. त्या दरम्यान तो हालवू नये. फक्त त्यावर पाणी मारत रहावे. साधारण ४५ दिवसांत त्यांतील पदार्थ पूर्ण पणे कुजले कि ३ ते ५ दिवसात पाणी मारायचे थांबवावे. त्यामुळे सगळी गांडूळं

खोक्याच्या तळाकडे जातील कारण त्यांना ओलावा हवा असतो. आणि तसा तो तळाशी त्यांना मिळू शकतो. खतात रुपांतर झालेल्या सेंद्रिय पदार्थांचा म्हणजे मातीचा वरचा थर, खालच्या व्हर्मीबेडला धक्का न लावता काढून घ्यावा हे सेंद्रियखत झाडांसाठी वापरावे.

**गांडूळ पाणी**

पिंप किंवा बादलीमध्ये गांडूळपाणी बनवतां येईल पिंप जमिनीपेक्षा थोडं वर आधार देऊन ठेवावं. पिंपाला बुडाशी भोंक असावं. त्यांतून एक पाईप पिंपामध्ये घालावा. पाईपच्या बाहेरच्या बाजूच्या टोकाला तोटी बसवावी. पिंपाच्या बुडाशी लहान दगडगोटे (६ ते ८ इंचाचे तुकडे) घालून त्यांचा थर बनवावा. त्यावर वाळूचा एक थर पसरावा. तो ओलसर करून त्यांत गांडूळं सोडावीत त्यांत गाईचे शेण आणि गवतकाडी एकत्र करून पसरावे् आणि काही दिवस ते तसेच राहू द्यावे.

गांडूळ पाणी हवं असेल तेव्हा त्यावर पाणी सोडावे (१५० लिटर क्षमतेच्या पिंपात ५ लिटरपाणी घालावे) गांडूळांनी केलेल्या हालचालीमुळे ज्या भुयारी वाटा तयार झाल्या असतील त्यांतून ते पाणी झिरपते आणि सेंद्रिय पदार्थांनी संपन्न असलेल्या मातीचे पातळ खताचं द्रावणं पिंपाखालून काढलेल्या पाईपांतून बाहेरच्या बाजूला जमा करून घेता येते. गवतकाडी आणि गाईचं शेण गांडूळ खातात म्हणून ते अधून मधून त्यांत टाकत राहावे लागते.

**निष्कर्ष –** गांडूळ खताच्या खोक्यांत जसं सेंद्रिय पदार्थांच विघटन होतं तसंच निसर्गातही होत असतं. सेंद्रिय टाकाऊ पदार्थ म्हणजे पालापाचोळा, काटक्या, खोड, मृत लाकूड, फुलं, फळं आणि इतर अवशिष्ट वनस्पती आणि प्राणी असे जमिनीवरील टाकाऊ पदार्थ दवानं किंवा पावसाच्या पाण्यानं ओले होतात. मग त्यांच मायक्रोबच्या बुरशी आणि मायक्रोअर्थ्रोपॉड यांच्या मदतीनं विघटन सुरु होतं.

मायक्रोअर्थ्रोपॉड्स दोन प्रकारचे असतात. मायक्रोब्स आणि बुरशी यांनी हल्ला केलेल्या पालापाचोळ्यावर जगणारे डेट्रिव्होर्स आणि या डेट्रिव्होर्सवर उपजीविका करणारे भक्षक.

पूर्णपणे न कुजलेला पालापाचोळा मृत मायक्रोन्स, मायक्रोअर्थ्रोपॉडस, त्यांचं उत्सर्जन आणि स्त्राव, हे सगळं एकत्र होऊन त्यापासून 'ह्युमस' बनतं. ह्युमस हे संयुक्त स्वरुपांत असतं. त्यामुळे झाडांना ते घेता येत नाही. इथंच गांडूळांच काम असतं. गांडूळ या ह्युमसवर जगतात. या गांडूळांनी टाकलेल्या उत्सर्जनामध्ये म्हणजे



कातीमध्ये ह्यांच्या विष्ठेमध्ये जी पोषकद्रव्य असतात, त्यांचा वनस्पतींच्या वाढीसाठी जसाच्या तसा उपयोग होतो. त्याची भरपाई वनस्पती पानगळीनं करतात. पानगळीची पानं मायक्रोब्स आणि बुरशी यांच खाद्य असतं. अशारीतीनं निसर्गाचं चक्र पूर्ण होतं. गांडूळांनी आतां हे सिद्ध केले आहे की ते कचऱ्याच रुपांतर सोन्यात करणारे किमयागार आहेत.

प्रकरण ९

# कोळी

(                )

गांडूळ खताविषयीचं माझा काम संपलं. आता मला १५ दिवसांसाठी के. विजयालक्ष्मी यांच्याबरोबर कोळ्यांचा अभ्यास करायचा होता. माझे डॅड तिला इंडियाची 'स्पायडर वूमन' म्हणतात. झुरळांची संख्या मर्यादित ठेवण्यासाठी एक जैविक शस्त्र म्हणून त्या कोळ्यांवरच संशोधन करीत होत्या. त्यांच्या कामाच्या ठिकाणी विविध प्रकारचे भरपूर कोळी बाटलीत भरून ठेवले होते. तिच्या देखरेखीखाली त्यांची वीण वाढत होती. या विषयावरील ती तज्ञ मानली जाते. याच विषयावरच तिचं पुस्तकही प्रसिद्ध आहे.

फोनची खरतर मी माझ्या वडिलांच्याकडून वाट पाहात होतो. सुसरींसाठी माझा मार्ग मोकळा आहे, या अर्थाची, त्याऐवजी डॅडीनी फोनवर कळवलं की क्रोकोडाईल बँकेच्या भेटीची राहण्याची व्यवस्था अजून पक्की झालेली नाही. त्यामुळे तो पर्यंतचे ८ -१० दिवस मी डॉ. विजयालक्ष्मी कडे जाऊन कोळ्यांविषयी जे काही शिकतां येईल ते शिकावे. त्या कोळ्यांचा वेगळा उपयोग ती कसा करते ते पहावं. मी लगेच तयार झालो. डॉ. के विजयालक्ष्मी आणि त्यांचा नवरा दोघेही (
) सेंटर फॉर इंडियन नॉलेज सिस्टिम' या संस्थेत काम करतात. ही संस्था एक मजली इमारतीमध्ये कार्यरत आहे. आणि डॉ. विजयालक्ष्मीचं ऑफिस १ ल्या मजल्यावर आहे.

इथं त्या किर्डीना प्रतिबंध करणाऱ्या वेगवेगळ्या वनस्पतींवर काम करतात. पण त्यांच्या त्या कामाविषयी मला काही देणेघेणे नव्हते. या इमारतीच्या गॅरेजमध्ये कोळ्यांसाठी लॅबोरेटरी होती. निरनिराळ्या अवस्थेतील वेगवेगळे कोळी तिथे बाटल्यांमधून पाळले होते. मी तिथे होतो तेव्हा तिथं अशा प्लॅस्टिकच्या पारदर्शक ५०० तरी बरण्या होत्या. प्रत्येकीवर नावाची पट्टी अडकवली होती. आणि त्या बरण्या ओळीनं मांडलेल्या होत्या. हवा खेळती राहण्यासाठी प्रत्येक बाटलीच्या झाकणाला लहान छिद्रं होती. त्यांना खाद्य देण्यासाठी झाकणालाच दुसरं एक लहान



भोक होतं. त्यांत कापूस बसवला होता या सगळ्या कोळ्यांच्या सर्व हालचाली, त्यांची वाढ, त्यांचं कात टाकणे, नरमादी मिळून अंडी ऊबवून पिल्ल बाहेर येणं. वगैरेवर डॉ. विजयालक्ष्मीचं पूर्ण लक्ष असायचे. त्यांच्या मदतनीसाचं नाव होतं सेल्वन. तो त्यांच्या सूचनांचं पालन करी, नोंदी ठेवी, लॉगबुक भरी.

डॉ. विजयालक्ष्मी बरोबर काम करण्याच्या १५ दिवसांत त्या कार्यक्रमांत मी एकदम रूळूनच गेलो. डॉ.नी दिलेली 'कोळी' या विषयावरील पुस्तकं मी वाचली. कोळ्यांचे प्रकार ओळखायला शिकलो. आणि त्याचवेळी एवढ्यामोठ्या संख्येमध्ये कोळ्यांच्यावर देखरेख ठेवण्याच्या सेल्वनच्या कामांतही मी मदत करीत होतो. डॉ. विजयालक्ष्मी काम करत होत्या जायंट क्रॅबस्पायडरवर. हे कोळी जाळी बांधत नाहीत ते फक्त झुरळं खातात. हे कोळी भक्ष्यापेक्षा आकाराने थोडे लहानच असतात. मी त्यांच्या पिल्लांना बाजूला काढायचो, खाऊ घालायचो, कात टाकण्याची अवस्था तपासायचो आणि माशा पकडून त्यांना खायला द्यायचो. मी इथे खूप पुस्तकं वाचली. काही वेळेस बागेतले कोळी मी पकडायचो आणि त्यांची ओळख पटवून त्यांचा अभ्यास करायचो.

गॅरेजमध्ये काही फक्त कोळी नव्हते. एका बादलीत झुरळंही ठेवली होती. त्यांची प्रजा त्यांत वाढत होती. बादलीच्या मध्ये कार्डबोर्डची गुंडाळी ठेवलेली होती आणि बिस्कीटांचे तुकडे त्या बादलीत टाकलेले होते. झुरळांना आणि त्या कोळ्यांना आठवड्यांतून एकदां खाद्य दिलं जायचं. सर्वात लहान कोळ्यांना खायला माशा दिल्या जायच्या. बागेतून रोज आम्ही त्या पकडायचो त्या त्यांना जिवंत द्यायला लागत आम्ही माशा पकडायला पारदर्शक बरणी वापरायचो आणि त्यामध्ये त्या आल्या की आम्ही त्यांना कोळ्याच्या बाटलीत सोडायचो. काही वेळेस कोळी लगेचच भक्ष्य खात असत इतरवेळी माशा त्या बाटलीत गुणगुण उडत राहयच्या. कोळ्यांना वाटेल तेव्हांच ते त्यांना खात असत.

डॉ. विजयालक्ष्मींनी एक विशिष्ट प्रकारच्या माशा एका छोट्या पिंजऱ्यात पाळल्या होत्या. त्याच्याभोवती मच्छरदाणीच्या नेटमध्ये मध्यभागी दूधाची छोटी बशी ठेवली होती. त्या माशांच्या प्रजननासाठी ते माध्यम होतं.

कोळ्यांची पिल्लंही स्वतंत्र बरण्यांमध्ये ठेवली होती. त्यांना अळ्या खाऊ म्हणून दिल्या जायच्या. मैदा जुना झाला की कुठल्या जातीचे कोळी कीड नियंत्रक म्हणून झुरळांवर उपयोगी पडतील अशी कोळ्यांबद्दल माहिती असेल म्हणजे त्यांची वाढ,

त्याचं खाद्य त्यांचं पुनरुत्पादन तर अशा कोळ्यांच्या जाती या झुरळांच्या भक्षक म्हणून मार्गदर्शक प्रजाती ठरेल. कोळ्यांशिवाय दुसर काम म्हणजे मी सेल्वमकडून तमीळ शिकायचा प्रयत्न केला. पण तो माझ्याकडून इंग्लिश शिकायला उत्सुक होता. त्याचा परिणाम असा झाला की आम्ही दोघंही त्या प्रयत्नांत सपशेल हारलो. तामिळ इंग्लिशचं कॉकलेट मात्र आम्ही बनवलं.

## डायरीतील उतारे

**कोळी**

**२६ नोव्हेंबर -** मानोकाका आणि मी डॉ. विजयालक्ष्मीच्या ऑफिसमध्ये जाण्यासाठी सकाळी ७ ला बाहेर पडलो. काका त्यांच्याशी बोलत होते. तेव्हा मी काही पुस्तकं चाळली. मॅडमनी नंतर, त्यांनी पाळलेले कोळी दाखवले. त्यांनी माझी सेल्वमशी ओळखही करून दिली. आम्ही निघण्यापूर्वी त्यांनी वाचायला मला काही पुस्तक दिली.

**२७ नोव्हेंबर -** सेल्वम कोळ्याच्या पिल्लांना त्यांच्या आईपासून वेगळे कसे करतो ते पाहयले. प्रत्येक पिल्लू त्यानं वेगवेगळ्या बरण्यांत ठेवलें. मग आम्ही जुन्या २०० पिल्लांना खाऊ घातले. ते कात टाकताना कसं लक्ष ठेवायचं ते सेल्वनं मला शिकवलं.

**२९ नोव्हेंबर -** आज फक्त पिल्लांना खाद्य दिलं. मॅडमना बरं नसल्यामुळे आज त्या ऑफिसमध्ये आल्या नाहीत. पण त्यांचा नवरा डॉ. बालसुब्रह्मण्यम आमच्या वर देखरेख ठेवायला येऊन गेले. दुपारी कोळ्यांवर काही पुस्तके वाचली. आज मी लवकर निघालो. कारण काका काकू काही दिवसांकरता बाहेर जाणार होते. आणि मी त्यांच्या नात्यातील संतोषकुमार यांच्याकडे राहणार होतो. ते संध्याकाळी ७॥ ला बाहेर पडले आणि मी त्यांच्या शेजाऱ्याकडे जाऊन थांबलो. संतोष येऊन ९ वाजता मला घेऊन गेला.

**३० नोव्हेंबर -** रविवार असल्यामुळे मी उशीरा उठलो. आणि इडली, डोसा आणि सांबार खाल्ले. गेल्या २ दिवसांची डायरी लिहीली. थोडावेळ टी.व्ही. पाहयला. दुसऱ्या दिवशी मी ला जाणार होतो म्हणून संध्याकाळी संतोष रस्ता दाखवण्यासाठी मला बस स्टँडवर घेऊन गेला.

**१ डिसेंबर -** मॅडम आज ऑफिसला आल्या होत्या. ऑफिसच्या कंपाऊंडमध्ये असलेले कोळी कसे गोळा करायचे ते त्यांनी मला सांगितलं त्यांनी मला कोळ्यांविषयी काही साहित्य वाचायला दिलं. आणि स्पायडरवर निबंध लिहायची तयारी सुरु कर म्हणून सांगितलं.

स्पायडरना खाद्य देऊन मी एकटाच बाहरे पडलो आणि काही प्रकारचे कोळी पकडून आणले. मग मॅडमनी त्यांची नावे आणि त्यांनी पकडलेल्या कोळ्यांची नावे शोधण्यात मला मदत केली, दुपारी मी माशा पकडून काही मोठ्या कोळ्यांना खाऊ घातल्या.

**२ डिसेंबर -** कोळ्यांच्या विविध जातींची मी माहिती करून घेतली काही साहित्य घरी वाचायला घेतले मग मी लवकरच बाहेर पडलो. ती पुस्तकं पाहण्यांत मी इतका मश्गुल झालो होतो की माझा थांबा आल्याचं मला कळलच नाही. आणि मी खूप पुढे गेलो. तिथून परत यायला मला अर्धा तास पायपीट करायला लागली. लोकांना रस्ता विचारला आणि मग मी स्टॉपवर पोचलो.

**३ डिसेंबर -** आज बर वाटत नव्हंत. म्हणून मी संस्थेत गेलो नाही. मी घरी वाचायला आणलेली पुस्तकं वाचली. माझ्यालेखी रिपोर्टची तयारी केली.

**४ डिसेंबर -** नेहमीप्रमाणे कोळ्यांना खाऊ घातलं. मग ७० माशा पकडल्या आणि त्या प्रौढ कोळ्यांना खाऊ घातल्या २ कोळ्यांना मिलनासाठी वेगळं ठेवलं आणि माझी निरीक्षणं नोंदवली संध्याकाळपर्यंत माझा रिपोर्ट लिहीत बसलो.

**५ डिसेंबर -** न्यू कॉलजेमध्ये जाऊन मला मी केलेल्या व्हर्मीकल्चरचा रिपोर्ट आणायचा होता.

**६ डिसेंबर -** प्रथम कोळ्यांच्या पिल्लांना खाऊ घातले. मग माशा पकडल्या. एका मादीचे अंड नुकतच फुटलं होतं म्हणून सेल्वम आणि मी मिळून पिल्लं वेगळी करून स्वतंत्र बरणीत टाकली.

**७ डिसेंबर -** प्रथम रिपोर्ट लिहिला. मग मॅडमजवळ सुधारण्यासाठी दिला. त्यांनी सुधारून दिल्यावर मी तो पक्का लिहायला घेतला. संध्याकाळपूर्वी मी तो पूर्ण केला. आणि मॅडमकडे संमती साठी दिला. मॅडमनी माझा रिपोर्ट पाहून सही करून दिला आणि मला प्रमाणपत्रही दिलं. मी जरा लवकरच तिथून बाहेर पडलो. कारण अजूनही मला थोडं बर वाटत नव्हतं. आणि दुसऱ्या दिवशी मला सुसरीच्या केंद्रावर जायचं होतं.

## प्रत्यक्ष कामाची टिपणे.

**कोळी**

हल्ली आपण सर्वजण बेगॉन किंवा दुसरी काही कृत्रिम विषारी रसायनं झुरळ आणि इतर किटकांचा प्रतिबंध करण्यासाठी वापरतो. त्यामुळे होतं काय की झुरळं, किटक यांच्यामध्ये विषाला प्रतिबंधक शक्ति निर्माण होते. शिवाय अशी कृत्रिम रसायनं अत्यंत घातक असतात आणि ती पर्यावरणाचं प्रदूषण करतात. या कीटकांविरुद्ध जैविक उपाय मिळाले तर किती सोईच होईल. कोळी हे त्याच उत्तर आहे. स्पायडर किंवा कोळी हा कीटक नाही. किटकाच्या शरीररचनेचे डोके, छाती, पोट असे अवयव असतात. त्यांचे डोळे म्हणजे त्यांत संयुक्त भिंगरचना असते. आणि त्यांना ६ पाय असतात. विशिष्ट अवस्थेत त्यांना पंख येतात, आणि संवेदक (अँटेना) ही असतात. कीटक अंडी घालतात आणि अंड्यातून बाहेर आलेली पिलं पूर्ण वाढ झालेल्या आपल्या आई वडिलांपेक्षा पूर्ण वेगळी दिसतात. लहान पिलं कात टाकून मोठी होतात.

याउलट कोळी संधिपाद प्राणी आहे. (                ) सीपोलोथोरॅक्स पोटाला जोडलेला अशी त्याची शरीररचना असते. कोळ्यांना आठ पाय असतात. आणि किटकांना संवेदक - अँटेना असतात, त्याऐवजी कोळ्यांना पेडिपाल्प असतात. सामान्यतः कोळ्यांना आठ साधे डोळे असतात. किंवा थुंकी कोळ्यासारख्या प्रकारांत सहा डोळे असतात. दृष्टीची तीक्ष्णता वेगवेगळ्या प्रकारांत वेगवेगळी असते. गुहेत कोळी पूर्ण आंधळे असतात. तसंच त्यांची आयुर्मर्यादाही प्रकारांनुसार २ महिन्यापासून १० वर्षापर्यंन्त असू शकते.

बहुतेक सर्व कोळ्यांना सुरुवातीला दोन्ही बाजूला असलेल्या अवयवाचे रुपांतर विषारी रसायन असलेल्या नांग्यामध्ये होते. मानवी कातडीला दंश करू शकरणाऱ्या नांग्या फार कमी कोळ्यांना आहेत. यांपैकी बहुतेकांपासून मानवाला गंभीर स्वरुपाची इजा होत नाही. त्यांच्यातील फक्त ४ किंवा ५ प्रकारच्या जाती जीवघेण्या ठरु शकतात.

दक्षिण अमेरिकेत सापडणारा ब्लॅक विडोस्पायडर हा सर्व कोळ्यांमध्ये सर्वांत जास्त विषारी असतो. या कोळीच्या मादीचे विष इतके तीव्र असते की त्यामुळे माणूस मरतो. ही मादी नराशी मिलन झाल्यावर नरालाच खाऊन टाकते आणि आपलं नांव सार्थ करते. हा कोळी चमकदार काळ्या रंगाचा असतो. आणि त्याच्या पोटाच्या दोन्ही बाजूला वाळूच्या घडाळ्याच्या आकाराची खूण असते.



माणसाला गंभीर इजा होऊ शकणारे कोळी भारतांत नाहीत हे आपले नशीब!

जगांत कोळ्यांच्या ३०,००० जाती आहेत. माऊंट एव्हरेस्टवर २३००० फूट उंची पर्यंत तसंच पाण्याखालीही ते राहतात.

बहुतेक सर्व कोळी मांसभक्षक आहेत, ते कीटक खातात, लहानपक्षी, सस्तन प्राणी आणि सरीसृप एवढंच नाही तर विषारी साप आणि इतर कोळी यांनाही खातात. भक्ष्याला प्रथम ते त्यांच्या विषानं निष्क्रिय करतात. भक्ष्याला चावा घेऊन आपलं विष ते त्याच्या शरीरांत सोडतात. आणि दात नसल्यानं भक्ष्याच्या शरीरांतील जीवनरस ओढून घेतात. मोठ्ठे कोळी आपल्या रुंद आणि बळकट जबड्यांनी भक्ष संपूर्ण किंवा थोडं थोडं खाऊन संपवतात. ते अन्नाशिवाय काही आठवडे, तीन महिन्यांपर्यंतही राहू शकतात. हा काळ त्यांचे प्रकार, आकार आणि वयानुसार हा अवधी वेगळा असतो. त्यांच्या भक्ष्यांतून त्यांची पाण्याची गरज भागते. त्यामुळे त्यांना वेगळं पाणी लागत नाही. भक्ष्य पकडण्यासाठी बरेच कोळी जाळं विणतात. पण भक्ष्य पकडायचे अन्य उपायही ते करतात. काही कोळी भक्ष्यावर थुंकीतून चिकट जाळं टाकतात. दुसरे काही बिळं खोदून पिंजरा लावतात. त्यांना भुक लागती की बिळातून अचानक बाहेर येऊन ते भक्ष्यावर तुटून पडतात. एक प्रकारचा कोळी त्याच्या रेश्मी धाग्याच्या एका टोकाला एक थेंब ठेवतो. आणि आपल्या पायांनी तो पकडून ठेवतो. कीटक त्याजवळून जायला लागला की कोळी त्याभोवती धागे गुडाळून त्याला बांधून ठेवतो. काही कोळी फुलावर बसतात आणि मधुरस घ्यायला आलेल्या कीटकांवर हल्ला करतात. काही जाळं विणतात, ते आपल्या दोन्ही बाजूच्या नांगीमध्ये पकडतात आणि खालून जाणाऱ्या कीटकावर ते फेकतात. काही कोळी मात्र इतर कोळ्यांना खाऊनच राहतात. त्याना चाचे कोळी म्हणतात. काही कोळी दुसऱ्या कोळ्यांच्या घरांत जाऊन राहतात आणि ते इतके लहान असतात की यजमान कोळी त्यांना खात नाहीत. जाळ्यात आलेले छोटे भक्ष्य खाऊन ते उपजीविका करतात आणि जाळही स्वच्छ राखतात.

कोळ्यांचे स्वसंरक्षणाचे उपायही अगदी थक्क करून सोडतात. काही कोळी पक्ष्याच्या विष्ठेसारखे दिसतात. ही त्यांनी केलेली नक्कल असते. इतर काही वाळक्या पिवळ्या किंवा काळपट अशा कुजू लागलेल्या पाने वा फांदीचं अनुकरण करतात. तर काही कोळी मुंग्यांची नक्कलं करतात. म्हणजे मग पक्ष्यांपासून सुरक्षित राहता येतं. काही कोळी तर काही मर्यादेत आपला रंग आणि आकारही बदलतात आणि

भोवतालाशी अनुकुलन करून घेतात.

आणखी एक प्रकारचे कोळी आपल्या जाळ्यामध्ये नागमोडी पांढऱ्या रंगाचा धागा बांधतात त्यामुळे पक्षी सावध होतात आणि जाळे टाळून उडतात. अशा रीतीनं जाळ्याचं रक्षण होतं.

नर हा मादीपेक्षा लहान असतो. आणि त्यामुळे मादीकडून खाल्ला जातो. म्हणून नर कोळी अनेकयुक्त्या करतो. काही नर कोळी धाग्यांवर आघात करून किंवा धागे खेचून जणू सांकेतिक संदेश देतात की मी उपवर नर आहे, खाद्य नाही.

काही कोळी आपल्या साथीदाराला रेशमी धाग्यांत गुंडाळून एखादी रसदार आळी बहाल करतात. पण मीलन झाल्यानंतर हीच भेट पळवून ते दुसऱ्या मादीला देतात. काहीवेळेस नर मादीला कीटकाचा पोकळ सांगाडासुद्धा भेट देतात. काहीवेळा नर कोळी मीलनापूर्वी मादीला सैलसर धाग्यांनी एका जागी बांधून ठेवतो. काही कोळी तर मादीच्या जाळ्याजवळ प्रतीक्षा करत राहतात. मादीला भक्ष्य मिळालं की ती भक्ष्य खात असताना ती वेळ साधून ते मादीशी मीलन करतात. काहीवेळेस नर मादीपेक्षा इतका लहान असतो की मीलनाच्यावेळी तिच्या तो लक्षांतही येत नाही. आणि त्यामुळे त्याचं संरक्षण होतं.

बहुतेक कोळी हे नैसगिकरित्या एकटे राहतात. प्रत्येकजण आपलं स्वतंत्र जाळं बांधतो. एक कोळी जर चुकीनं दुसऱ्याच्या जाळ्यांत पडला तर मोठ्ठा कोळी लहानाला खाऊन टाकतो. एक कोळ्याची जात मात्र सामाजिक आहे. ते अनेक एका जाळ्यांत राहतात. काही वेळेस असे शेकडो किंवा हजारो लहान मोठ्ठे कोळी एका जाळ्यात राहतात. एका माशीच भक्ष्य जरी जाळ्यांत सापडलं तरी ते सर्व मिळून त्याचा समाचार घेतात.

त्यांची संख्या फार झपाट्यानं वाढते. मीलनानंतर अंड्यांसाठी पिशवी विणली जाते आणि आंतून फलित झालेली अंडी या पिशवीत घातली जातात. मादी ती पिशवी तिच्या पाल्प आणि नांगीमध्ये पकडून ठेवते. अंडी आंत पक्व होतात किंवा काही जातीत बाहेर. हे त्या त्या जातीनुसार वेगळं ठरतं. १५ ते २० दिवसांत ८०% अंड्यांतून पिल्लं बाहेर येतात. ती फक्त आकारनं लहान असतात बाकी सगळी आपल्या आई वडिलांसारखीच असतात. लहान पिल्ल कात टाकून मोठी होतात. मग ७ ते १० दिवसांच्या अवधीतच पुन्हा नव्या अंड्यांच्या पिशवीत अंडी घातली जातात. आणि साठवलेल्या पुंबीजांनी ती पुन्हा फळतात. मादी या साठवलेल्या पुबीजांच्या मदतीने



नराशी मिलन न करता ३ -४ खेपेला अंडी घालते. अर्थात नर मिळाला तर ती त्याच्याशी मिलनालाही तयार असते.

सर्वोत्तम जैविक किटकनाशक म्हणून कोळी माहित आहेत. आपल्या पैकी फार कमी लोकांना याची जाणीव आहे की कोळी कीटकांना पिंजऱ्यांत पूर्वीपासून पकडत आले आहेत, पकडत आहेत, आणि पुढेही पकडत राहाणार आहेत. पृथ्वीवर माणसाचं अस्तित्व असेल किंवा नसेल तरीसुद्धा! स्वजातीला खाण्याची त्यांची वृत्ती आहे. म्हणजे दोन किंवा जास्ती कोळी एका ठिकाणी ठेवले तर ते एकमेकांना खाऊ शकतात. त्यामुळेच जन्म झाल्यापासूनच त्यांना वेगवेगळं ठेवायला लागतं. पारदर्शी प्लॅस्टिकच्या बरण्यांमध्ये त्यांना पाळता येईल . हवेसाठी झाकणाला टाचणीएवढी भोक करायला हवीत. त्यांचं खाद्य आंत टाकायला एक मोठ्ठ भोक असावं आणि ते कापसाच्या बोळ्यानं बंद कराव.

पिल्लाना खास तयार केलेलं अन्न द्याव. उदा. थ्रायपोलियम, ड्रोसोफिला, फळमाशी किंवा घरातील माशीची अळी. ती मोठी होतील तशी घरांतल्या माश्या आणि नंतर झुरळ खातात. भक्ष्य आणि कांत यांची स्वच्छता करणं आवश्यक आहे त्यासाठी दोन बरण्या हव्यात दर आठवड्याला वापरलेली बरणी साबणपाण्यानं धुवून उन्हांत वाळवावी. बरण्या ज्या बैठकीवर ठेवायच्या त्यांच्यापाया खाली पाणी असावं, म्हणजे मुंग्या येणार नाहीत. मोठ्या कोळ्यांना मिलनापूर्वी खाद्य द्यावं. मध्यम तपमान त्यांना मानवतं.

**खाद्याची तयारी**

१) दूध पावडर आणि मध्यम आकाराचा कापसाचा बोळा यामध्ये पाणी मिसळून ठेवायचे आणि त्यात रोज एक चमचा दूध पावडर घालावी.

२) **ड्रोसोफिलाची अळी -** २ कप पाण्यांत पावकप गव्हाच पीठ आणि दोन मध्यम आकाराचे गूळाचे खडे घालून ते मिश्रण उकळायचं. घरातल्या माशा आणि ड्रोसोफिला एखाद्या लाकडी किंवा धातूच्या चौकोनी पेटीत वाढवता येतील. ही पेटी मेसनेट घालून ठेवावी. पीठ गूळाचे मिश्रण लहान वाटीत घालून या पिंजऱ्यात ठेवावं. पूर्ण वाढ झालेल्या माश्या आणि ड्रोसोफिल पकडून त्या पिंजऱ्यात सोडावे. म्हणजे ते आत अंडी घालतील.

३) **थ्रायपोडियमची अळी -** या पूर्ण वाढ झालेल्या अळ्या रवा मैद्यांत सापडतात. एका बादलीत रवा मैदा ठेवून वरून हवेसाठी छिद्र ठेऊन झाकावी. त्यांत

रोज थोडं पाणी शिंपडावं अळ्या बाहेर काढायला आवश्यक तिथं गाळणं वापरावं.

४) **झुरळं** - हवेसाठी मोठी छिद्र असलेली एक बादली घ्यावी. ती नेटनं आच्छादावी. कागदाचे उभे रोल बादलीत ठेवावेत यावर झुरळांना चढता येईल.

▯



## प्रकरण १०

# क्रोकोडाईल केक

मी घेतलेल्या वर्षभराच्या सुट्टीमध्ये डिसेंबर महिन्याची मी उत्सुकतेनं वाट पहात होतो. ममलापूरमच्या क्रोकोडाईल मगर प्रजनन केंद्रावर जाण्यासाठी माझा मार्ग मोकळा झाला. तीन महिन्यापूर्वीच माझ्या डॅडनी रोमुलस व्हिटेकरला त्यांच्या मगर बँकेत मी काही दिवस राहू शकेन का याबद्दल विचारलं होतं. रोम्युलस व्हिटाकर म्हणजे सुप्रसिद्ध सर्प तज्ज्ञ. ते आता क्रोकोडाईल बँक' चालवतात. वडिलांच्या पत्राला बरेच दिवसांत उत्तर मिळाल नव्हतं कारण रोम्युलस ठिकठिकाणी प्रवास करतात हे एक आणि मुख्य कारण म्हणजे या छंदाला वाहून घेतलेल्या माणसांजवळ अशा कामांना वेळ कुठे असतो.

मी तर आतापर्यंत तिथं जायची आशा सोडलीच होती. पण मग अस झालं की श्रीलता स्वामीनाथन म्हणजे जयपुरला ज्यांच्याकडे आम्ही उतरलो होतो त्यांनी माझ्या वडिलांना सांगितलं की तिची बहिण ममलापुरमला राहाते. आणि याकामी तिची मदत होईल. त्यांच्यात बरीच फोनाफोनी झाली. आणि अखेर जमलं. मानोकाकांकडे माझ्या डॅडचा फोन आला की मी आता तिथे जाऊ शकेन तेव्हा मला अत्यानंद झाला.

मानोकाकांच्या पुतण्यानं - बाबूनं ९ डिसेंबरला क्रोकोडाईल बँकेला नेणाऱ्या बसमध्ये मला बसवून दिलं आणि पुढचा १ महिना मी जंगलाच्या जास्तीत जास्त जवळ राहिलो. तो काळ फार सुदंर होता. खरतर ख्रिसमससाठी मी घरी परत जायच असं ठरलं होतं पण मी तिथंच राहयचा आग्रह धरला आणि माझ्या आई वडिलांनी मला होय म्हटल्यावर मला स्वर्ग दोन बोट राहिला मला हा अनुभव इतका आवडला की मी पुन्हां मार्चमध्ये अल्पकाळापुरता का होईना इथे आलो कारण तो मगरींचा पिल्ल बाहेर यायचा काळ होता. क्रोकोडाईल बँक म्हणजे हजारो मगरींच घर लहानमाठ्या आकारांच्या उतार असलेल्या बांधीव हौदात या मगरींना ठेवलेले होते. उतरामुळे पाणी हौदाच्या खोलगट भागात जमा होतं आणि उतारावरच्या कोरड्या जागेवर येऊन मगरी सूर्यस्नान करु शकतात. काही प्रचंड मोठ्या मगरी स्वतंत्र हौदांत

होत्या. सामान्यतः वेगवेगळ्या प्रजातींना वेगवेगळे हौद होते. नर आणि माद्या याही वेगळ्या ठेवलेल्या होत्या. एका मोठ्या जागेत छोटे छोटे भाग करुन त्यात मगरींची पिल्लं ठेवली होती.

मगरीप्रमाणेच सापांनाही या बँकेत महत्त्वाचं स्थान होतं. कारण रोम्युलस व्हिटाकरचं सर्प हे पहिलं प्रेम आहे. काही वर्षांपूर्वी मद्रासचं सर्पोद्यान त्यांनी सुरु केलं आणि अजूनही त्यांना लोक सापप्रेमी किंवा स्नेकमॅन म्हणूनच ओळखतात. क्रोकोडाईल बँकेच्या परिसरात सापांसाठी एक मोठा हौद आहे. त्यांत सापांना ठेवलं आहे. इथं इरुळा जमातीचे लोक सापाचं विष काढतात. सर्पांच्या भागांत प्रवेश करण्यासाठी वेगळ तिकीट काढावं लागतं विषारी साप एका वेगळ्या दालनात पात्रांमध्ये ठेवलेले आहेत. अर्थातच किंग कोब्रा किंवा नागराजाला स्वतंत्र दालन आहे.

क्रोकोडाईल बँकेमध्येही बांध घालून छोट्या हौदांत कासव ठेवली आहेत. आणि मोठ्ठ मत्स्यालय केलेलं आहे. परिसरात टोकाला ग्रंथालय आहे. या प्राण्यांवर इथे बरीच पुस्तकं, मासिक ठेवली आहेत. याला जोडून संशोधकांसाठी आणि पाहुण्यांसाठी निवासी घरे होती. मी तिथे रहात होतो. बहुतेक सर्व परदेशी पाहुणे तेव्हा तिथे रहायचे. निवासी घरं साधी पण आरामशीर होती. प्रत्येक खोलीत बिछाना, डेस्क आणि टेबल आणि त्याला जोडून स्नानघर, स्वच्छता घर होतं. मी पण अशाच एका खोलीत राहात होतो. इरूला कुटुंबातील लोकं जिथं सापांचे हौद होते त्याजवळ राहात होते. कायम स्वरुपी कर्मचारी म्हणजे संचालक, उपसंचालक आणि इतर कर्मचारी त्यांची वेगळी घरे क्रोकोडाईल बँक परिसराजवळच होती. माझ्या तिथल्या मुक्कामांत तिथल्या खुपशा लोकांशी, अगदी सहा फुट उंचीचे संचालक 'रोम्युस व्हिटेकर' यांच्याशीही माझी चांगली दोस्ती झाली. रोम्युसना सगळीजण 'रोम' म्हणत. त्यांची बायको जाई व्हिटेकर त्यांचे मुलगे समीर आणि निखील, उपसंचालक हॅरी ॲन्ड्रुज हे केरळचे होते. त्यांची पत्नी रोमेन, आणि मुलगा तारक, बेंगलोरचा साप पकडणारा गेरी आणि इतर अनेक जण यांच्याशी माझी मैत्री झाली. क्रोकोडाईल बँक इथला माझा मुक्काम खूप रोमांचपूर्ण होता. आणि मला बरच काही शिकायला मिळालं पहिल्याकाही दिवसांत माझ्यावर सोपवलेलं काम होतं, ते त्वचा रोग झालेल्या २ फुट लांबीच्या कासवावर उपचार करायचं मी त्याच्या पायांना औषध लावून त्यावर बँडेज बांधायचो. दुसऱ्या दिवशी पुन्हा उपचार करण्यापूर्वी मी त्याला पाण्यांत कोबी टाकून खाऊ घालत असे.



कासवांकडून मी मोठ्या प्राण्यांकडे वळलो. घोरपड आणि हिरवा इगुआना (सरडा) मी हाताळला होता. तो इगुआना खूप मोठ्या आकाराचा, साधारण डॅश्यूंडच्या आकाराचा होता. त्याच्या शरीराच्या लांबीपेक्षा त्यांची शेपूट दुप्पट तिप्पट, कदाचित त्याहूनही जास्त लांब असेल डोक्यापासून शेपटी पर्यंत तो २ ते २॥ मीटर लांब होता. तीक्ष्ण नख्या होत्या आणि पाठ डोकं काटेरी! जेव्हा मी पाहुण्यांना माहिती देताना या बँकेतून हिंडायचो तेव्हा मी त्याला बाहेर काढायचो म्हणजे पाहुण्यांना त्याची सॅडपेपरसारखी कातडी हातानं बघता यावी, प्रदीर्घकाळ इथल्या बंदिवासांत तो असल्यानं त्याची आमच्याशी अगदी चांगली दोस्ती झाली होती. उपसंचालक असलेल्या हॅरीनं जेव्हा सांगितलं की तो इगुआना वयानं माझ्याएवढाच आहे तेव्हा मला अगदी आश्चर्यच वाटलं.

काही वेळेस मी घोरपडही हाताळायचो. त्या खूप बळकट असतात. नख्या तीक्ष्ण असतात आणि चावा भयंकर असतो. जेव्हा जेव्हा त्यांना हातात घ्यायला मी हौदांत उडी मारून उतरायचो तेव्हा तेव्हा त्या पाण्यातून पळायच्या. लवकरच, त्या पाण्यांत पळायच्या आधी वेगानं त्यांना पकडणं मला जमू लागलं त्या कोंडीत सापडल्या की शेपटी आपटायच्या आणि माना फुगवायच्या आणि फुत्कार टाकायच्या. त्यांतल्या काही झाडावर धांव घ्यायच्या मग तुम्हाला काहीच करता येत नाही. लवकरच मला हे कळल की त्या भीतीदायक वाटल्या तरी पाण्यात त्यांना पकडणं सोप्पं आहे.

क्रोकोडाईल बँकेच्या परिसरात हौद आहेत. प्रत्येक हौदाचा आकार त्यात ठेवलेल्या प्राण्यांच्या आकार आणि प्रकारनुसार वेगवेगळा आहे आणि प्रत्येक हौद हा बंदिस्त केला आहे. हौदामध्ये पाणी असते. हौदातील प्राण्यांना पोहायला आणि प्यायला पाणी लागते त्यामुळे ती गरजच आहे. मगरींचे हौद रिकामे होते, त्यात झाडे नव्हती.

पण घोरपडीच्या हौदात मात्र खूप झाडे होती. झाडांच्या फांद्या त्या हौदातच वाढल्या होत्या. त्यामुळे घोरपडी झाडांच्या या फाद्यांवरून दुसऱ्या झाडांवर जाऊ शकायच्या नाहीत किंवा फांद्यांवरून हौदाबाहेरही जाऊ शकायच्या नाहीत.

घोरपडींच्या तळ्यांत कमरेइतके पाणी होतं आणि ते काळपट होतं. त्यामुळे तुम्हाला त्यांचं डोकं, पाय किंवा शरीर हाताला लागेपर्यंत चाचपडायला लागायचे. (पाण्यांत त्या सहसा सापडतं नाहीत) नंतर मी पुन्हा चाचपडत त्यांची शेपूट शोधायचो, पकडून ती वर उचलायचो आणि पाण्याखाली त्यांची मान पकडायचो. त्यांची मान

इतकी जाड जूड असे की माझ्या बोटांत ती बसायची नाही. जमिनीवर त्यांची शेपूट धरून त्यांना पटकन पकडणं सोप्प असे. पण त्यांनी चावा घेऊ नये म्हणून त्यांची मान त्वरेनं पकडावी लागे.

एकदा क्रोकोडाईल बँकेच्या कर्मचाऱ्यांना काही घोरपडींना झाडावरून खाली उतरावयाच होतं. त्यांनी एक लांब काठी घेतली आणि दोन मजली इमारती एवढ्या उंचीवरून त्यांना ढकलले त्या जमिनीवर पडल्या पण त्यांना काही दुखापत झाली नाही आणि त्या इकडे तिकडे धावायला लागल्या. मला आठवतयं एकदा बळकट बांध्याच्या निखिलला गेरीनी आव्हान दिलं की बिळांतून अर्ध्या बाहेर असलेल्या घोरपडीला पूर्ण खेचून बाहेर काढायची. सुरुवातीला त्याला वाटल की घोरपडीची शेपूट तुटेल पण त्यानं त्याच्या सर्व ताकदीनिशी प्रयत्न करुनही त्या घोरपडीला तो इंचभर ही ओढू शकला नाही.

सकाळच्या वेळी मी कामगारांना मगरींचे हौद साफ करायला मदत करायचो. आम्ही हौदांत मोठ्ठ्या काठ्या घेऊन उतारायचो आणि सगळ्या मगरींना पाण्यामध्ये हाकलायचो. मग आम्ही मगरींची विष्ठा आणि त्यांनी खाऊन उरलेले त्यांच खाद्य ज्यांत हाडं बरीच असायची ते स्वच्छ करायचो नेहमीसाठी हा उद्योग एक पुरुष कर्मचारी मगरी पाण्यांत जाईपर्यंत त्यांचा पाठलाग करीत मग ३-४ बायका झाडू टोपल्या आणि फावड घेऊन साफसफाई करायच्या कधी कधी मगरींना आम्ही हौदात नको असायचो त्यांना नाकावर किती ही फटके मारले तरी त्या आमचा पाठलाग करायच्या, अन मग दमून तो प्रयत्न सोडायच्या आणि नाईलाजाने धाडकन पाण्याकडे धाव घ्यायच्या, पाण्यातल्या आपल्या इतर मित्रांमध्ये सामील व्हायच्या. एकावेळी पाण्यात हजार एक मगरी असायच्या. मी तिथं होतो तेव्हा तेथील मगरींची संख्या ७ हजार होती.

एका ठिकाणाहून मगरी दुसऱ्या ठिकाणी नेऊन सोडण्याच्या कामांतही भाग घ्यायची संधी मला मिळाली. हे काम अगदी धाडसाचं होतं.

आधीच्या प्रजनन काळामध्ये एका मोठ्या आकाराच्या घरीयलचा वरचा जबडा दुसऱ्या नराबरोबरच्या मारामारीत फाटला होता. त्या नराला दुसऱ्या हौदांत ठेवायला हवं असं रोम आणि हॅरी यांनी ठरविलं मगरीला पकडायचं म्हणजे दोरीचा फासा करून तो तिच्या शरीराभोवती घट्ट बसला की मगरीला बाहेर खेचायचे आणि त्याचवेळी १०-१५ लोकांनी उडी मारून तिच्या अंगावर बसायचं. नाहीतर ती पुन्हा



पटकन पाण्यांत उडी मारते. मग तिचं तोंड रबरी पट्ट्यानं बांधायचं आणि तिला शिडीवर ठेवून, शिडीशी जखडून ठेवायचं आणि ती शिडी उचलून, हव्या त्या ठिकाणी ठेवून त्यांत मगरीला सोडायचं. मगरीचं वजन साधारण २५० किलो असतं आणि लांबी असते २ ते ३ मीटर. १५ ते २० लोकं तिला उचलायला लागतात.

एकदा का तिला पाण्याजवळ नेली की तिला बांधलेले दोर सोडून आणि तोंडाचा रबरीपट्टा काढून घेऊन जमिनीकडे धाव घ्यायची. याला धाडसचं हवं. मगरी अंगावर धावून येण्यापूर्वी सुरक्षित पोचणं महत्त्वाचं.

घरीयलचा नर मगरींच्या माद्यांच्या हौदामध्ये सोडताना हॅरी गंमतीन ओरडला. मग आता आपल्याला 'घामर' (घरीयल आणि मगर यांच्या काल्पनिक संकरातून निर्माण होणारी प्राणी) मिळणार की काय? अर्थातच मगरींचा असा जातीबाहेरं संकर कधीच होत नाही. आम्ही या घरीयल नराला, मादी मगरीच्या हौदात सोडत होतो ते इतर नरांपासून त्याला दूर ठेवल्यामुळे विश्रांतही मिळेल आणि त्याच्या जखमा बऱ्या व्हायला अवधी मिळेल.

दुसऱ्या एका वेळी 'जॉज्'लाही दुसऱ्या हौदांत हलवायला लागलं कारण त्याला मादी जोडीदारणीची गरज होती. जॉज् म्हणजे भारतांतील सर्वांत मोठ्ठी, बंदिवासातील खाऱ्या पाण्यातील मगर. १६ फुट लांब होता हा नर. बहुधा जगांत लांबीमध्ये त्याचा तिसरा चौथा नंबर लागेल. ग्रेट व्हाईट मॅन इटिंग शार्क चा दुसरा भाग 'जॉज टू' आल्यावर क्रोकोडाईल बँकेतल्या लोकांनी या मगरींच सार्थ नाव ठेवलं होतं जॉज 'थ्री' हा त्याच्या हैदांमध्ये एकटा राजासारखा राहत होता आणि त्या हौदात येणाऱ्या इतर मगरीना तो मारून टाकायचा. त्यामुळे त्याला एकट्याला ठेवलं होत. जेव्हा आम्ही त्याचा हौद स्वच्छ करण्यासाठी त्यांत उतरायचो त्यावेळी तो पाण्यांत असला तरी आमच्यावर धावून यायचा. आम्ही सगळे मिळून जी धावपळ करायचो त्यापेक्षा कितीतरी तो एकटा आम्हाला करायला लावायचा. शेवटी १० वर्षांनी क्रोकोडाईल बँकेला वाटल की आता याला जोडीदारीण हवी. समोरच्या हौदातील मादीला पाहून तो बांधाच्या भिंतीवर धडका द्यायला लागला. तो उपवर झाल्याचं ते लक्षण होतं.

एक मादी मगर आम्ही त्याच्या हौदात सोडायला लागलो तेव्हा मी विचारलं की ती मादीच आहे नां हे तपासायला हव नां (मी नुकताच नर मादी फरक ओळखायला शिकलो होतो) त्या मगरीला चाचपून तिच लिंग पाहून मी ओरडलो, हा तर नर

आहे. गॅरी म्हणला शक्यच नाही, बघू बरं!' आणि त्यानंही तो नर असल्याची खात्री केली अन तो म्हणाला 'रोम अरे खरच हा नर आहे.' राहूल सेक्सर चॅपीयन अशी घोषणाही त्यांना दिली.

मगरींच्या बाह्य रुपावरुन नरमादी फरक कळत नाही. मगरी विशिष्ट वयाच्या झाल्यावर त्यांचं लिंगनिदान करून त्यांच्या कातडीवर नर की मादी त्याचा शिक्का उमटवतात ही इथली पद्धत होती. पण लिंग निदान करताना काही वेळेला चूक होऊ शकते. 'जॉज् तीन'साठी मादी शोधताना अशीच चूक झाली होती. 'जॉज'च्या हौदांत त्याला सोडलं असत तर त्याचे काय हाल झाले असते, याची कल्पनाच करता येत नाही. काही मिनिटांतच त्याच्या चिंध्या चिंध्या झाल्या असत्या. त्या प्रसंगानंतर आम्ही ज्यांना माद्या समजत होतो. त्यांच्या लिंगाची पुन्हा दोन दोनदा खात्री करून घेऊ लागलो. तेव्हा बऱ्याच मगरींचे चुकीचे लिंग निदान झाल्याचे लक्षांत आलं. एव्हाना बहुतेक मगरी पाण्यांत दिसेनाशा झाल्या होत्या. आणि मादी शोधणं मोठ अवघड झालं होतं. रोमनं सुचवलं की पाण्यात शिरुन पाठलाग करून मगरींना जमिनीवर पळवायचे. पण खोल पाण्यांतून त्यांचा पाठलाग करुन त्यांना पळवण हेही सोप्प नव्हतं. पण त्यानं दुसरी युक्ति काढली लोखंडी सळ्या एकत्र करून आम्ही त्या घट्ट जाळीनं गुंडाळून बांधल्या ते जाळं आमच्या पुढे धरुन आम्ही हिरव्या पाण्यांत घुसायचो, त्यामुळे खोल पाण्यातल्या मगरी जमिनीकडे धाव घ्यायच्या पण याचा उलटाच परिणाम झाला. जमिनीवरच्या मगरी पाण्यांत धाव घेऊ लागल्या तेव्हा दोन विरुद्ध बाजूंनी धावणाऱ्या मगरींच्या टकरी व्हायला लागल्या. आणि असा काही गोंधळ झाला. सगळ्या मगरी इतस्तता उधळल्या. एका मगरीच्या तावडीत माझ्या शेजारच्याचा हात सापडला. मी माझ्या भोवती धरलेल्या जाळीतून माझ्या पायाशी मगर असल्याचं माझ्या लक्षात आलं. बऱ्याच प्रयत्नांती अखेरीस आमच्या कामगिरीत आम्हाला यश मिळालं. बऱ्याच मगरीना आम्ही जमिनीवर पळवून लावलं आणि त्यांतून एक मादी जॉज ३ साठी आम्हाला मिळाली. जॉज ३ इतक्या वर्षांच्या प्रतीक्षेनंतर मादीला पाहून केवढा चकीत झाला असेल कल्पना करा बरं! ती त्याच्यापेक्षा आकारानं निम्मी होती. लांबी आणि रुंदीतही. नर आक्रमकतेमुळे म्हणा किंवा तो उत्तेजित झाल्यामुळे म्हणा त्या बिचाऱ्या मादीला त्यानं आपल्या जबड्यांत पकडून झिंजाडली. तारक म्हणाला मगरींचं बार्बाक्यू चवदार लागतं. त्याला वाटल होत की ती मादी आता काही जगत नाही. मादीला जखमा झाल्या



पण ती जीवंत राहिली पण ती 'जॉज' पासून संभाळून राहयला लागली. शक्यतो त्याला टाळून ती पाण्याबाहेरच वावरायची.

त्यानंतर बऱ्याच दिवसांनी मी जेव्हा दुसऱ्यांदा क्रोकोडाईल बँकेला भेट दिली त्यावेळी त्यांचा प्रजननाचा काळ होता. रोज त्यांची घरटी शोधून काढावी लागत. मध्यम आकाराच्या टोपली एवढं हे घरटे असतं. प्रत्येक अंड कोंबडीच्या अंड्यापेक्षा निदान तिप्पट मोठ्ठ असतं. आणि त्यांची संख्या ३० ते ३५ असते. आणि साधारण २ मीटर ते ३॥ मीटर लांबीची मादी खंबीरपणानं आपल्या आपल्या घरट्याचं रक्षण करते. आम्ही हौदाची सफाई करायला आंत उतरून त्यांना पाण्यांत पळवायचा प्रयत्न केला तरी त्या घरट्याची जगा सोडायच्या नाहीत.

जंगलातल्या पेक्षा क्रोकोडाईल बँकेतील मगरींची संख्या दुपटीने वाढते आणि इथं त्यांच्या जगण्याचं प्रमाणही जास्ती आहे. या दोन कारणांमुळे इथे मगरींची संख्या बेसुमार वाढली आहे. जंगलात ३०-३५ अंड्यांपैकी फक्त १ किंवा २ अंड्यातील पिलं जगून मोठी होतात. बाकीची भक्षकांना बळी पडतात. इथे त्यांची अंडी कृत्रिम रित्या उबवली जात असल्यामुळे तसंच त्यांना सुरक्षित बंदिस्त जागा असल्यामुळे त्यांची संख्या वेगाने वाढते आहे. त्यामुळे क्रोकोडाईल बँकेत त्यांचं प्रजनन मर्यादेत ठेवलं आहे. तिथ सकाळच्या नाष्ट्याला भरपूर अंडी असायची ती क्षारयुक्त अंडी तव्यावर परतून आम्ही ती सॉसबरोबर खायचो. पण ही अंडी मुख्यत: घोरपडीचे खाद्य म्हणून वापरली जायची.

मी काही वेळेला 'इरूला' जमातीच्या लोकांबरोबर साप पकडायला जायचो. ही आदिवासी जमात साप पकडण्यांत कुशल आहे पूर्वी ते सापांच्या कातडीउद्योगासाठी साप पकडत असत. त्यावर बंदी आल्यावर उपजीविकेवर, पर्यायान पोटावर गदा आली. कारण त्यांना कसायला जमीन नाही, कसायला येत नाही किंवा अन्य कोणताच पेशा त्यांना येत नाही. क्रोकोडाईल बँक सुरु झाल्यामुळे ज्या धंद्यातलं कसब त्यांच्या कडे होतं त्या धंद्यात ते पुन्हा परत आले. मात्र यावेळी साप मारायला नव्हे तर सापांना आणि सर्पदंश झालेल्या लोकांना जीवनदान द्यायला. त्यासाठी आता ते साप पकडून त्याच विष काढतात. एक लोखंडीसळी आणि कापडी थैल्या एवढ साहित्य त्यांना लागतं. त्यासह ते बाहेर पडतात. प्रत्येक झुडूपाचा शोध घेतात, प्रत्येक बिळ उकरून सापांचा शोध घेतात. त्यांच्या त्या काठीचे ३ उपयोग आहेत. १) बिळांत बॅटरीनं प्रकाशाचा झोत पाडायचा २) बीळ खोदायचं ३) आणि साप

हाताळायचा.

काळ्या रंगाच्या बुटक्या आणि कुरळ्या केसांच्या या सापांच्या शिकाऱ्यांबरोबर मी साप पकडायला गेलो तेव्हा नानेटी, धामण आणि काळे विंचू आम्ही पकडले. इरुला जमात सापांऐवजी उंदीरही पकडते. पीक आणि शेत उध्वस्त करणारे हे साप बांधामध्ये त्यांची बिळं खोदतात. त्यांमधून उंदीर पकडल्यावर त्यात उंदरांनी साठवलेले भात हे इरुला जमा करतात ते शिजवतात आणि उंदराच्या मांसाबरोबर खातात. त्यांच्याबरोबर असे भटकणं म्हणजे उन्हा तान्हांत दम लागेपर्यंत भटकणं असे पण मला मात्र ते आवडायचं.

इरुलानी साप कसा हाताळायचा ते मला शिकवले भारतातील ४ सर्वांत विषारी साप- नाग, मण्यार, घोणस, फुरसं आणि चापडा तसंच अजगरांना कसे हाताळायच ते मी शिकलो.

सर्पांच्या खोलीमध्ये (साध्या खोलीसारखीच) मडक्यांमध्ये साप ठेवलेले असत. बाहेर एक साधी पाटी लावलेली होती. धोका! इथं साप सोडले आहेत!' बस्स एवढीच. बाहेरच्या लोकांपुरती ही पाटी होती. पण वस्तुस्थिती अशी होती की साप सोडले जायचे ते फक्त देखरेखी खाली. बाहेरच्या अंगाला पाणी सोडलेली नाली होती. त्यामुळे मुंग्यांना प्रतिबंध होता. तुमचा विश्वास नाही बसणार पण मुंग्या सापांना चावे घेऊन त्यांचा केवळ सांगाडा शिल्लक ठेवतात. या खोली लगत थोडी मोकळी जागा एखाद दोन मीटरची आणि मग १ मीटर उंचीची गुळगुळीत भिंत होती. मी मडक्यांतून साप बाहेर काढायचो. नालीवर त्यांना पाणी प्यायला सोडायचो आणि मडकं स्वच्छ करायचो. या कामामध्ये मी सापांना हाताळण्याचा सराव करायचो. शेपटी एका हातानं पकडून हूक असलेली लांब सळी दुसऱ्या हातात घेऊन त्या काठीच्या मदतीन सापावर नियंत्रण ठेवता येत.

दंश! मी जेव्हा जेव्हा माझ्या क्रोकोडाईल बँकेच्या अनुभवांविषयी सांगतो तेव्हा मला पहिला प्रश्न विचारला जातो तो तुला कधी दंश नाही का झाला? दंश?' कितीतरी वेळा! झाला केवळ अपघातानच! काही वेळेस मात्र मी हेतूतः सर्पदंश करून घेतला. एकदा धामण माझ्या नाकाला चावली होती. रोमला ते दिसू नये म्हणून मी जपत होतो. पण माझ्या शर्टावरील रक्तामुळे त्यांच्या ते लक्षात आलं. धामण चावली तर ते फारसं वेदनादेणारं नसतं. पण गळक्या नळासारख जखमेतून रक्त येत राहातं. रोमनं उत्साहनं मला सांगितलं 'काळजी करू नको आणखी अर्धा तास तरी विषाचा परिणाम दिणार नाही. (धामण बिनविषारी असते)

एका खेपी मी मगरीच्या पिल्लाबरोबरचा माझा फोटो स्वतःच घेत होतो तेव्हा गोल फिरुन ते पिल्लू मला चावलं. फार वाईट होतं ते चावणं. तुमच्या हातावर करवत चालली आहे अशी कल्पना करा. पण मला काही फरक पडला नाही. मगरीनं मला चावा घेतल्याचा मला आनंदच झाला.

नंतर मात्र मी एक वेडेपणा केला. गॅरीनं एक भिंतीवरचा सरडा त्याच्या चापडा - पीट वायपर सापाला खाऊ घालण्यासाठी दिला होता. त्यानं चावा घ्यावा म्हणून मी प्रयत्न केला. ती खुण अजूनही माझ्या हातावर आहे आणि पुण्याला असताना एक 'विरूळा' - चेकर्ड कील बॅक मला चावला होता त्याची आठवण झाली. इतका वाईट चावला होता तो की कित्येक दिवस मी त्या हातावर माझं घड्याळ बांधू शकत नव्हतो. आणि क्रोकोडाईल बँकेतील माझ्या शेवटच्या दिवशी लाल कानाचं कासव मला चावलं मला ते भेट म्हणून मिळालं होतं आणि क्रोकोडाईल बँकेची आठवण म्हणून मी ते घेऊन जात होतो. ते इतकं वाईट चावलं की माझ मांस बाहेर आलं आणि काही दिवस त्या हातानं मी काहीच करू शकलो नव्हतो.

आता मागे वळून पहाताना मला असं वाटतं की काही लोक पदकं गोळा करतात. तसे मी चावे गोळा करत होतो. खरतर हे वागण आज वेडेपणाचं वाटतं आणि तस ते होतं ही कारण काही चावे फार वेदना देणारे होते. पण या सगळ्या चाव्यांमुळे एक चांगली गोष्टी झाली. आता मला अशा चावण्याची अजिबात भीती राहयली नाही. आता सरीसृप हाताळताना मी खूप काळजी घेतो, खबरदारीचे सर्व उपाय करतो, पण आता मला दंश झाला तर मी घाबरुन धीर सोडणार नाही आणि आता त्यावर काय उपाय करायचे ते मला माहित आहे.

माझ्या प्रात्यक्षित कामाच्या अनुभवाव्यतिरिक्त या बँकेच्या परिसरांत मोठ्ठी लायब्ररी होती आणि मगरी, साप, घोरपडी, कासवं यांच्यावर खूप पुस्तक होती. मी ती चाळायचो. मी जेव्हा एखादी नवी गोष्ट शिकायचो किंवा पाहयचो त्यावरची पूरक माहिती शोधायला मला फार उत्साह वाटायचा. सर्वांत चांगली गोष्ट अशी होती की मला परीक्षा द्यायची नव्हती त्यामुळे या गोष्टी लक्षांत ठेवायची गरज नसूनही या सगळ्या गोष्टी माझ्या फारच चांगल्या लक्षांत राहिल्या.

एक मनोरंजक घटना मी तिथं असताना घडली. नॅशनल जिऑग्राफीक मॅगझीनची टीम इथल्या नागावर फिल्म बनवण्यासाठी आली होती. त्यांच्या मदतीला जे

अनेकजण दिले होते त्यापैकी मीही एक होतो मी अनेक प्रकारे त्यांना मदत करीत होतो. फ्लॅश धरणं, शॉट घ्यायला नेपथ्याची मांडणी करणं, बेडूक पकडणं आणि पळून गेलेले बेडूक रिटेकसाठी पुन्हा पकडणं इत्यादी.

एका सुस्त दुपारी तारक म्हणाला ‘तुझे केस कापायला हवेत’ माझे केस त्यावेळी खरचच लांब वाढले होते. खरंतर माझा या सुट्टीची सुरुवात झाल्यापासून माझ्या केसांना मी कात्री लावू दिली नव्हती आता ते माझ्या खांद्यापर्यंत वाढले होते. तारक म्हणाला की केस कापण्याचा त्याच्या एकदीड महिन्याचा अनुभव आहे. त्यामुळे फुकटांत आणि अगदी अधुनिक पद्धतीनं केस कापून द्यायच्या त्याच्या प्रस्तावाला मी होकार दिला.

मी तारकला नीट समजावून सांगितलं की माझे केस मला कसे कापून हवेत ते आणि त्याने लक्षपूर्वक ऐकून एकदोन गोष्टी सुचवल्यासुद्धा. मग कात्री घेऊन त्यानं केस कापायला सुरुवात केली. कापणं आणि तासणंही. (              )थोड्यावेळात त्यानं जाहिर केलं की झाल! आणि माझ्या हातात आरसा दिला. मी आरशातल्या अनोळखी राहुलकडे पाहतच राहिलो. तासलेल्या डोक्यावर अधुनमधुन त्रिकोणी आकाराचे केस आणि पुढच्या बाजूला लांब केसांचा एक झुपका. मी रॉकसिंगर पेक्षांही ‘येडा’ दिसत होतो. तेव्हा कोठे माझ्या लक्षात आल की तारकला केस कापण्याचा श्री ग सुद्धा येत नव्हता, हेअरस्टाईल विषयीही पत्ता नव्हता. माझ्या डोक्यावर प्रयोग करुन त्यानं स्वतःची करमणूक मात्र करुन घेतली होती.

मग मी ठरवलं की आता चक्क गोटा करायचा मग मी सलूनमध्ये जाऊन माझे केस पूर्णपणे कापले. इतकं काही मोकळ वाटलं. यानंतर मी मगरी, साप यांच्याबरोबर माझे इतके फोटो घेतले! क्रोकोडाईल बँकेतील माझ्या आठवणी आणि केस कापल्यानंतरचा मी कसा दिसतो त्या आठवणी माझ्याजवळ कायमस्वरुपी फोटोत बंदिस्त आहेत. जेव्हा क्रोकोडाईल बँक सोडून जायचे दिवस आले तेव्हा मला मनापासून दुःख झाले. मी त्यांना सगळ्यांना वचन दिलं की मी लवकर परत येईन. मी तिथली आठवण म्हणून माझ्या बरोबर लाल कानाचं कासव आणि काही कासवांची अंडी घेतली. ते कासव अजूनही माझ्याकडे आहे.

रात्रभर बसचा प्रवास करून मी बंगलोरला आलो. माझ्या पायाजवळच्या खोक्यांत कासव होतं आणि हवेसाठी मी लहान फट ठेवली होती. एकाएकी मी पाहतो तो काय कासव बाहेर पडून बसच्या दाराकडे चाललं होत. मी त्वरा करून त्याला पकडलं आणि खोक्यांत ठेवलं. झोपेत असलेल्या प्रवाशांना हे काहीच समजलं नाही. फक्त एक आजीबाई हसून म्हणाल्या, ‘‘मुला तुझी पाण्याची बाटली पडली होती वाटतं!’’

## कामांची टाचणं

### क्रोकोडाईल्स

मानवाच्या कितीतरी आधीपासून पृथ्वीवर आलेला पण आता अस्तित्व नष्ट होण्याच्या मार्गावर असलेला, बऱ्याच दंतकथा ज्याविषयी आहेत असा प्राणी कोण? तर मगर, सुसर आणि सरडा (लिझार्ड) हे प्राणी. जगांत मगर सुसरीच्या २१ जाती आहेत. त्यातल्या मगरीच्या ३ जाती भारतांत आढळतात.

१) घरीयल - मासे खाणाऱ्या

२) मगर

३) खाऱ्या पाण्यांतल्या सुसरी (क्रोकोडाईल)

सर्व मगरींमध्ये सर्वांत मोठ्या आणि सर्वांत धोकादायक म्हणजे या खाऱ्या पाण्यांतील मगरी. त्या २५ फुटांपर्यंत लांब असतात. समुद्रांत दीर्घकाळ राहू शकणारा प्राणी म्हणजे मगर. अफ्रिकेतील नाईलनदीतील सुसरी ही आणखी एक भयानक जात. आता अस्तित्व संपुष्टांत आलेल्या आणखी दोन प्रकारच्या सुसरी भारतात सापडतात.

थंड रक्ताचा हा प्राणी डायनॉसॉर बरोबरच लाखोंवर्षांपूर्वी उत्क्रांत झाला. आणि साप किंवा इतर सरपटणाऱ्या प्राण्यांपेक्षा त्याचं पक्ष्यांशी जास्त साम्य आहे थंड रक्ताचा असल्यानं त्या आपल्या शरीराच तापमान पाण्यातल्या वेगवेगळ्या पातळीवरील सावलीच्या सूर्यप्रकाशाच्या जागा निवडून नियंत्रित करतात. त्या बरेच वेळा जबडे उघडे ठेवून आरामांत बसतात. त्यामुळे त्यांना थंड वाटत असावं. त्यांचे डोळे, नाक, कान डोक्याच्या आणि मुस्कटाच्या सरळ रेषेत असतात. त्यांची नजर चांगली असते आणि घ्राणेंद्रिय तीव्र असतात. आणि श्रवणेंद्रीयही चांगले असते. त्यांची शेपूट बळकट असते आणि त्यांना पोहायला तिची मदत होते. त्यांचा चयापचयाचा वेग अगदी मंद असतो. त्यामुळे शिकारीची गरज कमी वेळा पडते. त्यांचा चयापचयाचा वेग कमी ठेवून त्या पाण्याखाली सहा तासांपर्यंत राहू शकतात. अनावश्यक हालचाली त्या करत नाहीत. पण गरज पडली तर जमिनीवर सुद्धा वेगाने जाऊ शकतात. लहान मगरी ताशी ४६ किलोमीटर वेगानं अंतर कापू शकतात.

मगरी लहान मोठ्या नद्यांतून तळ्यांतून खारफुटीच्या जंगलांत, खाऱ्या आणि गोड्या पाण्यात राहतात. मगरीची पिल्लं जन्मतः पाऊण फूट लांब असतं. काही वर्षांतच ते पूर्ण वाढीच होतं. त्यांच्या वाढीवर त्यांच वयांत येण अवलंबून असतं- वयावर नाही. नर माद्यांपेक्षा उशीरा वयात येतात. जंगलामध्ये मादी ५ ते ७ वर्षांत वयांत येते. तर नर ९ ते ११ वर्षांमध्ये, घरीयल उशीरा वयांत येतात. माद्या ८ ते १० वर्षांमध्ये तर नर १२ वर्षांनी बंदिवासात उदा. क्रोकोडाईल बँकेत माद्या ४ वर्षांनी तर नर ५ वर्षांनी वयात येतो. वयांत आलेल्या घरियल नराची सरासरी लांबी २ मीटर तर मादीची १.६ मीटर असते. आणि खाऱ्या पाण्यातल्या मगरी ३॥ मीटर लांबीच्या झाल्या, की वयात येतात तर माद्या ३ मीटर लांबीच्या असताना. फेब्रुवारी ते एप्रिल या काळांत मगर क्रोकोडाईल ची पिल्लं अंड्यांतून बाहेर येतात. खाऱ्या पाण्यांतल्या मगरींची एप्रिलमध्ये, आणि घरीयलची मार्चच्या शेवटच्या आठवड्यांपासून ते एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यांत अंड्यातून बाहेर येतात. त्यांचं प्रजनन हे पर्यावरणीय परिस्थितीवर अवलंबून असतं. प्रजनन काळात नर अनेक माद्याचं प्रणयाराधन करण्यासाठी इतर नरांशी लढतो. प्रणयाराधनांत ते पाण्यांत बुडबुडे सोडतात. नाक घासतात, त्यांची तोंडं वर उचलतात आणि ते पाण्यांत डुबक्या घेतात, पुन्हा पाण्यावर येतात असे बेरचदा करतात. वेगवेगळ्या जातीचे प्रणयाराधनाचे वेगवेगळे मार्ग असतात. घरीयल एकमेकांमध्ये मोठ्या आवाजांत भुणभुण करतात. नर मादीवर बसून पाण्याखाली त्यांच मिलन होत.

अंडी उबण्याचा काळ ३५ ते ६० दिवस असतो. मगरीच्या बाबतीत तो ३५ ते ४० दिवस तर घरीयल आणि खाऱ्या पाण्यातील मगरींचा ४० ते ६५ दिवस असतो. अंडी उबताना असणारे तपमान आणि वातावरणांतील दमटपणा यांचा परिणाम लिंग ठरण्यावर होतो. अंडी उबवण्यासाठी मादी ३० सें.मी खोल भुयार खोदते. किंवा पानांचा ढीग करते. मग अशा घरट्यात अंडी घालते. तपमान सौम्य करण्यासाठी त्या घरट्यावर पाणी उडवतात. मगर क्रोकोडाईल मध्ये २८ से. ते ३१ से. तापमानांत माद्या जन्माला येतात. तर ३२.५ से. तपमानाला फक्त नरांचा जन्म होतो. ३१ से. ते ३३ से. तपमानांत नर मादी दोन्ही जन्माला येतात. मात्र त्याच प्रमाण विभिन्न असतं.

मादी घरट्याची राखण करते. अंडी उबण्याच्यावेळी पिल्लं आतून आवाज करतात. तो ऐकून मादी आणि प्रसंगी नर सुद्धा घरटं खणतात. मग मादी आपल्या दातांनी अंडे फोडते. पिल्लू बाहेर येते आणि तोंडात धरून ती त्याला पाण्यात सोडते. पिल्लं ५ - ७ महिन्यांची होईस्तोवर मोठ्या मगरी त्यांचं रक्षण करतात. निसर्गाच्या परिसंस्थेत मगर खूप उपयुक्त आहे. त्या मृत प्राणी खाऊन पर्यावरण शुद्ध ठेवतात. नाहीतर कुजलेल्या प्राण्यांमुळे वातावरण प्रदुषित झाले असते. त्या रोगट, अशक्त, जखमी भक्ष्य पकडून खातात त्यामुळे निरोगी बळकट प्राणी जीवंत राहून प्राण्यांची जनुकीय गुणवत्ता, संख्या अबाधित राहते.

कोरड्या हवामानात मगरींनी पाण्यांत खोदलेले खड्डे आणि भुयार यामुळे कासवं मासे, यांना पाणी मिळते. मगरींची अंडी खाऊन उपजीविका करणारे प्राणीही आहेत. उदा. शराटी (सॅक्रेड आयबीस) आणि घोरपड, नाईल क्रोकोडाईलची अंडी खातात. म्हणजे अन्न साखळीतील त्या एक महत्त्वाचा दुवा आहेत. त्यांची रोग प्रतिबंधक ताकद विलक्षण असते. वैद्यकिय संशोधनात त्याचा उपयोग होऊ शकतो.

## प्रकरण ११

# शिकवायसाठी शिकताना

जानेवारी माझ्यासाठी ताजा अनुभव घेऊन आला आणि याचं पूर्ण श्रेय जातं ते हार्टमन डिसूझा यांना. मी गोव्याला परतणार होतो ते बेंगलारेवरुन. कारण आमचे मित्र हार्टमन आणि उज्ज्वला बेंगलोरला असतात. माझ्या सुट्टीच्या अवधीत काही काळ बेंगलोरला त्यांच्याकडे राहण्यासाठी माझी सोय करण्याची त्यांनी तयारी दाखवली माझ्या आईवडिलांनाही वाटलं की मी घरी परतण्यापूर्वी बेंगलोरला काही दिवस राहावं. मी त्यांच्या घरी राहणार होतो; बेंगलोरची प्रेक्षणिय स्थळ पाहिजे तर पाहू शकणार होतो आणि मी घरी परतायचेवेळी माझ्या आई वडिलांना तसं कळवायचं असा साधा सरळ विचार होता.

७ जानेवारीला दु. १.४० ला बेंगलोरला पोचलो. बिंग काका(हार्टमनला सगळी याच नावानं हाका मारत) बस अड्ड्यावर त्याची कार घेऊन मला न्यायला आले होते. आम्ही त्याच्या घरी जात असताना त्यांच्या सगळ्या प्रश्नांना मी उत्तर देत बोलत आम्ही घरी पोहचलो. घरी उज्ज्वला काकू आणि त्यांची मुलं होती. झुरी आणि तिचा धाकटा भाऊ झईर. त्यावेळी त्यांच्याबरोबर सौ. कलोई राहात होत्या. इंडिया फाऊंडेशन फॉर दी आर्ट्समध्ये त्या बिंगच्या सहकारी होत्या.

जेवणकरून आम्ही आराम करत होतो. तेव्हा बिंगकाका मला म्हणाले की माझ्या आवडीच्या विषयाशी संबधीत काही लोक आणि संस्था त्यांना माहित आहेत. म्हणजे वन्यप्राणीविषयक. आणि बेंगलोर मध्ये मी आहे त्या अवधीत त्यांना भेटावं या त्यांच्या मताशी सहमत झालो. त्यावेळी मला कुठे माहित होत की त्यांनी सुचवलेल्या लोकांना मी भेटणार मग ती लोक पुन्हा त्यांना माहित असलेल्या लोकांना मी भेटावं असं सुचविणार आणि हे बिंग काकांना सांगितल्यावर ते आग्रह धरणार की मी त्या लोकांनाही भेटावं म्हणून! थोडक्यांत काय मी बराच काळ लोकांना भेटण्यांत किंवा बेंगलोरमधल्या वन्यप्राण्यांशी संबधी विविध लोकांना पत्रे लिहीण्यांत घालविला.

बिंग कामं करवुन घेण्यांत वाकूबगार होते. ते मला सहजासहजी तसेच जाऊ



देणार नव्हते. त्या त्या वेळी ती लोकं घरी नसतील तर मला त्यांना पत्रं लिहायला लागत. परिणामी पुष्कळ जणांना मी पत्र लिहिली. जर यदा कदाचित वन्यप्राण्यांविषयीचं करीअर करायचं मी नक्की केलं तर कोणकोणते पर्याय उपलब्ध आहेत ते मला कळावेत. एवढचं नाहीतर, बिंग काकांनी मला हेही सुचवलं की मी या लोकांकडून समजावून घेण्याचा प्रयत्न करावा की त्यांना या पर्यावरण आणि वन्यप्राणी जीवनाचा अभ्यास का करावासा वाटला आणि त्यांनी हीच का

निवडली आणि त्यांच्या निवडीबद्दल ते समाधानी आहेत का ?

'बिंग' काकानी माझ्यासाठी परिचय पत्राच्या बऱ्याच कॉपीज काढल्या. मी भेटणार असलेल्या लोकांना द्यायला! बिंगची पत्राखाली सही होती आणि त्यांत त्यांनी म्हटलं होत की मी वन्यजीवांचा अभ्यास करण्यासाठी १ वर्षाची सुट्टी घेतली आहे. गेले आठ महिने मी विविध गोष्टींची माहिती करुन घेतली आहे आणि या संदर्भात अमूक एकाची मला मुलाखत घ्यायची आहे.' या मुलाखतीसाठी मी एक प्रश्नावलीही तयार केली होती. बिंगकाका त्या त्या व्यक्तीला आधी फोन करून माझी भेटायची वेळ नक्की करायचे. काही वेळेस ते स्वतः मला तिथे सोडायचे इतर वेळी मी रिक्षानं तिथं जायचो.

पहिल्यांदा मी भेटलो ते श्री टी. परमेश्वराप्पा यांना. ते निवृत्त मुख्य वनसंरक्षक होते. मी त्यांच्याघरी ११.४५ लाच पोचलो. माझी भेटीची वेळ १२॥ होती. परमेश्वराप्पा बाहेर गेले होते आणि ते १॥ वाजता परतले. मी त्यांच्या ऑफिसमध्ये बसून पुस्तकं चाळत बसलो होतो. ते परत आल्यानंतर आमची मुलाखत सुरु झाली. पहिल्यांदा माझ्या सुट्टी विषयी बोलणे झाले नंतर मी भविष्यात काय करणार याविषयी.

त्यांनी मला सांगितलं की पदवीनंतर यु. पी. एस्सी. च्या स्पर्धा परीक्षेस बसावे. त्यामधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण होते मग त्यांची वनामध्ये नेमणुक होते. धारवाड किंवा हेब्बलच्या युनिर्व्हसिटी ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्सचा ४ वर्षांचा फॉरेस्ट्रीचा - वानिकीशास्त्राचा कोर्स, प्रीयुनिर्व्हसिटीचा - पदवीपूर्व अभ्यास करुन पूर्ण करता येईल. वाईल्डलाईफ रिसर्च इन्स्टिट्यूटमध्येही लहानलहान अभ्यासक्रम असतील मात्र पदवी परीक्षेनुसार दीर्घ मुदतीचे कोर्सेस नक्कीच आहेत, असं ते म्हणाले.

मी त्यांना काही प्रश्न विचारले ते सांगतो.

राहुल : बनारगट्टा वन्यप्राणी अभयारण्यात खाजगी गायडेड टूर रेंजर देतो का?

परमेश्वराप्पा : नाही. पाहुण्यांना नेहमीच्या सफारी टूर असतात. पण हवं असेल तर

श्री. व्यंकटेश उपवनसंरक्षक यांना तू भेटू शकशील. मी त्यांना तुझ्या विषयी बोलीन.

राहुल : अभयारण्याची स्थिती कशी आहे?

परमेश्वरप्पा : ते सरकारी आहे. त्यामुळे अशा उपक्रमांना चांगली वाईट अशा दोन्ही बाजू असतात.

राहुल : वन्यप्राणी जीवनाबद्दल काही वेगळे अभ्यासक्रम आहेत का?

परमेश्वरप्पा : भारतात अभयारण्य किंवा प्राणीसंग्रहालयांचे व्यवस्थापन खाजगी संस्था वा व्यक्तींकडे नसतं. त्यामुळे या विषयावरचे अभ्यासक्रम वगैरे सर्व सरकारी पातळीवरच असतं. त्यामुळे वेगळ्या प्रकारचे अभ्यासक्रम इथं अशक्यच असतात.

राहुल : बनार गट्टा पार्कच्या स्टाफची कामं काय असतात?

परमेश्वरप्पा : त्याचं एकच मुख्य काम. ते म्हणजे वन्यप्राण्यांच हित जपणं, त्यांना खाऊ घालणं, भवताल स्वच्छ ठेवणं. ते पक्ष्यांचा अभ्यास किंवा संशोधन करीत नाहीत.

राहुल : तुम्हाला हे प्रधान मुख्य वनसंरक्षकाचे पद कसं मिळालं? तुमची पार्श्वभूमी काय आहे?

परमेश्वरप्पा : तुझ्यासारखाच मला अभ्यास करायला लागला. परीक्षेला बसलो. मग मला ही वनाधिकाऱ्याची नोकरी मिळाली. नंतर मी २ वर्षे अमेरिकेला गेलो. परतल्यावर मला मुख्य वनसंरक्षकाच पद देण्यातं आलं.

राहुल : सर्पविष काढण्यासाठी सर्पोद्यान सुरु करणं शक्य आहे का?

परमेश्वरप्पा : कां नाही? जरुर करतां येईल पण तुम्हाला साप बंदिवासांत ठेवण्यासाठी परवानगी काढावी लागेल. पुण्याच्या सर्पोद्यान प्रमुखांना ते माहित असेल. तू त्यांना विचारलस तर ते सगळी माहिती देतील.

श्री. परमेश्वराप्पा मदतीला तत्पर आणि चांगले वाटले. निघण्यापूर्वी मी इंदिरा गांधी रिसर्च इन्स्टिट्यूट आणि इंडियन वाईल्डलाईफ इन्स्टिट्यूट, डेहराडूनला पाठवलेल्या पत्रांची प्रत त्यांना दाखवली.

माझी दुसरी भेट श्री. अरुण कोटनकर यांच्याशी ठरली होती. बेंगलोर इथ 'संवाद' नांवाची संस्था चालविणाऱ्या लोकांपैकी ते एक प्रमुख.

या संस्थेचा स्माईल (स्टुंडट्स मोबिलायझेशन इनिशिएटिव्ह फॉर लर्निंग) असा उपक्रम आहे. मी त्यांच्या कार्यालयांत स. १०.३० ला पोचलो. माझी भेटीची वेळ १२ होती. मी त्यांना माझ्याविषयीचं संदर्भ पत्र दाखविलं. थोड्या वेळांतच ते



माझ्याशी बोलायला आले.

बेंगलोर इथं चालू केलेल्या 'स्माईल' कार्यक्रमाची माहिती कोटणकर यांनी दिली. दर शनिवारी दुपारी संवादचा एक अनौपचारिक खुला कार्यक्रम असतो ते फिल्म बघतात, चर्चा करतात किंवा विद्यार्थ्यांना हव्या असलेल्या एखाद्या विशिष्ट विषयावर बोलतात. पर्यटन, हुंडा, मुलांशी वाईट वर्तणुक, पर्यावरणाचा ऱ्हास, मच्छिमारांचा संघर्ष अशा सारख्या विषयांवर ते चर्चा करतात.

'शोधण' (शोध घेणे) नांवाच एक बातमीपत्र या संस्थेशी निगडीत असलेले विद्यार्थी चालवतात. निरनिराळ्या विषयांच्या संपर्कात आलेले विद्यार्थी त्यांच्या अनुभवांविषयी लिहीतात. किंवा एखाद्या सामाजिक प्रश्नाविषयी विद्यार्थी त्यात लेख, कविता, कार्टून्स किंवा गोष्टी इंग्रजी किंवा कन्नडमध्ये लिहीतात. कोटणकरांनी त्यांच्या संस्थेविषयी जे काही सांगितले त्यांच मला कुतुहल वाटलं.

नंतर मी थेट गेलो ते सेंट जोसेफ कॉलेजमध्ये. बिंग काकांच्या माहितीनुसार तिथे कॉलेज विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणविषयक विविध अभ्यासक्रम चालवले जातात. मी कॉलेजच्या ऑफिसात जाऊन तिथल्या क्लार्कला भेटलो मला हवी होती ती माहिती त्यानं दिली आणि एक माहिती पत्रकही दिलं त्यांत पदव्युत्तर बऱ्याच अभ्यासक्रमांची माहिती होती.

२ दिवसांनंतर मी डॉ. हरीश गांवकर यांच्या घरी गेलो. ते आणि त्यांची जर्मन बायको दोघेही अगदी मित्रत्वाने वागले. श्री. गांवकर हे फुलपाखरांचे तज्ज्ञ आहेत त्यांच्याशी मी बराच वेळ बोलत होतो.

फुलपाखरं ही कीटक वर्गांत असली तरी ती जास्त वनस्पतीशी निगडीत आहेत. त्या भागांतील फुलपाखरांच्या प्रजातींच्या संख्येवरून वनस्पतींच्या त्या भागांत मिळणाऱ्या प्रजातीच्या संख्येचाही अंदाज मिळतो. त्याचं कारण फुलपाखरांची विशिष्ट प्रजात. ही विशिष्ट प्रकारच्या वनस्पतींवरच जगते. समजा गोव्यांत २५० प्रकारची फुलपाखरे आहेत, याचा अर्थ ९०० ते १०० त्या जातीच्या वनस्पती गोव्यांत आहेत, ही माहिती एखाद्या एकट्या वनस्पतीशास्त्रज्ञाला मिळवणं अवघड आहे. त्यामुळे ही फुलपाखर वनस्पतीशास्त्रज्ञांना या भागांतील वनस्पती वैविध्याची माहिती देण्याचं एक साधन आहे.

मादी फुलपाखरु पानांवर अंडी घालते. भक्षकांच्या ते लक्षात येणार नाही अशी काळजी ती घेते. २-३ दिवसांत ती फुटून त्यांतून अळी बाहेर येते. ती ४-५ वेळेला

कात टाकते मग ती कोष बनवते. कोषावस्थेत ती काही खात नाही. काही दिवसांत कोषांतून फुलपाखरु बाहेर येते. काही मिनिटं पंख वाळेपर्यंत ते स्थिर राहाते मग उडून जातं. अंड्यापासून पूर्ण वाढ झालेल्या फुलपांखरा पर्यंत लागणारा वेळ ५ आठवड्यांपासून २ महिने एवढा असतो. फुलपाखरु २ आठवडे जगते. पहिल्या काही दिवसांत ते अंडी घालतं.

पतंग रेशमी धागे विणतात. फुलपाखरु रेशमी धागे विणत नाही. जगामध्ये पतंगाच्या १०,००० जाती आहेत. फुलपांखरांपेक्षा कितीतरी जास्ती पतंगाच्या जाती आहेत. काही फुलपाखरं आणि पतंग विषारी असतात उदा. 'क्रीम्सन रोज'. त्यांच्या पंखांवर लाल ठिपके असतात. लहान आकाराची फुलपाखरं काही सें.मी. आकाराची असतात आणि सर्वांत मोठ्ठं फुलपाखरू आपल्या दोन हातांच्या पसरलेल्या तळव्यांत मावेल एवढं मोठ्ठ असतं.

भेटीच्या शेवटी डॉ. गावकरांनी मला फुलपाखरांवरची काही पुस्तकं आणि त्यांनी या विषयावर लिहिलेले काही पेपर दाखवले. २ तासांनी मी त्यांचा निरोप घेतला. एमईएस कॉलेजमध्ये डॉ. लीला यांच्याशी माझी त्याच दुपारी भेट ठरली होती. तिथे मी डॉल्फिन माशाची शेपटी आणि हॅमर हेडेड शार्कचे काही नमुने पाहिले.

बेंगलोरचा माझा मुक्काम वैशिष्ट्यपूर्ण झाला तो बिंगकाकांनी माझ्यासाठी आखलेल्या टाइम्स ऑफ इंडियाच्या कार्यक्रमामुळे. टाईम्स ऑफ इंडिया पेपरनं बेंगलोरमध्ये न्यूजपेपर इन इज्युकेशन असा एक वेगळा विभाग सुरु केला होता. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणजे निरनिराळ्या विषयांवर शाळांमधून कार्यशाळा घ्यायच्या. २० जानेवारीला एम जी. रोडवर टाईम्स ऑफ इंडियाच्या ऑफिसमध्ये मी गेलो आणि या विभाग प्रमुखाशी गेले वर्षभर मी काय काय केले त्याविषयी बोललो. त्यांनी मला विचारलं की येत्या काही दिवसांत शाळांमधून मी काही कार्यक्रम घेऊ शकेन का? खरतर हे काम आपण चांगलं करू शकू याचा मला अंदाज नव्हता. पण मी माझ्या सुट्टीत एक गोष्ट शिकलो होतो की कोणत्याही नव्या गोष्टीत प्रयत्न करून बघायला काय हरकत आहे? कारण आधी वाटत तेवढ्या काही त्या गोष्टी अवघड नसतात म्हणून मी त्यांना हो म्हणालो.

२२ जानेवारीला माझी पहिली कार्यशाळा होती. संयोजकांपैकी एकजण मला श्रीवाणी एज्युकेशन सेंटर इथं घेऊन गेले. मला ८ वीच्या विद्यार्थ्यांशी बोलायचं होतं. मला ३५ मिनिटं बोलायचं होतं आणि १० मिनिटं प्रश्नोत्तर आणि चर्चेसाठी होती.

सुरुवातीला मला जरा भीती वाटली पण मी बोलायला सुरुवात केली आणि मुल लक्षपूर्वक ऐकताहेत असं लक्षात आल्यावर मी जास्त मोकळेपणानं बोलू लागलो. हा कार्यक्रम संपल्यानंतर मला हार्टमनकाकांच्या ऑफिसमध्ये किंवा घरी म्हणजे जे जवळ असेल तिथे सोडायचे. सुरुवातीच्या काही शाळेमधून माझं बोलण, सांगणं व्यवस्थित झाल्यावर मी या गोष्टीत रुळलो आणि मला या गोष्टी. रंजक वाटू लागल्या. प्रत्येक शाळेमधील माझ्या तासाचे मला १०० रुपये आणि येण्याजाण्याचा खर्च मिळणार होता हे कळल्यावर तर मी आणखीनच खूष झालो.

माझ्या भाषणाच्या सुरुवातीला मी विद्यार्थ्यांना माझ्या १ वर्षभर घेतलेल्या सुट्टीविषयी सांगे. ही कल्पना कशी सुचली, मी भेटी दिलेली ठिकाणं आणि मी तिथं काय काय केलं याविषयी बोले. नंतर मी गांडूळखत आणि साप यांच्याविषयी बोले. कारण या गोष्टी विद्यार्थ्यांना जास्त उपयोगी होत्या. ते त्या गोष्टी घरीही करू शकणार होते. गांडूळांच्या मदतीनं कचऱ्याच खत आणि सापाविषयी लोकांच्या मनांत निष्कारण असलेल्या भीतीचं निवारण या गोष्टींविषयी मी बोलायचो. मी गांडूळखताविषयी गाईचे शेण मातीमध्ये मिसळणे महत्त्वाचे' याविषयी सांगायचो, तेव्हां मुलांना त्याची किळस वाटायची किंवा ती चेष्टा करायची किंवा हसायची शहरी मुलांना खरोखरच गाईच्या शेणाविषयी नीट माहितीच नाही. तरीही मी त्यांना स्पष्ट करून सांगायचो की गांडूळखताचा खड्डा त्यांना घरी कसा करता येईल.

सापांविषयी बोलताना मी आधी त्यांना विषारी - बिनविषारी सापांची माहिती द्यायचो. ते कसे ओळखायचे ते सांगायचो मग एखाद्याला साप चावला तर काय करायचं याविषयी सांगायचो सापांविषयीच्या समज गैरसमज आणि दंतकथा याविषयी मी माहिती द्यायचो. वेळ राहिला तर मी मगरी, कासव आणि कोळी याविषयी सांगायचो. शेवटी मी त्यांना मगरीचा दात, सापांबरोबर चे माझे फोटो मगरी, घोरपडी वगैरेंचे फोटो दाखवायचो. मग मी त्यांना माझं लाल कानाचं कासव दाखवायचो. मी ते नेहमी माझ्या बॅगेतून न्यायचो. ते पाहून मुलं जाम खूष व्हायची. त्याला पाह्यला गर्दी करायची. आणि त्याच्या खाण्यापिण्याच्या सवयी विषयी प्रश्न विचारायची. मी फुलांना कासवाच्या वरच्या कातडीला स्पर्श करू द्यायचो. पण त्याहून जास्त नाही. कारण कासवं वाईट चावतात.

अशा पद्धतीनं मी बरीच वर्क शॉप्स नॅशनल इंग्लिश स्कूल, सिंधी स्कूल, सेंटमेरी

स्कूल, बोलिव्हियन गर्ल्स, बंगलोर इंटरनॅशनल स्कूल या शाळांमधून घेतली. मी मुख्यतः ७ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांशी बोलायचो. पण बंगलोर इंटरनॅशनल स्कूलमध्ये इ.३री आणि ४ थी च्या मुलांची मी कार्यशाळा घेतली. मी गोव्यात पोचल्यावर काही महिन्यांतच एन आय ई बंगलोरच्या रजिस्टर्ड पोस्टानं माझ्या भाषणांचा रु. १०७५ चा चेक हातात आल्यावर मला फारच आनंद झाला. नंतर जेव्हा मी माझ्या १ वर्षाच्या सुट्टीतील उपक्रमांविषयी हिंदुस्तान टाईम्समध्ये लेख लिहिला तेव्हा त्याची प्रत मी 'एन आय इ' कडे धाडली आणि त्यांच्या न्यूजलेटर मध्ये त्यांनी तो छापला. बेंगलोरला जेव्हा मी गेलो तेव्हा एन. आय. इ. चं मला भाषण देण्याचं आमंत्रण आले.

**बेंगलोर**

बेंगलोर शहर इतर अनेक गोष्टींत मला खूप चांगल वाटतं. कालिया बरोबर मी तलावावर पोहायला गेलो असताना जेव्हा मी गार पाण्यांत उडी घेतली तेव्हा मला थंड पाण्याचा जबरदस्त झटका बसला होता. हिवाळ्यांतल्या थंडीत बेंगलोर मध्ये पुन्हा पोहायचे नाही असा मी निश्चय केला. दिवसा मी बाहेर खात असे आणि खाद्यपदार्थांच्या लहान लहान टपऱ्यांवर दाक्षिणात्य पदार्थ, व्हेजिटेबल कटलेट्स, मिल्कशेक्स वगैरे खायचो प्यायचो अर्थात माझ्याजवळ असलेल्या पैशांचा अंदाज घेऊनच. माझ्या अंदाजपत्रकांत ऐषआरामी खाणे बसले नसते.

काही वेळेला मी पुस्तकांच्या दुकानी गेलो. काही वेळेस बिंगकाका आणि उज्वला यांच्या साठी निरोप पोचवले, बिंगकाकांना निदान दोन वेळातरी मी स्वयंपाकांत मदत केली. आणि उज्वला काकूंना त्यांच्या बागेत! ते दोघे आणि त्यांची मुलं यासोबत आम्ही बाहेरही फिरायचो. एकदा आम्ही सर्वजण सांकी टँक या तलावावर गेलो होतो तेव्हा पाण्यांत मोटर बोट राईड घेतली आणि लहान मुलांच्या खेळघरांत झुरी आणि झईरबरोबर खेळलो. दुसऱ्या एका वेळी एका नृत्याच्या कार्यक्रमाला आम्ही गेलो. तो काही मला फारसा समजला नाही. काहीवेळेस आम्ही नुसतेच गाडीतून फिरायचो. (ते मला फार आवडायच) आणि नंतर आईसक्रीम कोन खायचो.

मी भाज्या खायला कसा शिकलो ते मला तुम्हाला सांगितलं पाहिजे. मला आठवतय ते सामान्यतः मला भाज्या कधी आवडल्या नाहीत. माझी आई सांगते की मी लहान असताना ती मला भाज्या खाऊ घालायची आणि आमच्या जेवणांत



टेबलावर कायम एक दोन भाज्या असायच्या पण मी मात्र कधी त्यांना हात लावायचो नाही. माशाचा रस्सा आणि भात फक्त खायचो. गोव्यात तेच तर मुख्य अन्न आहे.

मी प्रवासाला निघताना आईवडिलांनी मला सांगितलं होत की बऱ्याच ठिकाणी फक्त शाकाहारी भोजन मिळेल. अन खरंच तसं झालं. या वर्षांत मी वेगवेगळ्या लोकांच्या घरी तऱ्हेतऱ्हेचे खाद्य पदार्थ खायला शिकलो. पण मी भाज्यांपाशी अडखळायचो. कोबी, बटाटा, दाल राईस लोणचं मी चालवून घ्यायचो. पण वांग किंवा भेंडी मी अजूनही खात नव्हतो. बिंगकाकांना त्यांच्याबरोबर गप्पा मारताना हे समजलं आणि ते म्हणाले की जेवणामध्ये कोणी हे नको ते नको केलेलं मला अजिबात पसंत नाही. त्यामुळे जेवताना रोज ते माझ्या ताटात केवढ्यातरी भाज्या घालत. मला नावडणाऱ्या तर जास्तच घालत म्हणणे टोमॅटो, वांग आणि भेंडी या.

मी घाईघाईनं पहिल्यांदा भाज्या खायचो म्हणजे मग जेवणांतले आवडते पदार्थ मांस, मासे भाज्यांशिवाय आवडीनं खाता यावेत. पण मी भाज्या संपवायचा अवकाश की ते मला म्हणायचे 'व्वा, तुला आवडलेली दिसतेय भाजी' असं म्हणून मी किती नको नको म्हटलं तरी ते माझ्या ताटांत पुन्हा भाज्या वाढायचे जेवण संपेपर्यंत मी प्रथम घेतल्यापेक्षा तिपटीनं जास्त मला भाज्या खायला लागत होत्या.

मला बेंगलोरला ३ आठवडे राहावं लागलं. ३० जानेवारीला मी घरी परतलो मी माझ्या आईवडिलांना आणि भावांना ३ महिने भेटलो नव्हतो आणि माझे अनुभव त्यांना सांगायला मी उत्सुक होतो. दुर्दैवानं मी घरी गेलो तेव्हा त्यांच्याबरोबर बोलायला मला जेमतेम १ तास मिळाला. कारण जागतिक पुस्तक जत्रेमध्ये भाग घ्यायला आदर इंडिया बुक स्टोअर च्या काही कर्मचाऱ्यांसह ते १० दिवसांच्या दिल्ली टूरवर निघाले होते. त्यामुळे माझ्या हकीगतींनी त्यांचं मनोरंजन करायला मला ते येईपर्यंत थांबायला लागणार होतं.

## प्रकरण १२

# तुम्हाला दृष्टी आहे माझ्याकडे 'नजर' आहे

पूर्ण फेब्रुवारी महिना मी घरीच होतो. कारण आईवडिल जवळजवळ पहिले १५ दिवस नव्हते. आणि घरी मदत करायला सांगून गेले होते. शिवाय मलाही माझ्या सुट्टीतील उर्वरीत महिन्यांमधल्या कार्यक्रमाची आखणी करायची होती. आणि ज्या लोकांना आम्ही पत्र पाठवली होती त्यांच्या उत्तरांनाही काही अवधी लागणार होता.

सुट्टीत करायचं म्हणून ठरवलेल्या पुष्कळ गोष्टी मी पार पाडल्या होत्या. पण काही विषय उदा. मधमाशा यांबद्दल नक्की कार्यक्रम ठरवता आला नव्हता. मग मी गेल्या काही महिन्यांचे लिहायचे राहिलेले विशेष विषयांवरील निबंध लिहीण्यांमध्ये मला गुंतवून घेतलं. अर्थात माझी दैनंदिनी नियमित लिहीलेली होती आणि नोंदी व्यवस्थित होत्या.

मी घराच्या मागील अंगणांत गांडूळ खतखड्डाही केला होता. कचऱ्याची विल्हेवाट कशी लावायची ही आता प्रत्येक घराची समस्या आहे. त्यामुळे माझ्या वडिलांना वाटायचं की मी आता ते शिकून आलो आहे तर त्यांनी त्या गोष्टी चुकतमाकत का होईना मी राबवाव्या आणि त्या खत खड्डा बनविण्याच्या तंत्रांत मी तरबेज झालो की गरजेप्रमाणे त्यांत बदल करून आपल्या मित्रमंडळीकडेही कचऱ्यापासून खत निर्मितीची योजना सुरू करून द्यावी. आणि ज्या कुणाला कचराव्यवस्थापन घरी घरायचं आहे त्या सर्वांकडेही मी गांडूळखत खड्डा बनवून द्यावा. डॅडनी सुचवलं की आमच्या अंगणासारखी पुरेशी विस्तृत जागा असणाऱ्या कोणाही कुटुंबाला योग्य असा मोठ्ठा खड्डा गांडूळखतासाठी करावा. आणि गांडूळखताचे लहान लहान वाफे 'व्हर्मीबेड' तयार करावेत. फ्लॅट मध्ये राहणाऱ्या लोकांकडे जास्त जागा नसते तर त्यांच्यासाठी लहान जागेत होऊ शकतील असे खताचे गांडुळवाफे-व्हर्मीबेड मी तयार करावेत. वेळोवेळी त्यामध्ये कचरा घालत राहवे आणि हे करताना किती आकाराचा खड्डा बनवणं ठीक राहील याचा अनुभव मला येईल. आणि लोकांनी विचारल्यावर मी त्यांना मार्गदर्शन करु शकेन.



सुरुवात मला गांडुळवाफ्यापासून करायची होती. त्यासाठी हौदापासून सुरुवात करायची आणि विटांनी हा खतखड्डा - हौद बांधायचा असं मी ठरवलं. आमच्याकडे एक कामगार त्यावेळी काही लहान मोठ्ठी काम करत होता. तो म्हणला की या विटा एकत्र कशा करायच्या ते मला माहिती आहे. मग तो आणि मी मिळून २ २ ४ उंचीचा विटांचा हौद बनवला. आम्ही सीमेंट वाळू पाणी असं अंदाजे मिश्रण केलं. विटा एकावर एक ठेवून त्यावर हे मिश्रण लिंपलं. एका दिवसांत आम्ही हा हौद रचून लिंपण केलं. जेव्हा मी याचं टिपण लिहून काढलं की विटा, सीमेंट आणि वाळू हा वाफा बनवायला किती लागलं तेव्हा ते लिहिताना हे काम सोप्प आहे असे मला वाटले.

दुसऱ्या दिवशी मी कामसूपणानं त्या वाफ्यांवर दोन वेळा पाणी शिंपडलं म्हणजे सीमेंट सेट होण्यासाठी. पण ३ ऱ्या दिवशी मला जेव्हा आढळलं की तो सगळा हौद हालतो आहे आणि केव्हांही ढासळणार आहे तेव्हा मला असा काही जोरदार धक्का बसला की बस्स. मी लगेचच शेजारी असलेल्या गुरुला बोलावून घेतलं आणि हौदाकडे एक दृष्टिक्षेप टाकून तो म्हणाला हे सगळे उतरवून पुन्हा पहिल्यापासून काम करायला हवं. आम्ही विटा नीट रचल्या नसाव्यात आणि सीमेंट वाळूचं प्रमाणही आमचं चुकलं होत हे नक्कीचं. आम्ही पाया ही घेतला नव्हता. या हौदासाठी गवंडीकाम काही सोप्प नाही हे माझ्या चांगलच लक्षांत आलं. मी लगेच कामाला लागलो. काळजीपूर्वक एकेक वीट उतरवली. त्या पुन्हा वापरतां येणार होत्या. गुरु कसबी गवंडी होता तो हौद बांधायला आला. आम्ही मग त्यादिवशी २ हौद बांधले. एक मोठ्ठ आणि एक मध्यम मग मी गांडूळखड्डे तयार केले आणि येसूला, आमच्या मोलकरणीला सूचना दिली. की यापुढे घरांतल सगळा ओलाकचरा (कागद आणि प्लॅस्टिक सोडून) यांमध्ये टाकायचा. (दोन खड्ड्यांत आलटून पालटून.)

एका लाकडी खोक्यांत आम्ही गांडूळ कल्चर-विरजण- करायला सुरुवात केली. ते खोकं मग बी पेरायला उपयोगांत आणलं. आणि फणसाच्या बियांची रोप त्यांत उगवून आली. दुसरे दोन विटांचे खत खड्डेही काम करत होते. आमचा सगळा घरगुती ओला कचरा आता गांडूळं खातात. फेब्रुवारी संपतासंपता मी पुन्हा बाहेर पडायला उत्सुक होतो. मधुमक्षिकापालनाच्या शिक्षणासाठी वडिलांनी काही लोकांशी संपर्क साधला होता पण मी स्वतः खूप उत्सूक नव्हतो त्या बाबतीत. मगरी, साप आणि जंगली प्राणी यांनी मला गुंतवून ठेवलं होतं. आणि क्रोकोडाईल बँकेत पुन्हा जायला

मी उत्सुक होतो.

दुसरा एक या सगळ्यापेक्षा निराळा आणि याच्याशी संबधीत नसलेला एक कार्यक्रम मला पूर्ण करायचा होता. डोळ्यांची काळजी कशी घ्यायची, डोळ्यांचे व्यायाम कसे करायचे आणि दृष्टि कशी सुधारायची याचे शिक्षण देणारा अभ्यासक्रम पाँडेचरीच्या अरबिंदो आश्रमाच्या 'आयक्लिनिक'मध्ये चालविला जातो. मला तो करायचा होता.

या डोळ्याच्या दवाखान्याविषयी क्रोकोडाईल बँकेची एक निवासी 'फरीदा' हिच्याकडून मला समजलं. मला चौथीमध्येच चष्मा लागला. त्यावेळी आईनं शोध घेतला की आपला मुलगा फळ्यावरचं लिहून आणत नाही. त्याचं लक्ष नाही किंवा करायचं नाही या कारणांमुळे नाही तर त्याला फळ्यावरची अक्षरं दिसतच नाहीत म्हणून मग डॉक्टरकडे जाऊन डोळे तपासले आणि चष्मा लागला.

पण जेव्हा मला कळलं की नियमित डोळ्यांच्या व्यायामानं दृष्टिदोष सुधारता येतो तेव्हापासून चष्मा सुटावा अशी माझी तीव्र इच्छा होती. खरंतर मी मेडिकल मिशनची सिस्टर गेम्मा बरोबर डोळ्यांचे व्यायाम करतही होतो. (सिस्टर गेम्मा माझ्या आईवडिलांच्या कामांतही मदत करीत असे) मी क्रोकोडाईल बँकेमध्ये होतो तेव्हांही डोळ्यांचे व्यायाम नियमित करीत होतो. ते पाहूनच फरीदानं मला पांडीचेरीच्या अरबिंदो आश्रमांतील डोळ्यांच्या उपचाराबाबत सांगितलं होतं. शिवाय मीही माझ्या आवडत्या 'क्रॉक बँके'ला जायला उत्सुक होतो. आणि मम्मलापूर पाँडीचेरी अंतर फार नसल्यामुळे मी माझ्या आईवडिलांना बेंगलोरहून पाँडीचेरीला जायची परवानगी विचारली. माझा डोळ्यांचा कोर्स पूर्ण करून, क्रॉक बँकेत १५ दिवस राहून मग गोव्याला परतायचं मी ठरवलं. मार्च महिन्यांत माझ्या भावांच्या परीक्षेच्या काळात मी दुसरीकडे राहणच सोईच होतं. आणि एप्रिल मे च्या सुट्टीच्या काळांत मी परतणार होतो. त्या सुट्टीत बेळगावची माझी चुलत भावंडही गोव्याला येणार होती आणि मग आम्हाला सर्वांना मिळून सुट्टीत मजा करायला मिळणार होती. हा सीझन आंबे, फणस आणि समुद्रकिनाऱ्यावरच्या सहलीचा आनंदायक काळ होता. माझ्या आईवडिलांनी या बेताला संमती दिली. २६ फेब्रुवारीला मी पाँडीचेरीसाठी निघालो. एव्हाना रस्ते, वाटा यांची मला ओळख झाली होती आणि बस स्टॉपवर मला आता आणायला किंवा पोचवायला कुणी यायची गरज नव्हती. तरी मी ॲरोव्हिलेला बर्नार्डला फोन करून डोळ्यांच्या कोर्सच्या अवधीत त्याच्याबरोबर राहण्याची सोय केली.

मी रात्रीचा प्रवास करून बेंगलोरला गेलो. दिवसा हर्टमन काकांकडे विश्रांती घेतली आणि पाँडीचेरीला पहाटे ४ ला पोचणारी रात्रीची बस घेतली. सायकल रिक्षावाल्यानं माझ्याकडून ४० रुपये घेऊन मला ॲरोव्हिल ऐवजी अरविंद आश्रमात नेऊन सोडलं. खरंतर बसस्टँडच्या अगदी जवळच आश्रम होता. पण फसवून त्यानं मला ४० रुपयाला गंडा घातला.

तिथून मला पुन्हा दुसऱ्या लोकल बसनं ॲरोव्हिलेला जावं लागलं हे अंतर १० कि.मी. आहे. आणि बस मधून उतरल्यावर थोडं चालून मी तिथे पोचलो. बर्नार्डनं माझं स्वागत केलं. माझ्या ॲरोव्हीलेच्या काही महिन्यापूर्वीच्या पहिल्या भेटीत तो मला तिथं भेटल्यानं ओळखीचा होता. मी त्याच्या सदनिकेत विनाशुल्क राहिलो. त्यानं बनविलेल्या जेवणातं मीही सहभागी व्हायचो. मी दिवसांतून दोनदा बर्नार्डच्या घरापासून आश्रमात सायकलनं यायचो. डोळ्यांचे व्यायाम करून मी घरी परतायचो. रोज माझं ४५ कि.मी. सायकलींग होत असे. मी तिथे ९ दिवस होतो. म्हणजे त्या अवधीत माझं ३६० कि.मी. सायकलींग झालं.

आश्रमाची इमारत जुनी होती. आंतयेण्यापूर्वी तुमचे स्लीपर बाहेर काढून ठेवायचे. त्याला प्लॅस्टिकचा नंबरचा टॅग लावून ठेवायचे. त्याच नंबरचा दुसरा टॅग तुमच्या बरोबर ठेवावयचा. अनवाणी पायांनी आश्रमांत चालायचे. एखाद्या रीट्रीट सेंटरमध्ये चिंतनाच्या मनःस्थितीत लोक येतात त्याची मला इथलं वातावरण पाहून आठवण झाली. मंद भारतीय संगीत तिथं चालू असे.

पहिलाच व्यायाम भयानक होता. मी उन्हात सायकल मारत तिथे येऊन पोचलेला असे. तेव्हा माझ्या डोळ्यांत मधाचे थेंब टाकले जायचे. मग मला एकीकडे घामाच्या धारा गाळत उन्हात उभं राहावं लागायचं. आणि डोळ्यांची मधामुळे आग होत असायची. मध चवीला गोड पण डोळ्यांत आग करणारा.

पुढचा व्यायाम बारीक प्रिंट, अंधारांत - फक्त मेणबत्तीच्या प्रकाशांत वाचायचे. नंतर तोच व्यायाम बाहेर सूर्य प्रकाशांत करायचा. एका लहान रबर बॉलचा उपयोग करून डोळ्यांच्या हालचाली कराव्या लागत. मग अक्षरांचा चार्ट वाचावा लागे. त्यावरची अक्षरं लहान लहान होत जाणारी होती. नंतर डोळ्यांना वाफारा घ्यावा लागे. सर्दीसाठी नाकांत घेतो तसा. मग थंडगार कापडी पट्ट्या डोळ्यावर ठेवायच्या शेवटी रंगाचा उपचार. अंधाऱ्या खोलीत दिव्यावर परावर्तीत झालेले गडद रंग टक

लावून पहायचे.

प्रत्येक प्रकार ठराविक वेळा करायचा. डोळे उघडणे बंद करणे, उघडझाप करणे याच्यावर पूर्ण ताबा हवा. ते संपलं की मी वॉकमनवर रॉकम्युझिक ऐकत सायकलवरुन परतायचो.

१० दिवसाच्या या उपचारांना फी नव्हती पण शेवटच्या दिवशी घरी गेल्यावरही हे व्यायाम त्या पद्धतीनं करतां यावेत म्हणून मी ७७ रुपयांचं साहित्य खरेदी केलं. म्हणजे आयड्रॉपच्या ४ बाटल्या, २ छोट्या मधाच्या सुरया, रबर बॉल, २ चार्ट आणि २ बारीक प्रिंटची पुस्तकं.

कोर्समुळे माझा नक्कीच फायदा झाला. महिन्याच्या अवधीत नियमित व्यायामानं चष्माशिवाय मला वाचतां येऊ लागलं. मी आताही हे व्यायाम करतो. खूप नियमित नाही होत पण करतो. त्याचा फायदा असा झाला आहे की मला आधी कायम चष्मा वापरावा लागे आता फक्त विशिष्ट प्रसंगीच लागतो. म्हणजे टी.व्ही किंवा सिनेमा बघताना. पण मी ते फार क्वचितच बघतो आमच्याकडे टी.व्ही. सेट ही नाही.

कोर्स संपल्यावर क्रॉक बँकेला पुन्हा भेटायला मी उत्सुक होतो. आणि आधी फोन करूनच मी पुन्हा एकदां मम्मलापूरला जायला निघालो. तो दिवस होता ७ मार्च.

एक गंमतीशीर अनुभव वाटेमध्ये आला पण खिशाला चाट बसली. मी इंटरस्टेट बस स्टेशनला भल्या सकाळी उतरलो आणि ८ किंवा ९ वाजेपर्यंत मम्मलापूरला जाणारी बस येईल म्हणून वाट पाहात थांबलो. मी आसपास चौकशी केली. मग मला ड्रायव्हरनं मम्मलापूरची बस दाखवली.

मी बसपर्यंत जाण्याआधीच कंडक्टरच्या गणवेशातील माणूस माझ्याकडे आला‘कोठे जाणार?’ त्यानं इंग्रजीत विचारलं. ‘मम्मलापूरला’ असं मी उत्तर दिलं. तर तो म्हणला ‘चल’ म्हणून आम्ही बसमध्ये चढलो, मी सीटवर बसलो. त्यानं माझ सामान वरच्या रॅकमध्ये ठेवलं. त्यानं माझ्याकडे तिकिटाचे पैसे मागितले. ‘किती’? - ‘२५ रुपये’ मी पैसे दिले.

बस सुरु झाली आणि आश्चर्य म्हणजे आणखी एक कंडक्टर आला आणि तिकिट देऊ लागला. मी म्हटलं मी आधीच २५ रु. दिले आहेत. तर गंमत म्हणजे दुसरा कंडक्टर वगैरे कोणी नव्हताच. त्या धूर्त माणसानं मला फसवून माझ्याकडून पैसे काढले होते. मला पुन्हा १८ रु . देऊन तिकिट काढावं लागलं. इतक्या सगळ्या



प्रवाशांच्या समोर तो माणूस मला फसवून गेला याच्यावर विश्वास ठेवणं मला फार कठीण वाटतं होतं. मला कोणीच कसं सावध केलं नाही, की तो तोतया होता म्हणून.

यावेळी माझा क्रॉक बँकेतला मुक्काम फक्त आठवडाभरच झाला. कारण रॉम, हॅरी आणि इतर सर्वजण केरळला जाणार होते. नॅशनल जिऑग्राफिक फिल्म प्रोग्रामचा पुढचा भाग तिथे होणार होतो आणि मग बाकीची कोणीच तिथे नसताना मी एकटा तिथं राहून काय करणार?

▯

## प्रकरण १३

# एका जंगलाचं सर्वेक्षण

त्यावर्षीची उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे नुस्ती मजा होती. माझी चुलत भावंडं ठरल्याप्रमाणे बेळगांवहून आली. त्यावर्षी कोणाचीच बोर्डाची परीक्षा नसल्यानं सुट्टीचा मौसम एप्रिलच्या पहिल्या आठवड्यांतच सुरु झाला. घराजवळ 'बागा' नदी समुद्राला मिळते. आम्ही पूर्ण दोन महिने मनसोक्त पाण्यात डुंबू शकणार होतो.

मे महिन्यांत माझ्या डॅडनी मला विचारलं की गोवा फाऊंडेशन कॉलेज स्टुडंटसाठी आयोजित करत असलेल्या प्रकल्पात भाग घ्यायला मला आवडेल का?' ही फाऊंडेशन पर्यावरणविषयक संस्था आहे आणि माझे डॅड त्याचे कार्यकारी चिटणीस होते. प्रकल्प असा होता की, 'बेतीम'च्या जंगल भागाला भेट देऊन अभ्यास असा करायचा की अजून कोठे कोठे जंगल शिल्लक आहे. कुठल्या भागावर जंगल तुटलं आहे, कोणी तोडलं आहे आणि तिथं नव्या योजना किंवा बांधकाम काय काय झालं आहे इत्यादी. यासाठी स्टीफन आणि जेरी या दोन विद्यार्थ्यांनी नांव दिली होती. दोघंही सेंट झेवियर कॉलेज मापुसा इथले पदवी परीक्षेचे विद्यार्थी होते. मी त्यांच्या टीममध्ये जास्तीचा सदस्य म्हणून सामील झालो.

२० मे च्या सकाळी डॅड आणि मी कारनं 'बेतीम'ला जायला निघालो. वाटेत आम्ही स्टीफन आणि जेरीला घेतले. डॅडनी आम्हाला त्या भागांतील विशिष्ट ठिकाणं दाखवली. त्या ठिकाणांचा सर्व्हे आम्ही करायचा होता. ती ठिकाणं दाखवून ते निघून गेले.

स्टीव्हन टीमचा लीडर होता. डॅडनी त्याला आवश्यक त्या सूचना दिल्या होत्या. हा प्रकल्प कसा करायचा त्याची कल्पना दिली होती. तो लगेचच नोट बुक काढून टिप्पणं काढायला लागला. मी पाहिलेल्या पक्षांची नोंद वहीत नोंद केली. स्टीफन म्हणाला की जर कोणी आपल्याला विचारल तर आम्ही पक्षा पाह्यला आलोय असं सांगायचं.

आम्ही जंगलाच्या मध्यावर दोन अनधिकृत घरे पाहिली आणि मोठ्ठाली झाडे तोडून मोकळा केलेला भूभाग आम्हाला आढळला. झाडे विजेच्या करवतीनं कापली होती आणि ती वाढू नयेत म्हणून शेंड्यांना डांबर लावलं होतं. लाकडाचे बरेच ओंडके जवळ पडले होते. काम दमवणारं होतं आणि 'मे' महिना असल्यामुळे



बुटामध्ये माझे पाय उकडून निघत होते. छोटीवाट दिसली तरी स्टीफनचा तिथे जायचा आग्रह असे, जेरी काही वेळेस तक्रार करायचा.

'असं त्या वाट नसलेल्या जागी, गचपणांत कोणी झाडं तोडायला जातील. असं कसं तुला वाटतं? कोण जाणार तिथं मरायला? जेरी म्हणे पण स्टीव्हन ऐकायचा नाही. तो म्हणे ''तिथं वाट दिसत असूनही जर आपण ती तपासली नाही तर आपलं मन आपल्याला खात राहील की वाट असून आपण गेलो नाही.'' म्हणून प्रत्येक वाटेवर आम्ही जाऊन यायचो मग ती वाट कितीही अरुंद असो वा वापरातली नसो.

दुसऱ्या दिवशी मी माझ्या सायकलवरुन 'बेतीम' ला गेलो. जंगलांत चालत राहिलो तेव्हा आणखी दोन अनधिकृत घरं आणि टेकडीवर एक मोठ्ठ झाड तोडलेलं आम्ही पाहिलं. या झाडाच्या बुंध्यावर ही डांबर फांसलेलं होतं. या सगळ्यामध्ये पूर्ण सकाळ जायची आणि दुपारी दोन वाजता आम्ही काम थांबवायचो तिसऱ्या दिवशी माझे डॅड आणि चुलत भाऊ ल्यूक आमच्याबरोबर आले. डॅडना आम्ही भेट दिलेली सर्व ठिकाणं दाखवली, जिथं झाडं तोडली होती आणि बेकायदेशिर घर बांधली होती, दाखवलेल्या त्याजागी डॅडनी कॅमेरी आणला होता. त्यांनी तो स्टीफनला दिला. जंगलातल्या वेगवेगळ्या भागांचे, तोडलेल्या झाडांचे, अनाधिकृत घरांचे फोटो काढायचे होते. काही ठिकाणी झाड तोडल्यावर खालची जमीन जाळून टाकली होती. त्यामुळे झुडूपही नष्ट झाली होती.

आतापावेतो मी चांगलाच कंटाळलो होतो. आणि शेवटचा - चौथा दिवस आल्याचा मला आनंद झाला. माझ्या अंगावर कुसळ, काटे लागले होते. तिथे खाजवून सुज आली होती. माझे पायही चालून चालून आंबून गेले होते. आणि उष्मा तर खूपच होता. पण मी ते अर्धवट सोडलं नाही. कारण एवीतेवी ते काम आज संपणारच होते. टेकडीवर आम्ही बरीच घरं पाहिली जंगलामध्ये अवैध घरंही बरीच होती. आम्ही काही भागांतली जंगलतोडही पाहिली त्याभोवती तारेचं कुंपणही घातलं होतं. माझी कामगिरी त्यादिवशी संपली आणि माझ्या कामाबद्दल गोवा फाऊंडेशनतर्फे मला काही -शिकाऊ वेतन- स्टायपेन्डही मिळाला. स्टीफन आणि जेरीनी नंतर प्रकल्पाचा वृत्तांत तयार केला, त्यासोबत लिखाण आणि फोटो ही जोडले. फाऊंडेशननं हा वृत्तांत वनखात्याकडे पाठवला. त्यावर वनखात्यानं तपासासाठी एक अधिकारी पाठवला. आणि त्याभागांत जंगलतोड आणि बांधकाम करण्याचा मनाई हुकुमही जारी केला.

## प्रकरण १४

# बेळगांवला कार्यक्रमाचा मुख्य पाहुणा

माझी शाळा संपून आता वर्ष झालं होत आणि हे वर्ष किती रोमांचक गेलं. आता यानंतर कॉलेजला जायचं म्हणजे मला फारच बेचव वाटायला लागलं. पण कॉलेजचा प्रवेश अर्ज भरणे, परिचय पत्रावर फोटो तयार ठेवणं या गडबडीत असताना आणखी एक आश्चर्य माझ्या वाट्याला आलं. तेही अगदी अनपेक्षित ठिकाणाहून.

५ जूनला पर्यावरण दिवसाच्या निमित्तानं बेळगांवला होणाऱ्या कार्यक्रमासाठी मला आमंत्रण आलं. तिथं मला माझ्या वर्षभरातील अनुभवांविषयी बोलायचं होतं. माझ्या वर्षभराच्या सुट्टीतील विविध घटनांमध्ये ही कळसाची घटना होती. आमंत्रण दिलीप कामत यांच्याकडून आलं होतं. पर्यावरण जागृति कार्यक्रमाचे ते एक संयोजक होते. संयोजकांनी हा कार्यक्रम बेळगांवमध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी गेल्या महिन्यांत आयोजित केला होता. कार्यक्रमांत चित्र काढणे आणि निबंध लिहीणे अशा दोन स्पर्धा होत्या. त्याचा समारोप ५ जूनला व्हायचा होता. स्पर्धेत बक्षिस मिळविणाऱ्यांची भाषणं आणि स्पर्धा जिंकणाऱ्यांचा बक्षिस समारंभ या दिवशी होणार होता.

दिलीप, त्यांची बायको नीलिमा आणि त्यांचा मुलगा पार्थ हे कुटुंब आमच्या कुटुंबाचे पूर्वी पासूनचे स्नेही आहेत. आणि जेव्हा दिलीपकाका गोव्यांत येतात तेव्हा आमचेकडे उतरतात, या पर्यावरण दिवसाची कल्पना अशी होती की मुलं आपल्यापरीनं स्वतंत्र पणे बऱ्याच गोष्टी करु शकतात. आपला मार्ग आणि साधनं आपली आपण शोधतात. त्यामुळे एखाद्या तरुण मुलाला बोलवलं तर मुलं स्वतःला त्याच्यामध्ये पाहू शकतील, त्याला चटकन स्वीकारतील म्हणून त्यांनी माझं नाव सुचवलं. कमिटीनं ते लगेच मान्य केलं कारण गेल्या वर्षभरांत मी काही वेगळंच केलं होतं. आणि तेही इकॉलॉजीच्या क्षेत्रांत, त्यामुळे त्यासाठी माझी निवड अगदी सार्थ आहे, असं दिलीप काकांना वाटतं होतं.

मलाही आनंद झाला आणि मी त्यांचं आमंत्रण स्वीकारलं. कोण नाही म्हणेल? दिलीप काकांनी सांगितलं की तुझा सर्व खर्च संस्था करेल. माझे धाकटे काका बेंजामिन बेळगांवलाच असतात. त्यांच्याकडे मी उतरणार होतो. माझा प्रवास खर्च



संयोजक उचलणार होते. मी लगेचच माझ्या भाषणाच्या तयारीला लागलो. कारण मध्ये फक्त आठवड्याचा अवधी होता. आणि ही एक चांगली संधी असल्यामुळे मला तिचा चांगला उपयोग करायला हवा. नेहमीप्रमाणे मी मदतीसाठी आईकडे गेलो तिनं माझ्या भाषणांतील मुद्दे निवडायला मला मदत केली मग मी माझं सगळं भाषण लिहून काढलं. तिनं ते तपासून दिले आणि मग मी ते लक्षात ठेवण्याच्या प्रयत्नला लागलो.

सार्वजनिक सभेत बोलायचं हा काही माझ्या पुढचा प्रश्न नव्हता किंवा मला स्टेजवर बोलायची भीतीही नव्हती. कारण शाळेतल्या कितीतरी स्पर्धेत मी भाग घेतला होता. आणि आतंरशालेय वक्तृत्व सभेतही मी भाग घेतलेला होता. शाळेच्या शेवटच्या वर्षी मला उत्कृष्ट वक्त्याचं पारितोषिक मिळालं होतं. तरीसुद्धा स्पर्धेत बोलणं ही बाब निराळी आणि या दिवशी मुख्य पाहुणा म्हणून बोलणं ही बाब अगदी निराळी होती.

माझ्या आईनं मला लोकांना उद्देशून कसं बोलायचं याच्या अनेक टीप्स दिल्या होत्या. पण मला जर पुढचं भाषण आठवल नाही तर काय असा माझ्यापुढे प्रश्न होता. म्हणून मग मी भाषणाची घरी अनेकदा तालीम केली. ३ जूनला बेळगांवला जाताना मी पूर्ण तयारीत होतो. आणि मला आत्मविश्वासही आला होता.

कपड्यांच्या जोडीला मी माझ्या हॅवर सॅकमध्ये लाल कानाचं कासव घेतलं होतं. आणि गोव्यांत सापडलेलं एक स्थानिक जातीचंही कासव बरोबर घेतलं होतं. मगरी, सापांबरोबरचे माझे सर्पोद्यानांतले फोटो आणि क्रॉक बँकेचे फोटोही बरोबर घेतले होते.

चार तारखेला मी बेळगांवला पोचलो. माझा चुलत भाऊ लुसानो मला न्यायला आला होता. आम्ही थेट घरीच गेलो. त्या संध्याकाळी दिलीप काका घरी आले. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची त्यांनी मला कल्पना दिली आणि प्रदर्शनाच्या हॉलमध्ये ठेवण्यासाठी त्यांनी माझे काही फोटोही नेले.

दुसऱ्या दिवशी लुकानो मला समारंभाच्या तिथं ३ वाजता घेऊन गेला. शाळेच्या हॉलमध्ये कार्यक्रम होता. विविध शाळांमधील मुलं पालकांबरोबर आली होती. हॉलच्या एका कोपऱ्यांत कार्डबोर्डवर माझे फोटो लावून ठेवले होते. माझे काका काकू, चुलत भावंड सर्वजण कार्यक्रमाला आले होते. कार्यक्रमाची ४ वाजता सुरुवात झाली. मी गेलो तेव्हा हॉल पूर्ण भरलेला होता. मला पुढच्या रांगेत बसवलं होतं.

शेजारी माझा चुलत भाऊ बसला. वक्तृत्व स्पर्धेत पहिल्या आलेल्या विद्यार्थ्यांची इंग्लिश, कन्नड आणि मराठीतून प्रथम भाषणं झाली. मग एका विद्यार्थ्यांनं माझी ओळख करून दिली. आणि मला स्टेजवर भाषणासाठी बोलावण्यांत आलं. मी इंग्लिशमध्ये बोलत होतो. आणि थोड्या थोड्या वेळानं थांबत होतो. कारण दिलीप काका माझं भाषण कन्नड मध्ये भाषांतर करून सांगत होते. थोड्या वेळांतच सगळ्यांच्याच लक्षांत आलं की या भाषांतराच्या द्राविडी प्राणायामाची काहीच गरज नाही. सगळ्यांनाच इंग्लिश समजत. मग मला सलग बोलणं फार सोप्प गेलं. मी भाषण सुरु करून टाळ्यांच्या कडकडाटांत संपवलं.

बेंगलोरच्या शाळांमधून घेतलेल्या कार्यशाळेतल्या प्रमाणे मग मी लाल कानी कासव हातात घेऊन प्रेक्षकांमध्ये फिरलो. त्यामुळे ते त्यांना व्यवस्थित पाहतां आलं. आणि माझ्या भावानं स्थानिक छोट कासवं दाखविलं ज्यांना पाहिजे होतं त्यांनी ते हातात घेऊनही पाहिलं पुष्कळ पालक आणि विद्यार्थ्यांना कासव हातांत घेऊन फोटो काढायचा होता. ज्यांना आवड होती त्यांना क्रोकचा दातही मी दाखवला.

त्यानंतर निवेदकानं जाहीर केलं की पुढचा कार्यक्रम सुरु करीत आहोत, पण पुष्कळ विद्यार्थ्यांना प्रश्न विचारायचे असल्यानं नाटकाच्या कार्यक्रमानंतर प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम होईल मी माझ्या जागी येऊन बसलो आणि इकॉलॉजी विषयावरील नाटक पाहिलं. त्यानंतर परितोषिक वितरण समारंभ होता आणि मुलांना बक्षिस देण्यासाठी मला स्टेजवर बोलावण्यांत आलं. ह्या नंतर माझ्या भाषणावरील प्रश्नोत्तरांचा कार्यक्रम झाला. मी प्रश्नांची लगेच उत्तर देत होतो. मला आनंद वाटला तो अशासाठी की माझं भाषण विद्यार्थी आणि मोठ्ठी माणसं सर्वांनी लक्षपूर्वक ऐकलं होतं. कारण त्या दोघांनीही खूप प्रश्न विचारले. जास्ती कुतूहल सापांविषयी होतं. माझ्या लक्षांत आलं की साप काही, केवळ लोकांना घाबरवत नाहीत तर त्याचं लोकांना खूप आकर्षण वाटतं. कार्यक्रम ६।। ला संपला. तत्पूर्वी संयोजकांनी मला पाकिटांत घालून रु. ३०० दिले. या ट्रीपचा माझा खर्च व्यवस्थित बाहेर पडला.

दिलिप अंकलनी लुकानोला आणि मला त्यारात्री जेवायला बोलावलं. लहान कासव ठेवून घेण्यांत त्यांनी रस दाखविल्यामुळे मी ते त्यांना आनंदान देऊ केलं. दुसऱ्या दिवशी सकाळी स्थानिक कन्नड वर्तमानपत्रांतून आमच्या कार्यक्रमाचा समग्र वृत्तांत छापला होता आणि कार्यक्रमामधला माझा फोटोही. मी हे सर्व वाचून आणि पाहून किती रोमांचित झालो ते मला शब्दांत नाही सांगता येणार.



त्यानंतर मी माझ्या १ वर्षाच्या सुट्टी विषयी हिंदुस्तान टाईम्समध्ये लेख लिहीला. युवक उपक्रमात तो छापून आला. त्याबरोबर माझे फोटोही छापून आले. माझ्या आईवडिलांनी सांगितलं की त्यांच्या बऱ्याच मित्रांनी ते वाचलं आणि अभ्यासांतून एक वर्ष सुट्टी घेण्याचं हे रुढीबाह्य धाडशी पाऊल टाकल्याबद्दल त्यांचं सगळ्यांनी अभिनंदन केलं. हे ऐकल्यावर मला ही खरच खूप आनंद झाला. हाच लेख इतर अनेक वर्तमानपत्रांतून, मासिकांमधून आला. मलेशियाच्या ‘ ’ मध्येही आला.

माझ्या भाषणांत बेंगलोरला मी घेतलेल्या कार्यशाळेत आणि लेखांत मी लिहिलं आहे की मी माझ्या नेहमीच अशी शिफारस करतो की प्रत्येक विद्यार्थ्यानं आपल्या पालकांना माझ्यासारखी शाळेतून १ वर्ष सुट्टी घेण्याची परवानगी द्यावी. आणि खात्रीनं सांगतो, त्याचा त्यांना कधीच पश्चाताप होणार नाही.

आणि शेवटी मी पुन्हा सांगतो की जून १९९५ ते जून १९९६ हा कालावधी माझ्या आयुष्यांतील अत्यंत संस्मरणीय होता. मी कितीतरी गोष्टी शिकलो. मला करायच्या होत्या त्याही गोष्टी केल्या पण त्याहूनही कितीतरी अधिक शिकलो मुख्य म्हणजे मला त्यांत फार मजा आली, मला हवं ते करण्याचं पूर्ण स्वातंत्र्य मला होतं. मी अशाच आणखी सुट्टीची वाट बघतोय - तुमच्यापैकी कोणाच्यातरी सुट्टीची !